**मधुराद्वैताचार्य श्रीगुलाबरावमहाराज विरचित १५ व्या यष्टीतील**

# पतिव्रता चरितामृत

**पतिव्रता नेणे आणिकांची स्तुती । सर्व भावे पती ध्यानी मनी ॥**


अनुवाद

**डॉ. सौ. रंजना श्रीकांत चोपडे**

एम.ए. पीएच्.डी. बी.एड.

*

**प्रा. श्रीकांत चोपडे** 'जानाई' ३०, तिरुपती पार्क, सुतगीरणी मार्ग,
श्रीरामपुर, पुसद. जि- यवतमाळ. दूरभाष : ०७२३३-२४८६५१

*



**प्रकाशक**
डॉ. सौ. रंजना श्रीकांत चोपडे
पुसद. जि- यवतमाळ.

**मुद्रक**
ऋचा ग्राफिक्स,
स्वा. सावरकर चौक,
खामलारोड, नागपूर.

* * *


## ग्रंथोपलब्धि

**श्रीज्ञानेश्वर मंदिर,**
दहिसाथ, अमरावती.
टे.०७२१-२६७६३०७

**श्रीज्ञानेश्वर-संस्थान**
पाताळेश्वर मार्ग, महाल, नागपूर
टे.०७१२- २७२०२७८

**भक्तिधाम**
चांदूरबाजार, जि. अमरावती.
टे. ०७२२७-२४३१३१

**नारायण मोहोड,**
हरिपाठाश्रम, आळंदी
ता.खेड, जि.पुणे
मोबाइल-९८२२४४०५९१

**श्रीरंग घटाटे.**
'गोकुळ'घटाटे लेआउट,
व्हीआयपी रोड,
सिव्हिल लाईन्स,
नागपूर. ४४००१
टेली.०७१२-
२५२९७७०/२५३३९९७

*

॥ सर्वेसर्वा ॥

**श्री ज्ञानेश्वर मधुराद्वैत सांप्रदायिक मंडळ**

दहिसाथ, अमरावती


*

Website : www.gulabraomaharaj.org

**मधुराद्वैताचार्य श्रीगुलाबरावमहाराज विरचित १५ व्या यष्टीतील**

# पतिव्रता चरितामृत

**पतिव्रता नेणे आणिकांची स्तुती । सर्व भावे पती ध्यानी मनी ॥**




अनुवाद

**डॉ. सौ. रंजना श्रीकांत चोपडे**

एम.ए. पीएच्.डी. बी.एड.


*


**प्रा. श्रीकांत चोपडे** ‘जानाई’ ३०, तिरुपती पार्क, सुतगीरणी मार्ग,
श्रीरामपुर, पुसद. जि- यवतमाळ. दूरभाष : ०७२३३-२४८६५१


*



*

पतिव्रता इच्छी परमार्थ ।
तरी आपुले पतीचे घ्यावे तीर्थ ॥
तेवी काम-क्रोधे पीडितां बहुत ।
भजन निश्चित करावे ॥

*

(संतचरित्रकार श्रीमहीपतिबाबांचे पाण्डुरंगस्तोत्र ओ.१०३)

# प्रस्तावना

संत गुलाबराव महाराजांचे जीवन म्हणजे खऱ्या अर्थाने एक चमत्कार आहे. बालांध असल्यामुळे पाहणे-वाचणे यांपासून ते वंचित राहिले. चर्मचक्षूंना दिसणारे विश्व ते पाहूं शकले नाहीत. पण जिद्दीच्या प्रयत्नाने त्यांनी अंतरंगाचे दर्शन घेतले. डोळे नसूनही त्यांच्याजवळ दिव्य अशी जीवनदृष्टी होती. बहिरंगावरून दृष्टी आत वळलेले संत गुलाबराव महाराज हे आत्मदर्शनाकडे वळले, अध्यात्मात रंगले. त्यांनी पुस्तकातील ज्ञान इतरांकडून वाचून घेतले. नवविधा भक्तीत 'श्रवण' भक्तीला पहिले स्थान देण्यात येते. श्रीमहाराजांनी श्रवणभक्तीच्या माध्यमातून माहिती मिळविली. या माहितीला वैचारिक अधिष्ठान देण्याची अपूर्व शक्ती त्यांच्याजवळ होती. ती शतकोत्तर ग्रंथसंख्येच्या रूपाने उपलब्ध आहे. शेकडो पुस्तकांचे 'लेखक' अशा शब्दांत संत गुलाबरावांच गौरव करणे वाच्यार्थाने उचित ठरणार नाही. पण अनेक ग्रंथांचे 'निर्माते' मात्र ते होते, हे निःसंशय सत्य आहे.

संत गुलाबरावांच्या मराठी ग्रंथांचा अभ्यास सौ.रंजना श्रीकांत चोपडे (पूर्वाश्रमीची कु. रंजना जोशी) हिने पीएच्.डी. च्या संशोधनासाठी केला. 'संत गुलाबराव महाराजांची जीवननिष्ठा' या प्रबंधासाठी अमरावती विद्यापीठाने तिला 'आचार्य' ही पदवीही दिली. पदव्यांनी ज्ञान मोजले जाण्याच्या काळात पदवी मिळाली म्हणजे अभ्यासक कृतकृत्य होतात. अनेकजण संशोधनाच्या संदर्भात संपतातही. पण डॉ. सौ. रंजना ही तेवढ्यावर थांबली नाही. तिने या संशोधनावर आधारित 'गुलाबबोध' ही पुस्तिका प्रकाशित केली. आणि आता 'पतिव्रता चरितामृत' या संत गुलाबराव महाराजांच्या ओवीबद्ध ग्रंथाचा सुगम गद्यानुवाद सौ. चोपडे यांनी केला आहे. ओवीबद्ध रचना ही पाठान्तर, पारायण यांसाठी



उपयोगी असते. पण गुलाबरावांचे विचार समजून घेण्यासाठी त्यांच्या लेखनाकडे वळणाऱ्या वाचकांची सोय ही अशा अनुवादित लेखनामुळे होते.

पातिव्रत्य हे एका विशिष्ट समाज रचनेने स्वीकारलेले मूल्य आहे. पण पतिव्रत्य पालन म्हणजे गुलामगिरी स्वीकारणे नव्हे, हे महाराजांनी समर्थ शब्दांत प्रतिपादन केले. पतिव्रतांच्या पुण्याईच्या बळावर अनेक राक्षसांचा नाश टळला, हे महाराजांनी काव्यात्म भाषेत सांगितले. शिष्यांच्या जीवनात गुरूंना जे स्थान असते, तेच स्थान पतिव्रतेच्या जीवनात पतीला अभिप्रेत आहे, हा महाराजांचा सिद्धान्त आहे.

**अर्थ** हा पुरुषार्थ साधत असताना स्त्री-पुरुषांचे नाते समानतेचे असावे.

**काम** या पुरुषार्थाच्या आचरणाच्या संदर्भात पुरुषांनी स्त्रीदास्य स्वीकारावे.

आणि

**धर्म** या पुरुषार्थाचे प्रसंगी स्त्रीने पुरुषांचा प्रभाव स्वीकारावा. अशी संत गुलाबराव महाराजांची अपेक्षा आहे. समाजजीवनात ती गौण मानली जाऊ नये, असे त्यांचे मत आहे. पुरुषांनीही एकपत्निव्रत स्वीकारावे, याचे जोरदार समर्थन त्यांनी येथे केले आहे.

स्त्री-पुरुष समानतेला हानी न पोचविणारे विचार हे त्यांच्या द्रष्टेपणाचे लक्षण आहे. या मतांचा परिचय करून देणारे 'पतिव्रता-चरितामृत' हे पुस्तक महाराजांच्या ग्रंथभांडारातील एक रत्न आहे. - कोणत्याही काळांत या विचारांचे स्वागतच होईल, असा विश्वास आहे.

– **प्रा. डॉ. गोविंद देशपांडे**

# लेखिकेचे मनोगत

डॉ. गोविंद नारायण देशपांडे सरांच्या मार्गदर्शनाखाली पीएच्.डी.च्या संशोधनासाठी 'संत गुलाबराव महाराजांची जीवननिष्ठा' हा प्रबंध पूर्ण झाल्यानंतर महाराजांच्या विचारांकडे लक्ष वेधावे व त्यांच्या सामाजिक तसेच धार्मिक कार्याची महती सर्वसामान्य लोकांना कळावी, या इच्छेने वरील संशोधनावर आधारित 'गुलाब-बोध' ही पुस्तिका मी प्रकाशित केली.

संत श्रीगुलाबराव महाराजांचे 'पतिव्रता चरितामृता'तील विचार वाचीत असतांना मला असे जाणवले की, कुटुंबसंस्था जर तुम्हांला टिकवून ठेवावयाची असेल आणि पुढील पिढी अधिक सुजाण करावयाची असेल तर पती-पत्नीचं नातं कसं असावं या विषयीचे महाराजांचे विचार सर्वांनी समजून घेणे आवश्यक आहे. आज सुद्धा महाराजांचे हे विचार समाजाला आत्मीयतेने व तळमळीने मार्गदर्शन करणारे आहेत. आजच्या या तथाकथित विज्ञाननिष्ठ संस्कृतीत, आधुनिक कालखंडात देखील स्त्री-पुरुष समानतेला कुठेही धक्का न लावता अगदी तरुण मुला-मुलींपासून तो वृद्धांपर्यंत सर्वांनाच त्यांचे विचार पटूं शकतात, योग्य व सकारात्मक वाटू शकतात. एवढेच नव्हे, तर आजच्या पिढीला कुणीतरी या पती-पत्नी निष्ठेविषयी



सांगणे आवश्यक आहे. कुटुंब-व्यवस्थेचे स्थैर्य पती-पत्नींच्या परस्पर निष्ठेवरच अवलंबून आहे, आणि कुटुंबव्यवस्था ही समाजाचा एक अविभाज्य घटक असल्यामुळे आजही उत्तम नागरिकांच्या निर्मितीसाठी कुटुंबाचे महत्व सर्वाधिक आहे, असे प्रत्यंतर मला महाराजांचे 'पतिव्रता चरितामृत' वाचीत असतांना वारंवार येत होते. म्हणून मी हे पुस्तक गद्यानुवादित केले.

श्री. भैय्यासाहेब व सौ. लक्ष्मी वहिनी यांनी तर गद्यानुवाद 'आवडला' असे सांगून माझा उत्साह द्विगुणीत केला.तसेच डॉ.गोविंद नारायण देशपांडे सरांनी देखील मला कौतुकाने प्रस्तावना लिहून दिली आणि माझ्या आनंदात अधिक भर टाकली. या सर्वांच्या ऋणातच राहाणे मी अधिक पसंत करते.

'पतिव्रता-चरितामृत' या गद्यानुवादित पुस्तिका प्रकाशनाच्या कार्यात घरच्यांनी तसेच अनेकांनी मला सहकार्य केले आहे, त्या सर्वांची मला अशीच मदत होत राहील आणि संतश्री गुलाबरावमहाराजांचे साहित्य वाचणाऱ्या वाचकांस महाराजांचे हे जरा वेगळ्या वळणाचे, गृहस्थाजन्मी लोकांना मार्गदर्शन करणारे विचार निश्चितच आवडतील, अशी आशा आहे. ही सेवा महाराजांच्या चरणी समर्पण करून मी माझे मनोगत पूर्ण करते.

- सौ. रंजना श्रीकान्त चोपडे

# ज्ञानेश्वरकन्येचे स्त्रियांना मार्गदर्शन

''मी धर्माचार्य म्हणून प्रत्येक कलियुगात देवर्षि नारदाचार्यांच्या आज्ञेने येत असतो'' असा स्वतःच्या जीवनकार्याचा उद्देश मधुराद्वैताचार्य श्रीगुलाबराव महाराजांनी संप्रदासुरतरू आणि स्वमंतव्यांशसिद्धान्ततुषार या दोन ग्रंथांतून स्पष्ट केला आहे. त्यामुळेच त्यांनी वेश्येपासून तहत वेदान्ती ब्राह्मणापर्यंत प्रत्येकाला उचित असा धर्म उपदेशिला आहे. योगी, ज्ञानी आणि भक्तांनी सुद्धा कोणत्या मर्यादा पाळून स्वतःला पतनापासून कसे कसे जपावे, यासंबंधी निर्णायक रीतीने बजावले आहे. अशा धर्मपुरुषाने स्त्रीधर्माची सांगोपांग उपपत्ती परखड युक्तिवादाच्या शैलीत अनेक ठिकाणी मांडली आहे. त्याचाच एक भाग म्हणून प्रस्तुत पतिव्रिताचरित्रामृत ग्रंथ लिहून स्त्रियांसाठी सोपी आणि निश्चितरूपाने परमपदाला पोचविणारी साधना सांगितली आहे. परंतु याचे चारच अध्याय उपलब्ध असले तरी संतांच्या कळवळ्याच्या स्वभावाकडे पाहिल्यास, परमार्थाच्या वाटेवर निष्कपट भावाने चालू लागल्यास संतांकडून मार्गदर्शन मिळतेच अशी आपल्या संस्कृतीची परंपरा आहे. **''अधिकार तैसा करू उपदेश''** ही प्रतिज्ञा संतमांदियाळीने वारंवार पूर्ण केली आहे. असो.

या ग्रंथात पतिव्रताधर्माचे युक्तिवादाने प्रमाणपुरस्सर विवेचन केले आहे. उपासनेच्या **'उत्कर्षबुद्धिरुपासना'** या सूत्राचा जणुं सर्व विस्तार आहे. उपासनेला आलंबन असलेल्या जड मूर्ती असोत, चेतन माता-पिता, गुरु, पती असोत किंवा वैदिक उपासना असोत, त्या उपास्यमूर्तीतील जडभावाला आणि जीवभावाला वेगळे करून तिच्या अन्तर्यामी असलेल्या ईश्वराची उपासना करावयाची असते कारण ब्रह्मसूत्रभाष्यात शंकराचार्यांनी जीवोपासेचा निषेध केला आहे. शास्त्रानुसार जीवासंबंधीचे प्रेम हे मोहातच गणले जाते. म्हणून -

परमार्थमार्गात उपास्यातील जडत्वाचा अनुभव न येणे, ही पहिली पायरी आहे. मूर्ती जेव्हा चेतन दिसू लागते त्यानंतर खरी उपासना सुरू होते. नंतर भगवान् उपासकाला बुद्धियोग देऊन ज्ञानसंपन्न करतात, हीदुसरी पायरी. आणि शेवटी तिसऱ्या पायरीवर परमप्रेमरूपा ज्ञानोत्तर पराभक्ती प्राप्त होते.

पतीची ईश्वरभावनेने उपासना करताना प्रथमपासूनच चेतन असलेल्या पतीच्या जडांशाचा त्याग आपोआपच झालेला असतो. त्यामुळे स्त्रीला पहिली



पायरी चढून जाण्याचे कष्टच करावे लागत नाहीत.

त्यानंतर पतीबद्दल वाटणारा जीवभाव नाहीसा करावयाचा असतो. जीवत्वाकडे दुर्लक्ष केले की पतीचे ठिकाणी ईश्वरानुभूती घेणे हे स्त्रीला सहज साधले जाते.

पती स्त्रीचे अन्नवस्त्रादि देऊन भरणपोषण आणि रक्षण करीत असतो. ती पतीला मातृभावाने जेऊ घालते, मित्रभावाने विचारविनिमय करते, स्वामी समजून सेवा करते आणि पत्नीभावाने समर्पित होते. याप्रमाणे सर्व संबंधाने होणाऱ्या प्रेमाचे आलंबन एक पतीच असतो. त्यामुळे पती भरणपोषण करणारा रक्षण करणारा आणि सर्व प्रकारचे प्रेम स्वीकारणारा साक्षात् ईश्वर आहे, अशी उत्कर्षबुद्धी करणे स्त्रीला सोपे जाते.

अशा प्रकारच्या अनेक उपपत्ती देऊन महाराजांनी शास्त्राने आणि युक्तिवादाने मार्मिक रीतीने पतिव्रताधर्माचा विषय समजावून दिला आहे. आजच्या विपरीत-स्त्रीस्वातंत्र्यवादाच्या दुराग्रहाच्या मानसिकतेत असणाऱ्या स्त्री-पुरुषांना आणि समाजधुरीणांना श्रीगुलाबरावमहारजांची मते पटणार नाहीत याची जाणीव महाराजांनाही आहे. ते साधुबोधात एका प्रश्नाच्याा उत्तरात सांगतात की - लोकांकडून टीका ऐकली नाही म्हणजे आजच्या माझ्या भाषणात हलकटपणा झाला आहे, असे मला खात्रीने वाटते.(प्र.९२५)

असो. प्रत्येकाच्या योग्यतेनुसार उचित मार्ग सांगणाऱ्या आपल्या प्राचीन सत्त्वसंपन्न परंपरेतून स्त्री-विषयक मार्गदर्शन समन्वयपूर्वक तार्किक परिभाषेत उपलब्ध होण्याची फार मोठी गरज आहे. तसेच स्त्रीला व्यावहारिकतेतून परमार्थाकडे जावयाचे असल्यास श्रीमहाराजांच्या सर्व ग्रंथातील विचार एकत्रित करून त्यांचा समन्वय करून प्रबंधाच्या रूपात मांडणी व्हावयाला हवी. असे झाल्यास कौटुंबिक स्वास्थ्य आणि परमार्थ दोन्ही दृष्टीने उपयुक्त साहित्य निर्माण होईल. याचा सौ. रंजनाताईंनी सकारात्मक विचार करावा व पुढील अभ्यासाची दिशा ठरवावी आणि आपल्या परीने प्राचीन संस्कारांचा ठेवा पुन्हा उपलब्ध करून देण्यास हातभार लावावा, ही इच्छा !

**- सौ. लक्ष्मी घटाटे,**
**दत्तजयंती**
**२५-१२-२००४**



# संत श्रीगुलाबरावमहाराज : परिचय

*इ.स.१८८१ ते १९१५*

## ''युक्तीने पटवून देण्याचा माझा बाणा आहे''

प्रज्ञाचक्षू श्रीगुलाबरावमहाराज म्हणजे विदर्भातील माधानचे गुलाब गुंडोजी मोहोड. नवव्या महिन्यात नेत्रहीनत्व, माधानसारख्या खेड्यातील जीवन, शिक्षणाचा अभाव आणि आयुष्य केवळ ३४ वर्षे ! अशी सर्वतः विपरीत परिस्थिति असूनही महाराजांनी केलेल्या ग्रंथलेखनरूप ज्ञानयज्ञाचे कार्य अजोड आहे. त्यांची श्रीकृष्णाचे ठिकाणी माधुर्यभक्ती असल्यामुळे ते स्वतःला ज्ञानेश्वरकन्या आणि कृष्णपत्नी म्हणवीत.

**१** त्यांनी ''श्रीज्ञानेश्वर मधुराद्वैत संप्रदाय'' प्रवृत्त केला. हा नाथसंप्रदाय असून उपास्यत्वेकरून वारकरी पंथाची शाखा आहे.

**२.** संताची ज्ञानोत्तर पराभक्ती आणि शंकराचार्यांचा अद्वैत वेदान्त यांचा समन्वय करून शास्त्रीय खंडनमंडन पद्धतीने भक्तिशास्त्राची नवीन स्वरूपात मांडणी केली.

**३.** भगवंताचा सगुण विग्रह मिथ्या नसून सच्चिदानंदघन शुद्ध ब्रह्मस्वरूप आहे. तो ज्ञानानेही नाश पावत नाही, यासाठी अगदी नवीन शब्दयोजना सुचवून **शंकराचार्यांच्या अद्वैतात 'अनध्यस्तविवर्त' या भक्ति-संकल्पनेचे नवे योगदान दिले.**

**४.** डार्विन, स्पेन्सर, बेझंट वगैरे पाश्चात्य तत्त्वेत्त्यांच्या विचारसरणी किंवा इलेक्ट्रॉनिक थियरीज सारख्या अत्याधुनिक मीमांसा देखील युक्तिपरिपूत आर्य-



सिद्धान्तांपुढे कां टिकत नाहीत, याचे सडेतोड युक्तिवादाने प्रतिपादन केले.

**५.** न्यायदर्शनातील प्रत्यक्षखंडातून आर्यांच्या पुरातन भौतिक शास्त्रांचे पुनरुज्जीवन कसे करावे, याचेही उत्कृष्ट मार्गदर्शन केले.

**६.** भारतीयांच्या उज्वल इतिहासाची आणि अक्षुण्ण शिक्षणपरंपरेची खिस्ती इंग्रजांनी बुद्धिपूर्वक केलेली विकृती उघडकीस आणली.

**७.** आर्य हा वंश नाही. आर्य बाहेरून भारतात आले नाहीत. आर्य म्हणजे सुसंस्कृत मनुष्य हाच अर्थ आहे. ३००० वर्षांपूर्वी सर्व जगात सनातन आर्य संस्कृतीच पसरलेली होती. हे प्राचीन ऐतिहासिक सत्य अनेक प्रमाणे देऊन नव्याने प्रस्थापित केले.

**८.** भक्ती, वेदान्त, सांख्य, योग, न्याय, आयुर्वेद, संगीत, साहित्य, नाटक, व्याकरण, कोश, क्रीडा, लिपी वगैरे अनेक विषयांवर 'सूत्र' आणि भाष्य रचनेपासून प्रकरण ग्रंथांपर्यंत विविध प्रकारची ग्रंथनिर्मिती निरनिराळ्या भाषाशैलीत करून त्या त्या शास्त्रात महाराजांनी नवेनवे मौलिक योगदान दिले.

त्याचे सर्व लिखाण प्रखर तर्कवादाच्या चौकटीत आहे. त्यांच्या सर्व लेखनात वेद, पुराणे, रामायण, महाभारत, स्मृती वगैरेंची संतवचनांच्या आधाराने समन्वय केलेली शास्त्रीय मांडणी आहे. आधुनिक काळात सहसा न सांपडणारा हा फार मोठा विशेष महाराजांच्या ठिकाणी स्पष्टपणे जाणवतो.

**९.** जगातील सर्व धर्मांत आणि हिंदुसमाजातील विभिन्न घटकात परस्पर द्वेष वाढू नये म्हणून महाराजांनी समर्थ असा **सर्वधर्मसमन्वयाचा मूलगामी सिद्धान्त** सर्वांपुढे मांडला. आर्य-अनार्य, आर्य-दस्यु, आर्य-द्रविड, ब्राह्मण-ब्राह्मणेतर, उत्तर-दक्षिण, इत्यादि द्वेषभावनेला आणि त्यामुळे उत्पन्न झालेल्या असंतोषाला मूठमाती देण्याचे समन्वयरूपी प्रभावी हत्यार विचारवंतांच्या हाती दिले.

अशा मौलिक विचारांनी भरलेल्या महाराजांच्या वाङ्मयाचा विस्तार बराच मोठा आहे. ग्रंथसंख्या १३३, पत्रे व समीक्षा ११९, अभंग २५००, पदे २५००, गीते १२५०, श्लोकादि कवित्व १०००, ओवीसंख्या २३००० असून अंदाजे ६००० पृष्ठे आहेत. ही सर्व रचना संस्कृत, मराठी, हिन्दी, वज्रभाषा व वऱ्हाडी इ. भाषांतून झाली आहे. साहित्यिक दृष्टीनेही प्रस्तुत वाङ्मयाचा कस ज्ञानेशांच्या कन्येला शोभणाराच आहे.

बालपणी नवव्या महिन्यात नेत्रहीन झालेल्या महाराजांच्या केवळ ३४ वर्षांच्या अल्पायुष्यात झालेल्या या सर्व ज्ञानशाखांना कवेत घेणारा मूलभूत वैचारिक योगदानाचा विचार केला असता -

अल्पवयात अजोड कार्य करणाऱ्या पूज्यपाद श्री आद्यशंकराचार्य व श्रीज्ञानेश्वरमहाराज यांचीच आठवण येते आणि भारतातील महर्षी भगवान् श्रीव्यासांच्या सर्वस्पर्शी ज्ञानपरंपरेचा स्रोत अखंड असल्याची जाणीव होते.
०००

# मधुराद्वैताचार्य श्रीगुलाबरावमहाराजांच्या

# कार्याचा आलेख

* नाव : श्री गुलाब गोंदुजी मोहोड, इ.स.१८८१ ते १९१५.
* नवव्या महिन्यात अंधत्व.
* गोपीभाव : ज्ञानेश्वकन्या आणि कृष्णपत्नी.
* शांकर अद्वैत आणि भक्तीचा पूर्ण समन्वय.
* भक्तिशास्त्राची निर्मिती.
* भक्तीच्या नव्या १६ प्रकारांची मांडणी.
* ज्ञान, उपासना आणि भक्तीतील भेदविवेचन.
* माधुर्यभक्तीवरील आक्षेपांचे निराकरण आणि तिच्या सर्वोच्चतेचे शास्त्रीय प्रतिपादन.
* भगवद्‌विग्रहाचे अनध्यस्तविवर्तत्व : वेदान्तातील नवीन परिभाषा.
* नाममहात्म्य अर्थवाद आहे या आरोपाचे सविस्तर खंडन.
* योगी, ज्ञानी व भक्त यांच्यातील सूक्ष्म भेदांचे प्रतिपादन.
* धर्म आणि तत्वसमन्वयाच्या नऊ प्रकारांचे विवेचन.
* षड्‌दर्शने परस्परविरोधी नसून परस्परपूरक आहेत याची नवीन संदर्भात मांडणी.
* सांख्य सेश्वर आहे याची सप्रमाण सिद्धी.
* आधुनिक योग्यांच्या चुकीच्या संकल्पनांचे खंडन.
* योगदर्शनात अनेक नवीन प्रक्रियांची निर्मिती.
* स्वप्नातून परमार्थ प्राप्तीची प्रक्रिया.
* आन्तर् आणि बाह्य समाधीचे नवे मूलगामी विवेचन.
* पूर्व मीमांसेचे काही अंशी खंडन व उत्तरमीमांसेसाठी तिचा उपयोग.
* उत्क्रांतिवाद, अणुवाद, अज्ञेयवाद, संशयवाद वगैरे पाश्चात्य तत्त्वज्ञानांची भारतीय सिद्धांताशी तुलना आणि मूल्यमापन.
* नीतिशास्त्रातील युरोपियन मतांचे खंडन.त्यांचा भारतीय नीतीशी वेगळ्या रीतीने समन्वय आणि दैनंदिन सदाचाराचा उपदेश.
* पाश्चात्य आणि भारतीय मानसशास्त्रांशी तुलना.
* ॲलोपॅथी व आयुर्वेदाची तुलना आणि मानसायुर्वेदाची निर्मिती.
* इस्लाम, ईसाई, पारशी, बौद्ध, जैन, वगैरे सर्व वैदिक धर्माच्या शाखा आहेत या सिद्धान्ताचे प्रमाणपुरस्सर शास्त्रशुद्ध विवेचन.
* वर्णाश्रम व्यवस्थेचे मूल्यमापन.
* ब्राह्मण-ब्रह्मणेतरवाद आणि आर्य-अनार्य वादासंबंधी तौलनिक विवेचन.
* लो.टिळक, विवेकानंद, रामतीर्थ वगैरेंच्या काही मतांची परखड चिकित्सा.



* बुवाबाजीचा दंभस्फोट.
* धर्मसंकर, धर्मसुधारणा आणि धर्मसमन्वय यातील भेद विवेचन.
* वेदांवर आणि पुराणांवर समन्वयात्मक सूत्रग्रंथांची रचना.
* प्राचीन आर्यांची विविध शास्त्रे आधुनिक विज्ञानाचे आणि तत्त्वज्ञानांचे मूळ स्रोत असल्याचे युक्तिसिद्ध प्रतिपादन.
* न्याय वैशेषिकातून प्राचीन आर्यांचे भौतिक विज्ञान कसे विकसित करावे याचे मार्गदर्शन.
* मनोविज्ञान, काव्यशास्त्र, संगीत, आयुर्वेद वगैरे शास्त्रांचे षड्‌दर्शनानुसार प्रस्तुतीकरण..
* इतिहास कोणी कसा लिहावा आणि कोणत्या इतिहासावर विश्वास ठेवावा याचे मार्गदर्शन..
* आर्य वंश नाही, आर्य बाहेरून आले नाहीत, शूद्र वर्ण हा आर्यांचाच भाग आहे या ऐतिहासिक सिद्धांतांचे मुद्देसूद प्रतिपादनः लो.टिळकांच्या उत्तरधृवीय मताचा परामर्श..
* तीन हजार वर्षापूर्वी आर्य संस्कृती विश्वव्यापक होती या ऐतिहासिक सत्याची प्रमाण पुरस्सर पुनर्स्थापना.
* डार्विन, स्पेन्सर, ॲनीबेझंट वगैरेंच्या उत्क्रांतिवादाचे खंडन.
* सुधारणा आणि बहुमत यांचे संबंधी परखड विचार.
* शिक्षणासंबंधी मूलभूत विचार.
* प्राचीन व अर्वाचीन संगीताची तुलना,भातखंडेंचे खंडन व तात्त्विक प्रश्नांचा उहापोह.
* प्राचीन सूत्र कायम ठेवून नवीन साहित्यशास्त्राची निर्मिती.
* 'प्रक्षिप्त आणि भाषाभिन्नतेवरून लेखकभिन्नता' हे आधुनिक संकेत संत किंवा आर्ष वाङ्‌मयाला लागू पडत नाहीत याचे स्व-उदाहरणावरून प्रतिपादन.
* कौटुंबिक व सामाजिक संबंधात प्रश्नोत्तर रूपाने मार्गदर्शन.
* मुलांसाठी उपदेश.
* स्त्रियांसाठी खास गीतांची निर्मिती.
* लोकगीतातून समाजप्रबोधन.
* नवीन १२३ मात्रावृत्तांची रचना.
* नवीन लघुलिपीची (सांकेतिकलिपी) निर्मिती.
* नवीन 'नावंग' भाषेची निर्मिती.
* नवीन व्याकरण सूत्रे.
* आत्मचरित्र लेखन.
* नाटक लेखन.
* आख्यानांची रचना.
* खेळातून परमार्थप्राप्तीचा उपाय : मोक्षपट.
* संस्कृत, हिंदी, मराठी, वऱ्हाडी आणि व्रजभाषेत एकूण २०६ ग्रंथांची रचना.

  * अभंग-२०९९, * पदे-२२५२, * गीत-१२५०, * श्लोक-१०००, * ओव्या- २३०००,

  * एकूण पृष्ठे ६००० चे वर

००० 

॥ श्री ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

**मधुराद्वैताचार्य श्रीगुलाबरावमहाराज विरचित**

# पतिव्रता चरितामृत

अध्याय १ ला

उपक्रम

**ॐ नमः श्री आचार्या । सच्चिदानंदा गुरुवर्या ।**
**अतीत्य वर्तसी कारणकार्या । अनुग्रहचर्या आर्तबंधो ॥१॥**
**तूं सकलांचें जीवन । तूं पुण्यवंतांचें पुण्य पूर्ण ।**
**तूं ब्रह्मयाचा ब्रह्मा आपण । विष्णूचा विष्णु शिवाचा शिव ॥२॥**

१. श्री आचार्यांना माझा नमस्कार असो! हे गुरुवर्या सत् चिद् आनंद तिन्ही तुम्हीच आहात. कार्यकारणाच्या पलिकडे आहात. तरीपण आर्त शिष्यांना अनुग्रह देण्याचा आपला स्वभाव आहे.

२. तूं सर्वांचे जीवन आहेस. तूं पुण्यवंतांच्या पुण्य कर्मांची पूर्णता आहेस. तुझ्यामुळेंच पुण्यवंतांच्या पुण्याला पूर्णत्व लाभले आहे. हे गुरुदेवा! आपण ब्रह्मदेवाला उत्पन्न करणारे ब्रह्मदेव आहात, विष्णूचे विष्णू व शिवाचे शिव आहात.

**तूं नयनाचा नयन । तूं श्रवणाचा श्रवण ।**
**तूं रसनेचें रसन । घ्राणाचे घ्राण मायबापा ॥३॥**
**तूं मनाचें मन । तूं बुद्धीचें बोधन ।**
**तूं चित्ताचें चेतवण । जीवाचें जीवपण तुजमाजी ॥४॥**

३. हे गुरुदेवा, तूं नेत्रांची नेत्र शक्ती आहेस. श्रवणेंद्रियांची श्रवणशक्ती आहेस. तूं रसनेची रसनाशक्ती आहेस, घ्राणेंद्रियांची वास घेण्याची शक्ती असून आमचा तूं मायबाप आहेस.

४. तूं मनाचे मन व बुद्धीचे बोधन असेच चित्ताला चेतवणारे चेतवण आहेस. जीवाचे जीवपण तुझ्यामध्येच आहे.

**तूं धर्मिष्ठांचा धर्म । कर्मनिष्ठां तूं कर्म ।**
**भक्ती तूं भक्तां प्रेम । ज्ञानियांचें ब्रह्म तूंचि की ॥५॥**



**तूं अनाथाची माउली । तूं भवताप पोळलियां साउली ।**
**हृदयीं धरितां तुझी पाउली । बहुत निमालीं समुदायें ॥६॥**

५. तूं धर्मावर निष्ठा करणाऱ्यांचा धर्म व कर्मनिष्ठ असणाऱ्यांचे तूं कर्म आहेस. तुझी भक्ती केल्यास तूं भक्तांना प्रेम देतोस. एवढेच नव्हे तर ज्ञानियांचे ब्रह्म सुद्धा, हे गुरु माउली, तूंच आहेस!

६. सर्व अनाथांची तूं माउली असून, संसाराच्या तापाने पोळलेल्यांना तूं आपल्या प्रेमाची सावली देतोस. तुझी चरण-पावले जो हृदयी धरतो तो शांत होतो. असे अनेक जण तुझ्या चरणांचा आश्रय घेतल्यामुळे धन्य झाले आहेत.

**तूं सकल दोषांसी खंडण । तूं षडरीदुर्जनां दंडण ।**
**तूं मुक्तिसुखाचें मंडण । प्रीतिस्पंदन भक्तांचें ॥७॥**
**देहाचें मातापिता । एकाचि जन्मीं पोषिती तत्वतां ।**
**अनंत जन्मींचा माता पिता । सद्‌गुरु दाता ब्रह्मसुख ॥८॥**

७. तूंच आमच्या समग्र दोषांचा नायनाट करणारा आहेस. षड्रिपू रूपी दुर्जनांस तूंच दंड देतोस. तूं मोक्षसुखाचे भूषण आणि भक्तांचे प्रीतिस्पंदन आहेस.

८. या शरीराला जन्म देणारे मातापिता केवळ एकाच जन्मात आपले पालनपोषण करतात, पण हे सद्‌गुरो, तूं मात्र अनंत जन्मींचा मातापिता असून तूंच ब्रह्मसुख देणारा आहेस.

**सद्‌गुरुचेनि कृपाबळें । ब्रह्मरूपें ब्रह्माण्ड उजळे ।**
**तान्हिया बाळाचें पाळी लळे । कृपाळे ज्ञानेश्वर जननी ॥९॥**
**जगदुत्पत्तीचें ज्ञान । जेव्हां तूं देसी करून ।**
**तेव्हां दृष्टिसृष्टिवादें जाण । विधातापण तुज कडे ॥१०॥**

९. सद्‌गुरूच्या कृपाशक्तीमुळे ब्रह्मरूपाने संपूर्ण ब्रह्माण्ड उजळून निघते. ज्याप्रमाणे तान्ह्या बाळाचे सर्व लळे आई पुरविते, त्याप्रमाणेच कृपाळू अशी ज्ञानेश्वर जननी बालक असलेल्या माझे सर्व मनोरथ पुरविते.

१०. जगाच्या उत्पत्तीचे ज्ञान जेव्हा तूं करून देतेस तेव्हा दृष्टिसृष्टिवादा प्रमाणे जगन्निर्मातृत्व म्हणजे ब्रह्मदेवत्व तुझ्या ठिकाणी येते.

**शिष्याचें विघ्न करूनि दुरी । तूं पाळण करिसी कृपाभरी ।**
**तेव्हां कमलावर पूतनारी । श्रीगुरु निर्धारी तूंचि तूं ॥११॥**

**तूं माथां ठेविसी कृपाकर । तेव्हां जगदधिष्टानज्ञानें साचार ।**

**मिथ्या जगाचा उपसंहार । करिसी तैं पार्वतीवरही तूं ॥१२॥**

११. शिष्यांची संकटे दूर करून, तूं त्याचे मोठ्या कृपेने पालन करतो, संकटांपासून विघ्नांपासून त्याचे रक्षण करतोस. त्यावेळी हे गुरो, तूंच पूतनारी म्हणजे विष्णू असतोस, असा माझा निश्चय आहे.

१२. तूं जेव्हा आपला कृपाहस्त माझ्या मस्तकावर ठेवतोस, तेव्हा जगताचे अधिष्ठान असलेल्या ब्रह्मस्वरूपाचे ज्ञान मला करून दिल्यामुळे सर्व जगाचा संहार करणाऱ्या शंकरस्वरूपाने तूंच आहेस.

देव आणि गुरु यांची तुलना

**जो जैसें भजन करीत । देव तैसेंचि तया भजत ।**

**सद्‌गुरु भजन न करितां पावत । अहेतुक दयालु म्हणोनियां ॥१३॥**

**ईश्वराची वाणी वेद । जरी सद्‌गुरु कृपा नाहीं शुद्ध ।**

**तरी वेदांतही दिसे भेद । कदापि गोविंद कृपा न करी ॥१४॥**

१३. जो जसे भजन करितो, देव सुद्धा त्याला तेवढ्यापुरतेच भजतो, म्हणजे तेवढीच कृपा करतो. पण सद्‌गुरु मात्र त्यांचे भजन न करितांही प्रसन्न होतात. कारण ते कोणताही हेतू मनात न ठेवतां दया करणारे असतात.

१४. वेद साक्षात् ईश्वराची वाणी आहे पण सद्‌गुरूंची शुद्ध कृपा नसेल तर ईश्वराची वाणी असलेल्या वेदातही आन्तर्विरोध दिसेल आणि त्यामुळे गोविंद देखील तुमच्या वर कृपा करणार नाही.

**गुरु आणि देव । दोही ठायीं समान भाव ।**

**म्हणती ते मूढमती सावेव । देवाहूनि गुरुराव वरिष्ठ कीं ॥१५॥**

**देव अज्ञानाचा पुतळा । गुरु अज्ञान जाळीं ज्ञानज्वाळा ।**

**देवाचिये ठायीं भेदकळा । गुरु अभेद डोळा दाखवी ॥१६॥**

१५. गुरु आणि देव हे दोघेही समान आहेत असे म्हणणारे अवघे मूढ बुद्धीचे आहेत कारण देवाहूनही गुरुराव वरिष्ठ आहेत.

१६. देव हा अज्ञानाचा पुतळा आहे म्हणजे देवाच्या अधिष्ठानावरच अज्ञान भासत असते. पण गुरु मात्र ज्ञानरूपी अग्नीने अज्ञान जाळून टाकतात. देवाच्या ठिकाणी देव-भक्त असा भेद आहे. पण गुरु मात्र अभेदाचा म्ह० अद्वैताचा अनुभव आणून देतात.



**देवाचें करिता स्मरण । तरी भेदबुद्धि न जाये मनांतून ।**

**सद्‌गुरु भेटतां कृपानिधान । जन विजन देवरूप ॥१७॥**

**देवाचें करावया भजन । घ्यावे लागती काष्ठपाषाण ।**

**सद्‌गुरूचें करितां स्मरण । प्रत्यक्ष येऊन भेटतसे ॥१८॥**

१७. देवाचे आपण कितीही स्मरण केले तरी आपल्या मनातून भेदबुद्धी जात नाही. पण सद्‌गुरूंच्या कृपेचा ठेवा भेटतांच जनविजन म्हणजे एकान्त व लोकान्त दोन्ही भगवद्रूप असल्याचा ते अनुभव आणून देतात.

१८. जर आपणांस देवाचे भजन करावयाचे असेल तर लाकडाची किंवा दगडाची मूर्ती आलंबन घ्यावी लागते, पण सद्‌गुरूंचे स्मरण केले तरी ते प्रत्यक्ष येऊन भेटतात.

**देवाचें भजनीं कर्मगोवा । सद्‌गुरु भजनीं नैष्कर्म्यठेवा ।**

**मरण न चुके भजतां देवा । गुरुभजनें अमृतसेवा सांपडत ॥१९॥**

**देवाचें करितां भजन । देव दाखवी सद्‌गुरुचरण ।**

**एवं हरि भजनाचें फळ जाण । श्रीगुरुचरण कळलें कीं ॥२०॥**

१९. ईश्वराचे भजन केले तरी कर्माचे बंधन सुटत नाही पण सद्‌गुरूंच्या भजनाने मात्र नैष्कर्म्याचा ठेवा मिळतो. देवाचे भजन केले तरी मरण चुकत नाही. पण गुरुभजनाने मला मृत्यू नाही असा अनुभव येतो आणि मृत्युरहित असलेली अखंड सद्‌गुरुसेवा शिष्याला प्राप्त होते.

२०. देवाचे भजन केले की देव सद्‌गुरूंच्या चरणसेवेकडे निर्देश करतात. म्हणून श्रीहरिभजनाचे फळ सद्‌गुरुचरणांची प्राप्ति आहे हे समजून येते.

**परब्रह्म चापपाणी । तो वसिष्ठपायीं घाली लोळणी ।**

**जगन्माता दाक्षायणी । शूलपाणीस शरण गेली ॥२१॥**

**नारद हरिभक्त करुणाकर । त्यांचेही ध्येय सनत्कुमार ।**

**छांदोग्य श्रुति साचार । साक्षी ये विषयीं ॥२२॥**

२१. म्हणूनच परब्रह्मरूप असलेल्या श्रीरामचंद्रांनी सुद्धा वसिष्ठांच्या पायी लोळण घेतली. तसेच जगन्माता दक्षकन्या पार्वती गुरुरूप भगवान् शंकराला शरण गेली. (रामभक्ती श्रीशंकरांनी पार्वतीला दिली)

२२. देवर्षी नारद हे थोर हरिभक्त पण तेही सद्‌गुरु सनत्कुमारांना शरण गेले याविषयी छांदोग्य उपनिषद् प्रमाण आहे.

**सोळा सहस्त्र भोगूनि नारी । जो अखंड ब्रह्मचारी ।**
**तोही सांदीपनचरणावरी । लोटांगण घाली प्रेमवशें ॥२३॥**
**देवाचें कृपें मुक्ती । आम्हां न लगे सद्‌गुरुयुक्ती ।**
**ऐसें म्हणे तो मूढमती । नर्क त्याप्रति चुकेना ॥२४॥**

२३. सोळा सहस्त्र स्त्रियांचा भोग घेऊनही जो अखंड ब्रह्मचारी आहे तो भगवान श्रीकृष्ण देखील सद्‌गुरु सांदीपनींचे चरणी प्रेमाने लोटांगण घालतो.

२४. देवाच्या कृपेने आम्हाला मुक्ती मिळेल. आम्हाला श्रीगुरुंच्या उपदेशाची गरज नाही असे म्हणणारा अत्यंत मूढ बुद्धीचा समजावा. त्याचा नर्कवास चुकत नाही.

**आपुलें पापपुण्यकरण । भोगणें लागे आपणाकारण ।**
**एकवेळ पाहता श्रीगुरुचरण । तरी पापपुण्यनिवारण सहजची ॥२५॥**
**पुण्यकर्मे स्वर्गप्राप्ति । पापकर्मे अधोगति ।**
**पापपुण्या वेगळी स्थिति । गुरुकृपा निश्चिती या नांव ॥२६॥**

२५. आपले पापपुण्याचे कर्म आपल्यालाच भोगावे लागते. पण एकदा श्रीगुरुचरणांची प्राप्ति झाली की पाप-पुण्यरूपी फले देणारी सर्व कर्मे नाहीशी होतात.

२६. पुण्यकर्माने स्वर्गाची प्राप्ति होते आणि पापकर्माने अधोगती होते. अशा पापपुण्याहून वेगळ्या स्थितीची प्राप्ती होणे हीच खरी गुरुकृपा होय.

**ब्रह्मानंद जें निर्गुण । तें जयाचे कृपें होय सगुण ।**
**तो सगुण निर्गुणातीत प्रेमसंपन्न । श्रीगुरु आपण कृपाळू ॥२७॥**
**पुत्रासी गुरु मातापिता । पतीस गुरु मानी पतिव्रता ।**
**सच्छिष्यासी जो कर ठेवी माथां । तो सद्‌गुरुदाता कृपाळू ॥२८॥**

२७. निर्गुण ब्रह्मानंद ज्याच्या कृपेने सगुण भक्तिरूप होतो, ते श्रीगुरु सगुणनिर्गुण या दोहोंच्या पलीकडचे असून प्रेमसंपन्न आणि कृपाळू आहेत.

२८. पुत्रासाठी मातापिता हेच गुरु आहेत. पतिव्रता स्त्रीला पती हाच गुरु



आहे. आणि सच्छिष्याला मात्र जे मस्तकावर हात ठेवून कृपाळू होऊन पूर्ण कल्याणाचे दान देतात तेच श्रीगुरु होत.

**अलकावतिपति परमदयाळा । वारूनियां मम भवभयाला ।**
**देवोनि अक्षय अभयाला । रहस्य बोला प्रेमळ ॥२९॥**
**तूं गणेश विघ्नहर्ता । तूं बुद्धिदा सरस्वती माता ।**
**तूं सद्‌गुरु कृपावंता । विभूतिमंता संत मूर्ते ॥३०॥**

२९. हे अलकावतिपती ज्ञानदेवा आपण परमदयाळू आहात. मला संसाराचे भय वाटते ते दूर करा. आणि नेहमीसाठी अभय द्या. आणि प्रेमळ होऊन प्रेमभक्तीचे रहस्य सांगा.

३०. तूं परमार्थातील सारी विघ्ने दूर करणारा गणेश आहेस. तूं बुद्धी देणारी सरस्वती माता आहेस. तूं सद्‌गुरु कृपावंत आहेस. विभूतिरूप संतांच्या अनंत मूर्तिरूपांनी तूंच आहेस.

**जय इंद्राणीतीरनिवासा । जयभक्तमानसराजहंसा ।**
**जय गीता तत्त्वार्थाऽवभासा । चिद्विलासाऽलंदीपते ॥३१॥**
**जय उमामहेश्वर आदिनाथा । जय करुणामय मत्स्येंद्रनाथा ।**
**जयाऽर्तबंधो गोरक्षनाथा । गहिनीनाथा कृपार्णवा ॥३२॥**

३१. इंद्रायणी तीरावर निवास कराणाऱ्या ज्ञानदेवा तुमचा जयजयकार असो. भक्तांच्या मानस सरोवरातील तुम्ही राजहंस आहात. गीतेतील तत्त्वार्थाला समजावून देणाऱ्या, चिद्‌विलास असणाऱ्या ज्ञानेश्वरा तुमचा जयजयकार असो.

३२. जय उमामहेश्वरा आदिनाथा, करूणामय मत्सेंद्रनाथा, आर्ति पुरविणाऱ्या गोरक्षनाथा आणि कृपेचा सागर असलेल्या गहिनीनाथा आपणा सर्वांचा जयजयकार असो.

**जय जय नाथ निवृत्ति । जय जय ज्ञानेश्वर चिद्‌वृत्ति ।**
**जय जय सोपानदेव कृपास्फूर्ति । जय मोक्ष पद्धति मुक्ताजननी ॥३३॥**
**इतुकेहि मिळूनि देव । एक माझा ज्ञानदेव ।**
**चित्तीं धरूनि सद्भाव । दंडवत स्वयमेवो चरणीं असो ॥३४॥**

३३. निवृत्तिनाथांचा जयजयकार असो. चिद्‌वृत्ति असलेल्या ज्ञानेश्वरांचा जयकार असो. कृपा करून स्फूर्ति प्रदान करणाऱ्या सोपानदेवांचा जयजयकार

असो. मोक्षापर्यंत नेणारी जी रीति आहे तीच भगवती मुक्ताआई होय, तिचा विजय असो.

३४. या सर्व देवांचा समावेश असलेले एक माझे ज्ञानदेव आहेत. त्यांचे विषयी पूर्ण सद्‌भाव चित्तात धरून, त्यांच्या चरणी माझा स्वाभाविक दंडवत कायम असो.

**पतिव्रता चरित्रें नाना । जे ऐकतांच क्षणीं मना ।**
**इंद्रियें पावूनि दमना । पापें शमना पावती ॥३५॥**
**संतांचीं चरित्रें अति गोड । पतिव्रता चरित्रें तैसींच रूढ ।**
**पतिव्रताचरित्रें गातां उघड । ब्रह्मगूढ प्रकाशे ॥३६॥**

३५. नाना पतिव्रतांची चरित्रे ऐकतांक्षणी सर्व इंद्रिये रोधली जातात आणि पापे नाहिशी होतात.

३६. जशी संतचरित्रे अति गोड आहेत तशीच पतिव्रतांचीहि चरित्रे आहेत. पतिव्रतांची चरित्रे सर्वांसमोर गायिली असता गूढ असलेले ब्रह्म हृदयात प्रकाशित होते.

**उतरावया पृथ्वीचा भार । समर्थ महीं इंद्र चंद्र ।**
**जैं पतिव्रतेचा होय अवतार । तैं भगवदवतार प्रगट होय ॥३७॥**
**दुष्ट दानव दैत्य तत्त्वतां । ते नाटोपती विष्णु उमाकांता ।**
**घरींचिया स्त्रिया पतिव्रता । होत्या म्हणूनि ॥३८॥**

३७. पृथ्वीवरील पापी लोकांचा भार उतरविण्यास महीवर इंद्र-चंद्रादि देव समर्थ आहेत. पण जेव्हा पतिव्रतेचा अवतार होतो तेव्हा मात्र भगवान् स्वतःच प्रगट होतात.

३८. पुराणात कथा आहेत की दृष्ट अशा दैत्य दानवांच्या स्त्रिया पतिव्रता होत्या म्हणून त्या दैत्यांना विष्णु किंवा महेश्वर जिंकू शकले नाहीत.
(संदर्भ- वृंदेची कथा)

**पतिव्रतेचें तपबळें । ब्रह्मा विष्णु शिव जाहलीं बाळें ।**
**तिन्हीं लोक धाक प्रबळें । पतिव्रता बळें वश होत ॥३९॥**
**पतिव्रतेच्या शापासाठीं । जळाल्या ब्रह्मांडाच्या कोटी ।**
**वर देतां पतिव्रता गोमटी । तरी कल्पकोटी चिरजीवी ॥४०॥**



३९. अनसूया या पतिव्रतेच्या तपोबलामुळे ब्रह्मा-विष्णु-शिव लहान बालक झालेत आणि दत्तात्रेयांचा अवतार झाला.

यांप्रमाणे तिन्ही लोकात पतिव्रतेच्या शक्तीचा प्रबळ धाक असल्यामुळे पतिव्रतेच्या बळाने तिन्ही लोक वश होतात.

४०. पतिव्रतेच्या शापामुळे कोटी कोटी ब्रह्माण्डे नष्ट झालीत. आणि पतिव्रतेने वर दिला तर जीव कल्पकोटी काळपर्यंत चिरंजीव होतात.

**अनसूया अरुंधती । कौसल्या सीता सती ।**
**लीला चुडाला कृष्णा यशुमती । देवकी सती समर्था ॥४१॥**
**आणिकही पतिव्रता । नाना असती तत्त्वतां ।**
**जितुकी स्फूर्ति येईल चित्ता । तितुकियांच्या चरितामृता सेविजे ॥४२॥**

४१. अत्रिऋषींची पत्नी अनसूया, वसिष्ठांची पत्नी अरूंधती, राममाता कौसल्या, सीता, योगवासिष्ठातील लीला आणि चुडाला, कृष्णा (द्रौपदी), यशोदा माता, सती देवकी;

४२. अशा कितीतरी पतिव्रता आहेत. जेवढी माझ्या मनाला स्फूर्ति येईल तितक्या पतिव्रतांच्या कथा मी सांगेन. आपण त्या सर्व चरितामृताचे सेवन करावे.

**पीतां पतिव्रताचरितामृत । त्या पुढें तुच्छ वाटे अमृत । यास्तव सावध श्रोते संत । बोबडावचनार्थ परिसावा ॥४३॥ (य१५.११८)**
**मी नेणें काव्य व्युत्पत्ति । मज न कळे शास्त्रयुक्ति ।**
**ज्ञानेश्वरकृपा अघटित स्फूर्ति । हृदयीं गुरुमूर्ति स्मरूनि वदे ॥४४॥**

४३. पतिव्रताचरित्रामृताचे पान करताना त्याचे पुढे अमृतही तुच्छ वाटू लागते. म्हणून संतरूपी श्रोत्यांनी सावध होऊन माझी बोबडी वाणी ऐकून त्यातील अर्थाकडे केवळ लक्ष द्यावे.

४४. मला काव्य करता येत नाही. मी व्युत्पन्न (विद्वान) पंडित नाही. मला शास्त्रांतील युक्तिवाद माहीत नाहीत. पण ज्ञानेश्वरांच्या कृपेमुळे अघटित स्फूर्ति माझ्या ठिकाणी उत्पन्न झाली आहे. माझ्या हृदयात असलेल्या सद्‌गुरूंचे स्मरण करून मी हा ग्रंथ निवेदन करतो.

**आतां सकलही करुनी कृपा । मज मार्ग दाखवावा सोपा ।**
**जेणें सहज मायबापा । पतिव्रता प्रतापा वर्णूं शके ॥४५॥**

**श्रीज्ञानेश्वर माय माउली । तियेची वंदूनि पाउली ।**

**ही ओवीकुसुममाळ अर्पिली । चरणीं प्रेमें ॥४६॥**

४५. आता आपण सर्व श्रोतेमंडळींनी कृपा करावी. मला सोपा मार्ग दाखववावा. म्हणजे, हे मायबापा, मला पतिव्रतांच्या प्रतापाची कीर्ति वर्णन करता येईल.

४६. श्रीज्ञानेश्वर माय माउलीचे पावलांना मी वंदन करते. आणि ही ओवीरूपी कुसुमांची माळ चरणांवर प्रेमाने अर्पण करते.

॥ श्री ज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

**हरिः ॐ तत्सदिति श्रीज्ञानेश्वरकृपाप्रसादे ओवीछंदबद्धे सद्गुरु-गणेश-सरस्वती-संतस्तवनपूर्वक पतिव्रताचरितोपक्रमवर्णन्नाम प्रथमोध्याय:॥**

**॥ श्री ज्ञानेश्वर महाराजार्पणमस्तु ॥**

०००

॥ श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

# अध्याय २ रा

*॥ विपरीत स्त्रीस्वातंत्र्यवाद खंडणपूर्वक गृहस्थाश्रमव्यवस्था निरूपण ॥*

* * *

**ॐ नमो जय श्रीगुरो । प्रणतकाम कल्पतरो ।**

**तूझिया स्मरणें भव हरो । सकलासहित आमुचा ॥१॥**

**भागीरथी आणि इंद्राणी । ह्या दोन्ही तुमचे चरणीं ।**

**विष्णुरूपा गंगा चरणीं । इंद्राणी चरणीं गुरुरूपी ॥२॥**

१. ॐकाराचा उच्चार करून सद्गुरुंना नमस्कार असो. तुमचा जयजयकार असो. तुम्ही शरण आलेल्यांच्या इच्छा पूर्ण करणारे कल्पतरू आहात. तुमच्या स्मरणामुळे सर्व लोकांसहित आमचा संसार नाहीसा होवो.

२. भागीरथी गंगा आणि इंद्रायणी या दोन्ही, तुमचे चरणी आहेत. आपल्या विष्णुरूपाच्या चरणी गंगा आहे आणि गुरुरूपाचे चरणी इंद्रायणी आहे.

**म्हणोनि गंगेन्द्राणी संगम । तोची सद्गुरु प्रेमोद्गम ।**

**ज्ञान गंगा आणि भक्ति इंद्राणी परम । सुसंगम जाहला ॥३॥**





**आतां तिया सुसंगमीं । जे सुस्नात जाहले त्यागूनि उर्मी ।**

**ते मिळाले पुरुषोत्तमीं । परब्रह्मीं अविनाशी ॥४॥**

३. म्हणून गंगा आणि इंद्रायणीचा संगम झाला आहे. तोच सद्गुरु प्रेमाचा उगम आहे. याप्रमाणे ज्ञानरूपी गंगा आणि भक्तीरूपी इंद्रायणी यांचा परमश्रेष्ठ असा उत्तम संगम झाला आहे.

४. अशा त्या ज्ञानभक्तीच्या उत्तम संगमात, सर्व विषयांच्या उर्मी म्हणजे अभिलाषा सोडून देऊन, अभ्यंग स्नान करतात ते अविनाशी परब्रह्मरूप असलेल्या पुरुषोत्तमता मिळतात.

पतिव्रता या पतिहून श्रेष्ठ

**पूर्वाध्यायीं निरूपण । केलें चरित्रोपक्रमण ।**

**आतां पतिव्रतेची कीर्ति पतिहून । विशेष कैसी ॥५॥**

**स्त्रियेच्या भजनें पुरुष बुडती । परी पतीच्या भजनें स्त्रिया तरती ।**

**म्हणोनि पतीहूनि श्रेष्ठ कीर्ति । पतिव्रताख्याति मज वाटे ॥६॥**

५. पूर्वीच्या पहिल्या अध्यायात या चरित्रामृताचा आरंभ केला. आतां पतिव्रतेची कीर्ति पतीपेक्षा विशेषरूपाने कशी श्रेष्ठ आहे ते पाहूं.

६. स्त्रीचे भजन केले असता पुरुष बुडतात पण स्त्रिया मात्र पतीच्या भजनाने उद्धरून जातात म्हणून पतीहून पतिव्रतेची कीर्ति मोठी आहे. वाखाणण्याजोगी आहे.

**एथ प्रसंगें वाद आला । तोही पाहिजे समीक्षिला ।**

**जे बोलताती बोला । स्त्रीस्वातंत्र्य द्यावे म्हणुनि ॥७॥**

**पुरुषासी स्वातंत्र्य पूर्ण । स्त्रियासी स्वातंत्र्य तैसेचि जाण ।**

**परी हें मिथ्याचि बोलण । जे स्त्रियां परतंत्रपण उपेगा नये ॥८॥**

७. पूर्व पक्ष :- आजकाल लोक म्हणतात की स्त्रीला स्वातंत्र्य द्यावे या नवीन वादाचीही समीक्षा केली पाहिजे.

८. ज्याप्रमाणे पुरुषाला पूर्ण स्वातंत्र्य आहे तसेच स्त्रीला सुद्धा आहे. हे समजून घेतले पाहिजे. म्हणून स्त्रीला स्वातंत्र्य द्या असे म्हणणेच मुळातच चुकीचे आहे. स्त्रीला परतंत्र ठेवणे काही उपयोगाचे नाही.

**यासी वादी बोलती नाना युक्ती । परी येणें नष्ट होवो पाहे भक्ती ।**

**आणि व्यवहारसिद्धीसाठीं जी प्रीति । तीही राहूं न शके ॥९॥**

**स्त्रियेतें स्वातंत्र्य देता । तरी लज्ञा नष्ट होय तत्वतां ।**

**मग अष्टगुणी कामवृद्धिता । सहज पावे ॥१०॥**

९. समाधान :- यासाठी वाद करणारे नानाप्रकारचा युक्तिवाद करतात व स्त्रीला स्वातंत्र्य द्या म्हणतात पण यामुळे भक्ति म्हणजे निष्काम पतीत ईश्वरभाव पाहणारे निष्काम प्रेम नष्ट होऊ पाहते. आणि व्यवहारातील सुखाच्या प्राप्तिसाठी जी परस्पर प्रीती आवश्यक आहे तीही कायम राहू शक्त नाही. याप्रमाणे संसारात आणि परमार्थात दोन्ही ठिकाणी आवश्यक असलेला प्रेमभाव संपून जातो.

१०. दुसरे म्हणतात, स्त्रियेला जर स्वातंत्र्य दिले तर लज्ञा नाहीशी होते आणि तिचा कामभाव अधिक वाढतो.

**या लागीं स्वतंत्र युवती । कल्पांती होवो न शकती ।**

**असो या खंडणमंडणयुक्ती । परी यथार्थ स्थिति ऐकावी ॥११॥**

**धर्म अर्थ काम मोक्ष । हे चार पुरुषार्थ साक्ष ।**

**त्यामाजी आप आपणा मोक्ष । दुसरिया नाहीं ॥१२॥**

११. म्हणून स्त्रिया कधीच स्वातंत्र्य देण्यात येऊ नये. पण या खंडण मंडणाच्या युक्ती बाजूला ठेवा. आणि यथार्थ वस्तुस्थिति लक्षात घ्या.

१२. सिद्धान्त :- धर्म अर्थ काम मोक्ष या चारी पुरुषार्थासाठी शास्त्रोक्त प्रयत्न केले असता आपोआप मोक्षापर्यंत जाता येते. याला चारी पुरुषार्थाची साक्ष आहे. मोक्षासाठी दुसरा मार्गच नको.

**धर्म अर्थ आणि काम । येथ धर्मपत्नीसह संभ्रम ।**

**स्वातंत्र्यपारतंत्र्यसंगम । सांगू येथें ॥१३॥**

**श्रुतिः- "धर्मेच अर्थ च कामे च नातिचरामि" इति वरः ॥**

**धर्म-अर्थ-कामाच्या ठायीं । त्वां न सोडावी स्त्री सर्वदाही ।**

**ऐसिया वचनीं लवलाहीं । वरोत्तर विवाहांत ॥१४॥**

१३. हे चारही पुरुषार्थ धर्म पत्नीसह साधावयाचे असतात. त्यामुळे येथे स्वातंत्र्य आणि पारतंत्र्य यांचा परस्पर विरोध राहत नाहीत, ते एकरूप होऊन जातात. हेच मी येथे सांगणार आहे.

१४. विवाहाचे वेळी धर्म अर्थ आणि काम साधीत असताना मी पत्नीला





सोडणार नाही. पत्नीसहच हे चारी पुरुषार्थ साधीन असे पुरुष स्त्रीला वचन देत असतो.

**धर्म अर्थ आणि कामीं । कदापि हीस न त्यागीं मी ।**

**एवं वरही वचनानुगामी । सहज होय ॥१५॥**

**एवं निश्चिती असे श्रुति । आतां ऐकाव्या स्मृति ।**

**"न स्त्री स्वातंत्र्यमर्हति" । ऐसी उक्ति मनूची ॥१६॥**

१५. "धर्म अर्थ आणि काम साधीत असताना हिला मी कधीहि सोडणार नाही." असे वचन देत असल्यामुळे पती शास्त्रानुसार वागत असतो.

१६. याप्रमाणे वेदांच्या मंत्रात निश्चित रूपाने स्त्रीला पुरुषाने तिन्ही पुरुषार्थात स्वतः बरोबर ठेवावे असे सांगितले आहे.

आता - स्मृतींमध्ये काय सांगितले आहे ते पाहू - **"स्त्रीला पूर्ण स्वातंत्र्य उचित नाही"** असे मनुस्मृतीत वचन आहे.

**स्मृतिः- "नार्यस्तु यत्र पूज्यन्ते, रमन्ते तत्र देवताः" (मनुस्मृति अ७-४२)**

**जेथ पूजिल्या जाती युवती । तेथ वास कीजे दैवती ।**

**एवं दोन्हीही स्मृति । विरोधि भासती परस्पर ॥१७॥**

**पहिली स्मृति स्त्रीस्वातंत्र्य निषेधित । दुसरी स्मृति विधी सांगत ।**

**धर्माचे ठिकाणी दासी म्हणोनि विरोध भासत । स्मृतींचा जरी ॥१८॥**

१७. 'जेथे स्त्रियांचे पूजन होते तेथे देवता आनंदाने निवास करतात.' (मनुस्मृति. ७.४२) याप्रमाणे या दोन्ही स्मृति परस्पर विरोधी भासतात.

१८. पहिली स्मृती स्त्रीच्या स्वातंत्र्याचा निषेध करते. आणि दुसरी स्मृति विधान म्हणजे असे केले पाहिजे हे सांगते. धर्माचे ठिकाणी दासी असल्याचे सांगते म्हणून असा जरी स्मृतीचा विरोध भासतो. तरी ते खरे नाही -

**तथापि धर्माच्या ठायी । स्त्री सर्वदा परतंत्र पाहीं ।**

**दासी होऊनिया राही । तरीच धर्मफळ मिळे ॥१९॥**

**जो जो धर्म करी पुरुष । स्त्रियेनें अनकूल असावें तयास ।**

**जैसी दासी निज स्वामीस । अनुकूल राहे ॥२०॥**

१९. तथापि धर्माच्या ठिकाणी ती नेहमीच परतंत्र आहे. धर्माचरण करताना पतीच्या आज्ञेत दासी होऊन राहिली तरच तिला धर्माचे फळ मिळते.

२०. ज्याप्रमाणे दासी स्वामीच्या मनाप्रमाणे वागते त्याप्रमाणे स्त्रीने पती जो जो धर्म करील त्यास सेवाभावाने अनुकूल असावे.

**धर्माच्या ठायीं दासी भार्या । जैसी अत्रीतें अनसूया ।**

**कीं सत्यवाहना तया । सावित्री जेवीं ॥२१॥**

**एवं धर्माच्या ठायीं दासी कामिनी । अर्थाचे ठायीं ती मैत्रिणी ।**

**जैसे पांडव निघतां वनीं । याज्ञसेनी अनुकूल ॥२२॥**

२१. ज्याप्रमाणे अत्री ऋषींची भार्या अनसूया आणि सत्यवानाची पत्नी सावित्री या स्वतःचा पती धर्माचरण करीत असतांना पूर्णपणे आपल्या पतीच्या अनुसार दासीभावाने वागत. त्याप्रमाणे धर्माचरणाचे ठिकाणी पत्नीने दासी होऊन सेवाभावाने पतीचे अनुसरण करावे.

२२. याप्रमाणे *धर्म पुरुषार्थ साधीत असता पत्नीने दासी असावे.

*अर्थ पुरुषार्थ साधीत असता ती मित्र म्हणून बरोबरीच्या नात्याने असावे. ज्याप्रमाणे पांडव वनवासाला निघाले तेव्हा द्रौपदी त्यांना अनुकूल राहून त्यांचे सोबत वनात गेली.

अर्थाचे ठायी समान

**अर्थपुरुषार्थ साधिता । समान साधावा तत्वतां ।**

**धर्म पुरुषार्थ साधितां । बहु पुरुषार्थ पुरुषाकडें ॥२३॥**

**धर्मपुरुषार्थाचा अधिकार । पुरुषाकडे येतो साचार ।**(य१५पा१२०)

**स्त्रियेने दास्यत्व करूनि निर्धार । मिळवावें पुण्य ॥२४॥**

२३. अर्थ पुरुषार्थ साधण्यासाठी दोघेही समान आहेत. दोघांनी मिळून अर्थार्जनाकडे आणि अर्थ सांभाळण्याकडे बरोबरीच्या नात्याने असावे. (म्हणजे पुरुषाने अर्थार्जन करावे आणि स्त्रीने काटकसरीने वागून उचित विनियोग करावा) वेदाध्ययन व यज्ञयागादि कर्मे करण्याचा अधिकार पुरुषालाच आहे.

२४. त्यामुळे त्यालाच कष्ट करून पुढाकार घेऊन धर्माचरण करावे लागते. त्यासाठी दासभावनेने सारी कामे करून स्त्रीने पतीच्या कार्यात सहभागी होऊन पुण्य मिळवावे.

**आणि अर्थपुरुषार्थाच्या ठायीं । स्त्रीपुरुष अधिकार समान पाहीं ।**

**मित्रांसरिखे दोघांही । वागावें सुखें ॥२५॥**

**एकाचें इष्ट एकीं करावें । तेथें हें तें मग न गणावें ।**





**एवं अर्थ पुरुषार्थ साधावें । दोघीं समान राहोनी ॥२६॥**

२५. आणि अर्थ पुरुषाच्या ठिकाणी समान अधिकार असल्याने त्यांनी अर्थविनियोगाच्या बाबतीत मित्रासारखे वागावे.

२६. पती पत्नींनी एकमेकांना काय हवे याचा विचार करून एकमेकासाठी उचित ते सर्व करावे. हे माझे हे तुझे असा विचार करू नये. याप्रमाणे समान राहून अर्थपुरुषार्थ साधावा.

कामाचे ठायी वरिष्ठ

**आणि काम पुरुषार्थाच्या ठायीं । स्त्रियेतें अधिकार वरिष्ठ पाहीं ।**

**दास्यत्व ये लवलाहीं । पुरुषाकडें ॥२७॥**

**जैसे द्रौपदीचें पाय धर्म चुरीत । कीं राधेचें पाय हरी वंदित ।**

**तें काम-पुरुषार्थस्थित । यथापरिस्थित ऐकावी ॥२८॥**

२७. कामपुरुषार्थाच्या ठिकाणी मात्र स्त्री पतीपेक्षा वरिष्ठ आहे. तिच्या मनोगताप्रमाणे वागून पतीने स्वतःकडे दास्यभाव ठेवावा. तिला स्वामिनी समजून स्वतःकडे गौणता घ्यावी.

२८. उदाहरणार्थ - द्रौपदीचे पाय धर्मराज युधिष्ठिर चुरून देत असे आणि भगवान् कृष्ण राधेच्या पावलांना वंदन करीत असे. याप्रमाणे कामपुरुषार्थाचे वेळी स्त्री स्वामिनी असते. यासंबंधी वस्तुस्थिती ऐका -

**कामपुरुषार्थें करून । स्त्रियेचाचि करावा मान ।**

**ये विषयीं जयदेव वचन । प्रमाण आहे ॥२९॥**

प्रतीक

**स्मरगरलखण्डणं मम शिरसि मण्डनं देहि पदपल्लवमुदारम्**

(श्री गीतगोविन्दम् दशम सर्गः श्लोक ७.)

भावार्थ -

**"प्रिये मन्मथ विष अति दुस्तर । तेणें शरीरीं उठे विकार ।**

**ते तूं कृपा करूनि निर्धार । नष्ट करीं ॥३०॥**

२९. कामाचे सेवन करीत असता स्त्रीलाच मोठेपणा द्यावा. याबद्दल जयदेव कवींचे वचन प्रमाण आहे.

गीतगोविंद श्लोक

३०. हे प्रिये, मदनाचे विष अतिशय दुस्तर आहे. त्यामुळे शरीरात कामविकार उद्भवतो. तूं माझेवर कृपा कर आणि निर्धार (निश्चय) करून

त्याला नष्ट कर.

**तुझी पाउलें अति सुंदर । मी धरूनि शिरावर ।**
**जे मज रोगिया होती उदार । वैद्या सारिखे ॥३१॥**
**एवं जयदेवाचें वचन । काम पुरुषार्थी स्त्रियेतें मान ।**
**आणिकही एक कवी प्रमाण । बोलिला ऐसा ॥३२॥**

३१. तुझी पाऊले अति कोमल आणि सुंदर आहेत. त्यांना मी शिरावर धरले की ती पाऊले वैद्यासारखे उदार होऊन माझा कामज्वर घालवितात.

३२. याप्रमाणे जयदेवांनी कामपुरुषार्थात स्त्रीला मान द्यावा हे या वचनांनी सुचविले.दुसरा एक कवीही असेच सांगतो. तेही वचन प्रमाण आहे.

प्रतीक

**राधे त्वमधिकधन्या हरिरपि दुस्तरभवाब्धितारोऽपि ।**
**मग्ना सुरतसमुद्रे तव कुचकुंभावलम्बनं कुरुते ॥१॥**

श्लोकार्थ

हे राधे, जो हरी दुस्तर अशा संसारातून जीवांना तारणारा आहे. तो देखील सुरत समुद्रामध्ये मग्न असताना तुझ्या कुचकुंभाचा आधार घेऊन तरून जातो म्हणून तूं श्रीहरीपेक्षा अधिक धन्य आहेस.

भावार्थ :-

**श्रीकृष्णाहूनि मान्य । राधे तूंचि परम धन्य ।**
**कारण सुरतसमुद्रीं असतां मग्न । तोही तव कुचकुंभाश्रयीं ॥३३॥**
**काम समयीं रघुपति । सीतेस मान देत नाना रीती ।**
**आणि पुरूरवा नृपति । मान दे उर्वशीप्रती तैसा ॥३४॥**

३३. हे राधे, श्रीकृष्णापेक्षा तूंच मोठी आहेस मान्य आहेस आणि परम धन्य आहेस कारण सुरतसमुद्रात मग्न असताना तो तुझ्या कुचकुंभाचा आश्रय घेतो.

३४. कामाचे वेळी रघुपती राम सीतेस नाना प्रकारांनी मान देतो. तिचे मन राखतो (रामायण) आणि त्याचप्रमाणे राजा पुरूरवा देखील उर्वशीला असाच मान देत असे.

**शंतनु मान गंगेप्रती । देतां होय तैसेच रीति ।**
**चुडाला राणीचे वचनाप्रति । शिखिध्वज नृपति मान देता ॥३५॥**
**असो बहुत दृष्टांत । हाच अनुभव यथार्थ ।**



**साधितां धर्मपुरुषार्थ । दासी होआवें स्त्रियेनें ॥३६॥**

३५. गंगेला शंतनू याच रीतीने मान देत असे. (महाभारत) शिखिध्वज राजा चूडालाराणीच्या वचनानुसार वागून तिला मान देई. (योगवासिष्ठ)

३६. असे पुष्कळ दृष्टांत आहेत. असो. हाच अनुभव मी यथार्थ सांगत आहे. एकूण काय तर धर्म पुरुषार्थाचे ठिकाणी स्त्रीने दासी होऊन सेवा करावी.

**अर्थपुरुषार्थी मैत्रिणी । कामपुरुषार्थी स्वामीनीं ।**
**एवं ऐसिया स्मृति दोन्ही । बोलताती ॥३७॥**
**प्रथम स्मृतीचा अर्थ । जाणावा धर्म पुरुषार्थ ।**
**आणि दुसरिया स्मृतीचा अर्थ । काम पुरुषार्थ जाणावा ॥३८॥**

३७. अर्थ पुरुषार्थाचे ठिकाणी मैत्रिण म्हणून स्त्रीने बरोबरीने वागावे. काम पुरुषार्थ साधताना स्त्री स्वामिनी असावी. याप्रमाणे या दोन्ही स्मृती सांगतात. या दोन्ही कवींच्या वचनांना श्रीमहाराजांनी स्मृतींची योग्यता दिली आहे.

३८. पहिल्या स्मृतीतून धर्मपुरुषार्थ आणि दुसऱ्या स्मृतीतून कामपुरुषार्थ समजून घ्यावा.

**तिसरीही एक स्मृति । आहे निकी ऐसिया रीति ।**
**भोज्येषु माता शयनेषु भार्या इत्यादि स्थिति । बोलली आहे ॥३९॥**
**भोजनाचे समयीं जननी । शयनाचे समयीं कामिनी ।**
**कार्याचे ठायीं मैत्रिणी । आज्ञा प्रमाणीं दासीसम ॥४०॥**

३९. तिसरीही एक स्मृति आहे. तीमध्ये स्त्री-पुरुषांचे संबंध परस्पर वेगवेगळ्या प्रसंगी कसे असावयाला हवेत, याचे वर्णन केले आहे.

''भोज्येषु माता, शयनेषु रंभा'' असे स्त्रीचे स्थान असते.

४०. भोजनाचे समयी स्त्री आईच्या प्रेमाने पतीला जेऊ घालते व शयनाचे वेळी ती काम पुरविणारी कामिनी असते. सांसारिक कामे आली असताना ती मित्राप्रमाणे वागते. आणि पतीने आज्ञापिले असतां दासी होऊन सेवा करते.

**धर्मानुकूल परममती । ऐशा सद्गुणी जेथ युवती ।**
**निक्या पूजिलिया जाती । कुल उद्धार स्थिती त्या ठाया ॥४१॥**
**एवं धर्मपुरुषार्थी स्त्री परतंत्र । आणि काम पुरुषार्थी स्त्री स्वतंत्र ।**
**आणि पतिसेवा पवित्र । धर्म स्त्रियेचा ॥४२॥**

४१. ज्यांची बुद्धी धर्माला अनुकूल आहे, अशा सद्‌गुणी युवती ज्या घरात असतात त्या निश्चयाने पूजनीय असतात. अशा ठिकाणी त्या कुलाचा उद्धार होत असतो.

४२. याप्रमाणे धर्मपुरुषार्थाचे ठिकाणी स्त्री पुरूषाच्या अनुसार वागणारी म्हणून परतंत्र असते. आणि काम पुरुषार्थ साधीत असतां स्वतंत्र असल्यामुळे ती स्वामिनी असते. आणि पतीची शुद्ध अन्तःकरणाने सेवा करणे हा स्त्रीचा धर्म पुरुषार्थ आहे.

**एवं पुरुष पुरुषार्थ आचरितां । हे झाली स्त्रियेची व्यवस्था ।**
**परी स्त्रीचा पुरुषार्थ तत्त्वता । एक पतिव्रताधर्म ॥४३॥ म्हणोनि पुरुष**
**धर्मानुकूल आहे । आणि आपुला पतिव्रताधर्मही आचरत राहे । ती स्त्री**
**कुलस्त्रियांहूनि धन्य पाहे । निकी लवलाहें निरूपिली ॥४४॥**

४३. याप्रमाणे पुरुषाने स्वतःचा पुरूषार्थ आचरीत असताना स्त्रीने कसे वागावे व त्यात कसे सहकार्य द्यावे याची व्यवस्था आपण पाहिली. पण खरोखरी पाहतां, स्त्रीला स्वतःचा सर्वात महत्त्वाचा पुरुषार्थ म्हणजे पतिव्रताधर्म हाच एक आहे.

४४. म्हणून पतीच्या धर्माला अनुकूल राहून स्वतःचा पतिव्रताधर्मही आचरण करणारी स्त्री इतर कुलस्त्रियांपेक्षा खरोखरीच धन्य आहे. याचे निरूपण आता पावेतो केले.

**इये अध्यायीं निरूपण । विपरीत स्त्रीस्वातंत्रवाद खण्डण ।**
**स्मृतिविरोध परिहरोन । गार्हस्थ्य व्यवस्था स्थापिली ॥४५॥**
**स्त्रीपुरुषांचें कर्तव्यकर्म । संक्षेपें निरूपिलें परम ।**
**पुढील पतिव्रताचरितोपक्रम । येणेंही साधे ॥४६॥**

४५. या अध्यायात विपरीत स्त्रीस्वातंत्र्याच्या मताचे खंडन केले आणि स्मृतींच्या परस्पर विरोधाचा परिहार केला. संसारात स्त्री पुरुषांची स्थाने कोणती हे पाहिले. आणि गृहस्थाश्रमाची व्यवस्था स्थापन केली.

४६. स्त्री-पुरुषांचे कर्तव्यकर्म कोणकोणते आहे तेही संक्षेपाने पण यथास्थित निरूपण केले. यानेच पतिव्रताचरिताचा उपक्रमही साधला गेला.

**झालिया शंका समाधान । पुढें चरित्रें करावींत श्रवण ।**
**ज्या ज्या पतिव्रता पुरातन । आणि नवीन जाहलिया ॥४७॥**



**त्या सकळांचा चरित्र समुदाय । येथ निरूपणीं योजिला होय ।**
**प्रथम सुखबोधा रचिला उपाय । कुलस्त्रियांच्या ॥४८॥**

४७. आपले शंकासमाधान करून घेऊन पुढील जुन्या आणि नवीन पतिव्रतांची चरित्रे श्रवण करावीत.

४८. त्या सर्वांची चरित्रे येथे निरूपण करण्याचे मी ठरविले आहे. सुरवातीला कुलस्त्रियांना सुखाने बोध होण्यासाठी एक उपाय मी सांगतो.

**पुरुषही वाचोन । एकपत्नीव्रत आचरतील पूर्ण ।**
**ऐसी आशा करोन । आरंभिला ग्रंथ ॥४९॥**
**पुढें उत्तम उमाचरित । जे सकल जगन्माता शोभत ।**
**तें मातृचरित्र ऐकूनि यथार्थ । पुनीत होवोत सुजन श्रोतें ॥५०॥**
**श्रीज्ञानेश्वर चरण । दृढभावें हृदयीं धरून ।**
**अध्याय केला समर्पण । मालिका रूपें ॥५१॥**

४९. हे वाचून पुरुषांनाही बोध होईल आणि ते देखील एकपत्नीव्रताचे पूर्ण आचरण करतील, या आशेने या ग्रंथाचा मी आरंभ केला.

५०. पुढे मी भगवती उमामातेचे चरित्र सांगणार आहे ही भगवती सर्व जगताची माता म्हणून शोभत आहे. ते यथार्थ मातृचरित्र ऐकून सज्जन श्रोते पावन होवोत.

५१. संत श्रीज्ञानेश्वरांचे चरण हृदयात दृढ प्रेमभावाने स्थापन करून, मालिका रूपाने असलेल्या या ग्रंथातील पहिला अध्याय त्यांचे चरणी समर्पण केला.

**॥ हरिः ॐ तत्सदिति श्रीमत्सद्‌गुरु ज्ञानेश्वरकृपाप्रसादे,**
**ओवी छंदबद्धे पतिव्रताचरितामृते,**
**विपरीतस्त्रीस्वातंत्र्यवाद खंडणपूर्वक-गृहस्थाश्रमव्यवस्था-वर्णनन्नाम**
**द्वितीयोध्यायः ॥**
**॥श्रीज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥**

ooo

# अध्याय ३ रा

पतिव्रताधर्माचे सामर्थ्य

**॥ श्रीज्ञानेश्वर माउलीसमर्थ ॥**

**नमो माझिया कुळदेवता । भक्तवत्सला उमाकांता ।**
**श्रीज्ञानेश्वररूपें भगवंता । कृपा केली मजवरी ॥१॥**
**तरी आतां तेचि रूप । हृदयीं राहो हा संकल्प ।**
**सिद्धि न्यावया मायबाप । समर्थ तुम्ही ॥२॥**

१. हे माझे कुलदैवत असलेल्या उमापती शंकरा तूं भक्तांवर वात्सल्य भावाने प्रेम करतोस. तूं ज्ञानेश्वररूपाने मला दर्शन देऊन मजवर कृपा केलीस.
२. तरी आता तुझे ज्ञानेश्वररूपच माझ्या हृदयी राहो हा माझा संकल्प आहे. हे मायबापा, तो संकल्प पूर्ण करण्यास तुम्हीच समर्थ आहात.

**म्हणोनि हैमवती सहित । वंदिलें करावया स्वहित ।**
**योगी जाणती जे गुणरहित । ते गुणसहित भक्तवशें ॥३॥**
**तें उमाचरित सुंदर । पुढें वदवावें सविस्तर ।**
**जय जय उमा पिनाकधर । करुणानिधे ॥४॥**

३. योगी तुझ्या निर्गुण रूपाचे ध्यान करून तुला जाणतात. ते निर्गुणस्वरूप भक्तिप्रेमाने सगुण साकार होऊन प्रगट होते अशा पार्वती मातेसह असलेल्या तुला माझ्या कल्याणासाठी, मी वंदन करीत आहे.
४. हे पिताकधर शंकरा, करूणेच्या निधाना, सुंदर असलेले उमेचे चरित्र तुम्ही सविस्तरपणे माझेकडून निरूपण करवून घ्या. तुमचा जयजयकार असो.

**जय त्रिनयन शशिशेखरा । जयशिव मुकुंदप्रिय शंकरा ।**
**जय निज मंगलकरा । गंगाधरा विश्वपते ॥५॥**
**ऐसी करितांचि स्तुति । हृदयीं प्रगटली शंभुमूर्ति ।**
**सह ज्ञानेश्वरैक्य स्थिती । पावोनिया ॥६॥**

५. तीन नेत्र असलेल्या आणि शिरावर चंद्रबिंब शोभत असलेल्या शिवाचा जयजयकार असो. जय शिवा, श्रीकृष्णाला प्रिय असलेल्या शंकरा, शरण आलेल्या निजजनांचे मंगल करणाऱ्या, विश्वाचे पालन करणाऱ्या, आणि शिरावरील



जटेत गंगा शोभत असलेल्या तुझा जयजयकार असो.
६. अशी स्तुति करताक्षणी श्रीज्ञानेश्वरांशी एकरूप पावलेली शंभूची मूर्ति माझे हृदयात प्रगट झाली.

**तें सुंदरपण डोळां पाहतां । बोलावया उमाचरिता ।**
**स्फूर्तिप्रवाहें तत्त्वतां । हृदयाब्धीं भरें ॥७॥**
**तंव श्रोते करिती प्रश्न । उमाचरित्र आम्ही करूं श्रवण ।**
**परी आशंकित जाहलें मन । पुसणें आहे कांही एक ॥८॥**

७. ते मूर्तिमान सौंदर्य डोळ्यांनी पाहिल्याबरोबर भगवती उमेचे चरित्र सांगता यावे म्हणून स्फूर्तीच्या प्रवाहांनी माझ्या हृदयातील प्रेमसमुद्र भरून गेला.
८. हे ऐकतांच श्रोते प्रश्न करतात- उमाचरित्राचे आम्ही श्रवण करणारच आहोत पण मनात एक आशंका निर्माण झाली आहे. त्यासंबंधी काही विचारण्याची इच्छा आहे.

**तेथ वक्त्याचें अनुमोदन । पाहोनि श्रोते वदती आपण ॥**
**पातिव्रत्यीं सामर्थ्य गहन । काय म्हणोन सांगावें ॥९॥**
**आणि पातिव्रत्याचें फळ । तेहि सांगावें सकळ ।**
**पुरुषतपाहूनिही केवळ । श्रेष्ठ असे, काय म्हणोनी ॥१०॥**

९. प्रश्न विचारण्यासाठी वक्त्याने अनुमोदन दिल्याचे पाहून श्रोते विचारतात की- पतिव्रता धर्मामध्ये गहन सामर्थ्य आहे हे आपण कशासाठी सांगत आहात?
१०. त्यासोबतच पातिव्रत्याचे फळ काय तेही आपण सर्व काही सांगावे. आणि पुरुषाने केलेल्या तपापेक्षा देखील श्रेष्ठ आहे असे आपण काय म्हणून सांगत आहां?

**कौषिक* ब्राह्मणाच्या तपाहून । पातिव्रत्याचें श्रेष्ठपण ।**
**हें वनपर्वी निरूपण । ऐकिलें आम्हीं ॥११॥**

पाठभेद - हें ऐकिले निरुपण । महाभारतारण्यपर्वी ॥११॥

**तरी ही आशंका फेडावी । ऐसी उक्ति ऐकूनि बरवी ।**
**वक्त्यातें ज्ञानरवी । उजळला वाटे ॥१२॥**

११. कौशिक नावाच्या ब्राह्मणाच्या तपाहून पतिव्रताधर्माचे श्रेष्ठत्व अधिक आहे हे महाभारतातील वनपर्वात निरूपण केल्याचे आम्ही ऐकले आहे.
१२. 'हा वरील संशय दूर करावा.' श्रोत्यांचे हे बोलणे ऐकतांच श्रोत्यांच्या

हृदयात विषय समजून घेण्याची इच्छा उत्पन्न झाल्याचे पाहून, श्रोत्यांचे ठिकाणी ज्ञानसूर्याची प्रभा फांकत आहे असे वक्त्याला वाटून, आनंद झाला.

### *कौशिक ब्राह्मणाची कथा*

*एक कौशिक नावाचा ब्राह्मण होता. त्याने वनांत तप केले. एकदां तो झाडाखाली ध्यानस्थ बसला असतां एका घारेने केलेले मलविसर्जन मुनीच्या शिरावर पडले. त्याने क्रोधाने वर पाहिले. त्या क्रोधाग्नीत ती घार जळून राख झाली. तेव्हा त्याच्या लक्षात आले की आपले तप पूर्ण झाले. तो तपश्चर्या पूर्ण करून निघाला. दुपारचे वेळी एका गांवात शिरला. तेथे एका ब्राह्मणाचे घर पाहून त्याने भीक्षा मागितली. तेव्हा गृहस्वामिनी समोर आली. तिने त्याला सांगितले की ''मी आपणाला भिक्षा वाढते. पण थोडा वेळ थांबा. माझे पती आतांच बाहेरून श्रमून आले आहेत. त्यांना पाणी वगैरे देऊन मी येते.''*

*थोडा वेळ थांबा म्हटल्याबरोबर तपस्व्याचा राग अनावर झाला. तो रागावलेला पाहतांच ती महान पतिव्रता त्याला म्हणाली. ''मी काही ती घार नव्हे की तुमच्या क्रोधाग्नीने जळून जाईन. थोडे थांबा''*

*हे ऐकताच कौशिक ब्राह्मण आश्चर्यचकित झाला. हा प्रसंग हिला कसा कळला हे त्याला समजेना! तो थांबला. काही वेळाने ती आली आणि म्हणाली ''तुम्ही काशीला जा. तेथे सज्जन-कसाई राहतात. ते ज्ञानी सत्पुरुष आहेत. ते तुम्हाला आत्मज्ञानाचा उपदेश करतील''*

*कौशिकाने विचारले, ''माते, तुला पक्षी भस्म झाल्याचा प्रसंग कसा काय समजला?''*

*ती म्हणाली - ''मी पतिसेवेवाचून काहीही करीत नाही. पतिव्रताधर्म हीच माझी उपासना आहे त्यामुळे तूं येथे कां आलास आणि तुला काय हवे ते मला सारे समजले. तूं सजन कसायाकडे जा आणि तुझे मनोरथ पूर्ण होतील.''*

*(महाभारत वनपर्व)*

**म्हणे तुम्ही धन्य सज्जन । तुमचेनि वक्त्या वक्तेपण ।**

**तुम्हां ऐसे जोडलिया निधान । तरी मग न्यून काय असे ॥१३॥**

**तुम्ही विवेकसागर । तुम्ही चातुर्य वैरागर ।**

**वैराग्याचें आगर । थोर तुम्ही ॥१४॥**

१३. वक्ता श्रोत्याची स्तुति करतो - वक्त्याला वक्तेपणा श्रोते असल्यामुळे येतो. तुम्ही धन्य आहात. तुमच्यासारखे निधान मिळाल्यानंतर मग वक्ता हातचे राखून सांगणार आहे काय?

18



१४. तुम्ही विवेकाचे समुद्र आहात. तुम्ही चातुर्याचे वैरागर (व्यापारी) आहात. (तुम्ही चातुर्याने प्रश्न विचारता आणि श्रोत्यांकडून ज्ञानाचे भांडार प्राप्त करून घेतां) तुम्ही वैराग्याचे अथांग ठेवा आहात. असा तुमचा थोरपणा काय वर्णावा?

संमति-ओवी.

**अहो चंद्रकांत द्रवतां कीरु होये । परीतें हातवटी चंद्रींचि आहे ।**

**तैसा वक्तां तो वक्ता नोहे । श्रोतेनि वीण ॥ ज्ञाने.९-२९**

अर्थ - चंद्रकांत मण्यापासून अमृत स्रवते पण केव्हां चंद्र उगवतो तेव्हा ! पण ही कला चंद्राचेच ठिकाणी आहे. त्याप्रमाणे श्रोत्याने उत्तम प्रश्न विचारला की त्याचे पूर्ण समाधान करण्यासाठी वक्त्याला उत्साह येतो. आणि तो प्रस्तुत विषय उत्तम रीतीने समजावून सांगतो. म्हणून श्रोत्यांशिवाय वक्त्याला वक्तेपण नाही.

**म्हणोनि तुमची बुद्धि । प्रशंसिता विचारनिधि ।**

**तरी प्रशंसनयोगी । समाधि लागो पाहे ॥१५॥**

**असो स्मरोनि अलंदिपति । उत्तर विवेकें यथामति ।**

**काढोनि घ्यावे निश्चिती । आपलें आपण ॥१६॥**

१५. म्हणून हे श्रोत्यांनो, तुमच्या सखोल विचारांचा ठेवा असलेल्या बुद्धीची स्तुति करताना - प्रशंसा करता करता तेथेच समाधि लागूं पहाते.

१६. असो, हे श्रोत्यांनो, तुम्ही आळंदीश्वरांचे स्मरण करा आणि खरे काय खोटे काय याचा विवेक करून आपल्या इच्छेनुसार माझेकडून तुमच्या प्रश्नाचे उत्तर तुम्ही आपणच काढून घ्या.

**पुरुष तप करी जेव्हां । कांहीं संकल्प असे तेव्हां ।**

**''ममात्मनः फलप्राप्त्यर्थ'' म्हणोनि भावा । करणें पडे ॥१७॥**

**''स्वर्गकामो यजेदिति'' । ऐसी ही आड ये श्रुति ।**

**एवढा दुर्यत्न स्त्रियां प्रति । न घडे कदा ॥१८॥**

१७. पुरुष जेव्हा तप करतो तेव्हा मनात काही तरी इच्छा असते. ती पूर्ण होण्यासाठी मी अमुक अमुक फल मिळावे म्हणून तपाचा आरंभ करीत आहे अशी भावना असते. म्हणजे कामना-संकल्पच तो करीत असतो.

१८. किंवा ''स्वर्ग मिळण्याच्या इच्छेने यज्ञ करावा'' ही फलाकांक्षा व्यक्त करणारी श्रुती निष्काम शुद्ध प्रेमाच्या आड येते. म्हणजे कोणतेही कर्म किंवा तप

हे सकामच होते. निष्काम होत नाही. म्हणजे हा सर्व खटाटोप चुकीचा दुर्यत्न होऊन बसतो. ही मनाची सकाम होणारी दुःस्थिति स्त्रीयांना कधीच प्राप्त होत नाही.

**स्त्रियांचा पातिव्रत्यीं श्रम । तो त्यांना वाटे आपुला धर्म ।**

**म्हणोनि तयांचें तें कर्म । सहज होय ॥१९॥**

**मायबापगृहाहोनी । शिक्षणाच्या योगें करोनी ।**

**स्त्रियांच्या येत आंगवळणी । पातिव्रत्य तें ॥२०॥**

१९. पतिव्रता धर्म पाळताना, पतीची सेवा करताना स्त्रीला श्रम होतात. पण ''आपण आपला धर्म पाळीत आहो'' अशीच त्यांची मानसिकता असते. म्हणून त्यांचे पतिसेवेचे सर्व कर्म आनंदाने सहज रीतीने श्रम न होता होते.

(पुरुषांना धर्मासाठी प्रयत्न करावे लागतात तर पतिव्रताधर्म स्त्रियांच्या आंगवळणी पडलेला असतो)

२०. आईवडिलांच्या घरीच आईच्या शिकवणीमुळे पातिव्रत्य स्त्रीयांच्या आंगवळणी पडलेले असते. अनेक सण असे आहेत की त्यांचे द्वारा पतिव्रता धर्म लहानपणीच मुलींच्या मनात रुजविला जातो.

**अंगवळणीं पडतां धर्म । तरी तो सहज हों लागे निष्काम ।**

**जेथ सायासाचें कर्म । तेंचि सकाम होवों लागे ॥२१॥**

**जैसे प्रातःकाळीं उठावें । हें बहु लोकांसी कळें स्वभावें ।**

**परी तत्फलाकडे धांवे । न घेती कोणी ॥२२॥**

२१. असा अंगवळणी पडलेला धर्म आपोआप निष्काम होऊ लागतो. जे कर्म करण्यासाठी कष्टपूर्वक प्रयत्न करावे लागतात तेथे फलाची इच्छा उत्पन्न होते. पण येथे उलट स्थिती असते.

२२. ज्याप्रमाणे प्रातःकाळी उठावे हे पुष्कळ लोकांना आपोआप कळते व ते प्रातःकाळी सहज (प्रयत्न न करता) उठतात. पण प्रातःकाळी उठण्याचे फळ कोणते मिळते, याकडे त्यांचे लक्ष जातच नाही.

**कीं जयाचा गोड बोलणें स्वभाव । तो तत्फल न इच्छी सावेव ।**

**कीं नदीचा प्रवाह । परी फल कांहीं नेणे ते ॥२३॥**

**की वृक्ष करी परोपकार । परी फळ किडाळ नेणे समग्र ।**

**कीं जग निववितो जलधर । फळावीण ॥२४॥**



२३. ज्याचा गोड बोलण्याचा स्वभाव आहे त्याला त्या गोड बोलण्याचे फळ मिळाले पाहिजे अशी इच्छाच होत नाही.

अमुक काम व्हावे म्हणून अमुकाशी गोड बोलले पाहिजे या प्रकारचे विचार त्याच्या मनात येतच नाहीत.

जसा नदीचा प्रवाह स्वाभाविक रीतीने वाहत असण्याने त्याचे आजूबाजूची जमीन सुपीक होते पण प्रवाहाला काही फळ मिळते काय?

२४. वृक्ष परोपकार करतो आणि फळे इतरांना देतो. स्वतः घेतो काय? मेघ सर्व सृष्टीला वृष्टी करून शांत करतात. पणमेघांना त्याचे फळ नको असते.

**तैसें जें कर्म पडे अंगवळणीं । त्याचें फळ नेच्छी कोणी ।**

**ते सहजचि काय मनी वाणी । घडोनि येत ॥२५॥**

**सायास जेथ कांही । तेथ मी कर्ता ही बुद्धि पाहीं ।**

**वारंवार ये लवलाहीं । प्रत्ययासी ॥२६॥**

२५. त्याप्रमाणे जे कर्म अंगवळणी पडून जाते त्यांचे फळ कोणी इच्छित नाही. ते शरीराकडून, मनाकडून आणि वाणीकडून अप्रयत्नपूर्वक सहज घडून येते.

२६. जे कर्म करताना कष्ट होतात ते कर्म मी करीत आहे अशी बुद्धी होते. याचा आपल्याला नेहमीच अनुभव येत असतो.

**आणि सहज कर्म जें होत । ते झालें तैसें कोणीकडे जात ।**

**त्याची आठवणही राहात । नाहीं केव्हां ॥२७॥**

**जैसे मार्गी चालतां । चहूंकडे पाहती तत्त्वतां ।**

**परी जे सुंदर वाटे सर्वथा । त्याचीच आठवण ये ॥२८॥**

२७. आणि जे कर्म सहजरीतीने होते ते कसे झाले, काय झाले, कुठे गेले याची कधी आठवणही राहत नाही.

२८. रस्त्याने जात असताना आपण इकडे तिकडे पाहत असतो. पण जे सुंदर वाटते त्याचीच आठवण येते. बाकी सर्व विसरले जाते.

**एरव्ही पाहणें तें सहज । तेवीं या कर्मा माजी गुज ।**

**जें अंगवळणीं पडे सहज । कर्म तें बा ॥२९॥**

**म्यां आज इतुकें कर्म केलें । हें नाठवें कांहीं केलें ।**

**आणि जें कर्म संकल्पें आरंभिलें । त्याची स्मृति ये वेळोवेळीं ॥२३०॥**

२९. आपण सहज पाहतो आणि विसरून जातो. तेच या सहजकर्मातील रहस्य आहे. जे आंगवळणी पडलेले कर्म असते तेच सहजकर्म होय.
३०. मी आज दिवसभरात अमुक अमुक कर्म केले याची आठवणही राहत नाही. पण ''मी आता अमुक करणार'' असा संकल्प करून ज्या कर्माचा आरंभ असतो त्याची वारंवार आठवण येत असते. **(य१५पा१२४)**

**वेळोवेळीं आठवण । कीं मीं हें कर्म करीं आपण ।**

**म्हणवोनि कर्तृबुद्धि दारुण । दृढ होय ॥३१॥**

**तपादिकांसि पाहतां । आरंभ असे तत्वतां ।**

**तेथ संकल्प येत असे माथां । कर्तृबुद्धि ॥३२॥**

३१. मी हे कर्म करीत आहे, अशी वेळोवेळी जाणीव असते. म्हणून मी कर्म करणारा आहे असा निश्चय दृढ होतो.
३२. तप करताना त्याचा आरंभ असतो व त्या वेळी 'मी तप करणार' या संकल्पामुळे मी कर्ता आहे ही कर्तृबुद्धी बोकांडी बसते.

**तप करूनि सोडणें कर्तृत्वमती ।**

**यास नित्यकर्माहूनि शतगुण सायास लागती ।**

**नित्य कर्म सहज रीति । निष्काम होय ॥३३॥**

**तें स्त्रियांच्या ठायीं । पातिव्रत्य सहज पाहीं ।**

**आणि पतिचि लवलाहीं । ईश्वर मानिती ॥३४॥**

३३. प्रथम तप करावयाचे नंतर मी तप केले ही बुद्धी सोडून द्यावयाची हे फारच कठीण आहे. नित्यकर्माची कर्तृत्व बुद्धी सोडण्यापेक्षा येथे शंभर पटींनीं जास्त सायास (प्रयत्न) लागतात. उलट नित्य कर्माची कर्तृत्वबुद्धी सहज लवकर जाते व कर्ता निष्काम होतो.
३४. त्याप्रमाणे स्त्रियांच्या ठिकाणी पतीवर स्वाभाविक प्रेम असल्यामुळे पातिव्रत्य विना सायास सहजरूपाने असते. आणि तो पति हाच ईश्वर आहे असे ती लहानपणापासूनच्या संस्कारामुळे मानीतही असते.

**ईश्वरहोय जगत्कर्ता । पति उदरीं गर्भदाता ।**

**या अनुभवें तत्वतां । पतिवरि ईश्वरता दृढ होय ॥३५॥**

**जन्मदाता माता पिता । तेही उपयोगी न पडे सर्वथा ।**

**परावा असोनि पति उपयोगिता । येणें ईश्वरता दृढ होय ॥३६॥**





३५. ज्याप्रमाणे ईश्वर जगताचा कर्ता आहे त्याप्रमाणे पती देखील गर्भ स्थापन करणारा आहे असे अनुभवल्यामुळे तिची पतीवरील ईश्वरभावना अधिक पक्की होते.
३६. जन्म देणारे मातापिता असले तरी तेही काही उपयोगी पडत नाहीत. पण पती परका असून आपल्याला अत्यंत उपयोगी पडतो हे पाहून पतीचे ठिकाणी 'तो ईश्वर आहे' ही भावना दृढ होते.

**प्रत्यक्ष जो उत्पन्न कर्ता । त्या पितया वरि न चले सत्ता ।**

**रुसवा पतीवरी सर्वथा । येणें ईश्वरता दृढ होय ॥३७॥**

**सात पाऊलें चालतां । पतिसख्य कळे तत्वता ।**

**पाणिग्रहणें पति सांभाळिता । येणें ईश्वरता दृढ होय ॥३८॥**

३७. जो आपल्याला उत्पन्न करतो त्या पित्यावर स्त्रीची सत्ता चालत नाही आणि क्षणोक्षणी पित्याची आज्ञा पाळावी लागते. उलट पतीवर रागावता येते सर्व रुसवाफुगवा काढता येतो. त्यामुळे पतीचे ठिकाणी ईश्वरबुद्धी अधिक दृढ होते.
३८. पतीबरोबर सप्तपदी चालल्याबरोबर तो आपला सखा आहे हे पत्नीला कळते. आणि तिचा हात ग्रहण केल्यामुळे तो आपणाला सांभाळणार आहे या भावनेने तो रक्षण करणारा ईश्वर आहे असे ही भावना दृढ होते.

**सावित्री रमा हिमाद्रिसुता । अरुंधति अनसूया माता ।**

**यांचे इतिहास भावें ऐकितां । पतिवरी ईश्वरता दृढ होय ॥३९॥**

**की त्यागितां पतीतें सहज । जारपणें वाढेल रज ।**

**या पापाच्या भयें सहज । दृढ होय ईश्वरता ॥४०॥**

३९. सावित्री, लक्ष्मी, पार्वती, अरुंधती आणि अनसूया या मातृरूप स्त्रियांचे इतिहास सद्भावनेने ऐकले असता पतीच्या ठिकाणी ईश्वरभावना दृढ होते.
४०. पतीला त्यागून इतरत्र गेल्यामुळे जाराची संगत होऊन रजोगुण वाढेल या पापाच्या भयाने पतीच्या ठिकाणी ईश्वरताच दृढ होते.

**पतिव्रतेनें पतिसेवा केली । तें कामना धरोनि केली ।**

**ऐसी ग्वाही नाहीं देखिली । पुराणीं कोठें ॥४१॥**

**पुत्रकामना धरून । पतिसेवा केली याचें उदाहरण ।**

**ऋषिपत्न्यांविषयीं जाण । आहे जरी ॥४२॥**

४१. पतिव्रतेने पतीची सेवा कोणती कामना धरून केली याचा पुरावा कोणत्याही पुराणात नाही.
४२. पुत्राची कामना धरून पतिसेवा केली याचे उदाहरण ऋषिपत्न्यांविषयी जरी असले तरी,

**तरि पुत्र जो होत । तो पतिसह आपल्या उपयोगी पडत ।**

**केवळ आपुलिया भोगासाठीं निश्चित । कामना नसे पतिव्रतांची ॥४३॥**

**किंचित् कामना जरी । त्यांतहि पतीचें हित तरी ।**

**केवळ पतिव्रता ती निर्विकारी । निष्काम सेवा करी सहज ॥४४॥**

४३. तरी जो पुत्र होतो तो पति व स्त्री दोघांच्याही उपयोगी पडतो अशी भावना तिच्या ठिकाणी असतेच म्हणून केवळ स्वतःच्या भोगासाठी पतिव्रतांची कामना नसते.
४४. स्वतःविषयी किंचित कामना जरी असली तरी त्यातही पतीचे हित ती पाहतेच. आणि जी निर्विकार पतिव्रता असते तीची मात्र निष्काम सेवा सहजभावाने असते.

**तपादिकांच्या ठायीं । निष्कामता सायासें येई ।**

**आणि पातिव्रत्याच्या ठायीं । निष्कामता सहज असे ॥४५॥**

**सकाम तपाचीं उदाहरणें । बहुत देती निगम पुराणें ।**

**सकाम पातिव्रत्याचीं उदाहरणें । क्वचित् सांपडती ॥४६॥**

४५. जेव्हा तप केले जाते तेव्हा त्या तपाचे फळ मिळावे असे मनाला वाटत असते. निष्कामता येण्यासाठी प्रयत्न करावा लागतो.पण पातिव्रत्याचे ठिकाणी निष्कामता सहजच असते.
४६. कोणत्या तरी इच्छेने केलेल्या तपाची उदाहरणे वेद-पुराणात पुष्कळ आहेत. पतिव्रता असून त्या सकाम आहेत अशी उदाहरणे मात्र क्वचितच सापडतात.

**जो जों करी कामपूर्ती । तेथ जीवाची सहज प्रीति ।**

**पतीनें स्त्रियांची काम पूर्ति । म्हणूनहि प्रीति सहज होय ॥४७॥**

**याचियाकारणें करून । पतिव्रतांचे शुद्ध मन ।**

**शीघ्र होय न करितां साधन । वेदोक्तही ॥४८॥**



४७. ज्याने ज्याने इच्छा पूर्ण होतात तेथे जीवाला सहजच प्रेम असते. तसेच पतीमुळे स्त्री कामपूर्ति होत असल्याने पतीचे ठिकाणी त्यांचे प्रेम सहजच असते.
४८. याप्रमाणे पतिव्रतांचे मन वेदात सांगितलेली साधना न करताही लवकर शुद्ध होते.

**याचि अभिप्रायें करूनि । वराहमिहिरांनीं स्तविल्या कामिनी ।**

**नाहीं स्तविल्या जारिणी । कुटिलमति ॥४९॥**

**तो बृहत्संहितेंत अध्यावो । इच्छा तरी वाचोनि पाहावो ।**

**तात्पर्य पतिव्रता स्वयमेवो । स्वधर्मनिष्ठ निष्काम ॥५०॥**

४९. यामुळेच वराहमिहिरांनी स्त्रियांची स्तुति केली आहे. पण त्यांनी कुटिलमती आणि जारिणी स्त्रियांची स्तुति केलेली नाही.
५०. यासाठी इच्छा असेल तर बृहत्संहितेतील अध्याय (?) वाचून पहावा. असो. तात्पर्य असे की स्त्रियांनी पतिव्रता धर्माचे म्हणजे स्वधर्माचे निष्ठेने पालन केले असता त्या आपोआप निष्काम होतात.

**येथें शंका येईल कोणा । कीं पती तो मनुष्य जाणा ।**

**मग पतिव्रतेस जीवोपासना । घडेल सहज ॥५१॥**

**जीवोपासना तंव कहीं । श्रुतींत बोलिली नाही ।**

**ईश्वरोपासना लवलाहीं । बोलिली सकळ ॥५२॥**

५१. शंका :- येथे कोणाला शंका येईल की पती हा तर मनुष्य आहे. आणि स्त्रीने पतीची उपासना केली तर ती जीवोपासना होईल.
५२. आणि वेदांमध्ये जीवोपासना काही सांगितलेली नाही. उलट ईश्वरोपासनाच सर्वत्र सांगितल्या आहेत.

**''सर्वत्र प्रसिद्धोपदेशादिति'' । ''विवक्षित गुणोपपत्तेश्च'' निश्चिती ।**

**''अनुपपत्तेस्तु न शारीरः'' इति । ईशाप्रति उपास्यता ॥५३॥**

**एवं ब्रह्मसूत्राभिप्रावो । तरी तो पतिव्रतेसि केविं फळ भावो ।**

**कारण पति स्वयें जीवो । आहे म्हणूनि ॥५४॥**

५३. या तिन्ही ब्रह्मसूत्रांनुसार जीवोपासनेचा निषेध करून ईश्वरोपासनाच प्रतिपादन केलेली आहे.

५४. याप्रमाणे ब्रह्मसूत्रांचा अभिप्राय आहे. त्यामुळे पतिव्रतेला ईश्वरोपासनारूपी फळ कसे मिळेल? कारण स्त्रीला उपास्य असलेला पती जीव आहे.

**तरी याचें उत्तर । जैसे शालिग्रामावर ।**

**विष्णुबुद्धि करिती विप्र । पूजिती भावें ॥५५॥**

**तें विष्णु म्हणूनि पूजिता । शिलादिकधर्म न येती चित्ता ।**

**तैसी पतिगुणदोष पतिव्रता । सर्वथा न पाहे ॥५६॥**

५५. समाधान :- तरी याचे उत्तर ऐक. ज्याप्रमाणे ब्राह्मण शालिग्राम हा साक्षात् विष्णु आहे अशी विष्णुबुद्धी करून प्रेमभावाने पूजन करतात.

५६. ते शालिग्रामाला विष्णु म्हणून पूजतात त्यामुळे त्यांच्या चित्तात शालिग्रामाचे पाषाणादि धर्म येत नाहीत. त्याप्रमाणे पतीचे मानुषधर्मातील गुण-दोष पतिव्रता पाहत नाही. तिच्या मनात 'आपला पती जीव आहे' असे येतच नाही.

**मूर्त्यादि शिलाभिशुद्धि । तेथ जरी होय भगवद्‌बुद्धि ।**

**पतीतें त्याहूनि चेतनसिद्धी । तेथ ब्रह्मबुद्धि कां न होय ॥५७॥**

**गुरूपासनेकरोन । शिष्यातें जैसा ईश्वर प्रसन्न ।**

**पत्युपासनेकरोन । स्त्रियातें तैसा ॥५८॥**

५७. मूर्तीची पूजा करताना ती दगडाची वगैरे असली तरी तिचे जडत्वादि सर्व धर्म वेगळे करून, तिचे ठिकाणी शुद्ध ब्रह्माची भावना करून भगवद्‌बुद्धी जर होऊं शकते तर पती हा त्या जड पाषाणापेक्षा अधिक चैतन्ययुक्त असतो; त्याचे ठिकाणी ब्रह्मबुद्धी कां होऊ नये.

५८. गुरूची उपासना केली असता ईश्वर शिष्याला जसा प्रसन्न होतो त्याप्रमाणे पतीची ईश्वरबुद्धीने उपासना केली तर स्त्रियांवरही तो तसाच प्रसन्न होतो.

**आणि सहज निष्काम उपासना । म्हणोनि शीघ्र हरीतें करुणा ।**

**येवोनि पतिव्रता मना । शुद्ध करी तो ॥५९॥**

**कर्म उपासना भिन्न । हे पुरुषातें करणें पडे गहन ।**

**आणि पातिव्रत्यचि कर्म पूर्ण । पातिव्रत्य उपासना स्त्रियां ॥६०॥**



५९. स्त्रियांनी केलेली ही पातिव्रत्य उपासना निष्काम आणि सहज असते म्हणून श्रीहरीला ताबडतोब करुणा येते आणि तो पतिव्रतेचे चित्त शुद्ध करितो.

६०. नित्यनैमित्तिकादि शास्त्रीय कर्म आणि भगवद् विग्रहाची उपासना या वेगवेगळ्या दोन कठीण गोष्टी पुरुषाला प्रयत्नपूर्वक कराव्या लागतात.

या उलट पातिव्रत्य हेच स्त्रीचे धर्मशास्त्रोक्त कर्म असून तीच स्त्रीची उपासना देखील आहे.

**एवं कर्म उपासना । दोही ठायीं अद्वैत वासना ।**

**होय म्हणोनि सहज मना । मलविक्षेप सोडिती ॥६१॥**

**दोन्ही दोष सहज जाती । तेणें शुद्धता आणि एकाग्रता चित्तीं ।**

**येवोनि सुखाच्या शिरा वरुती । श्रेष्ठ ती होय ॥६२॥**

६१. याप्रमाणे कर्म आणि उपासना या दोन्ही एकच होऊन जातात. म्हणून मनाचे मल आणि विक्षेप नाहीसे होतात. कर्मफल म्हणजे मलदोष नाहीसा होऊन चित्ताची शुद्धी होते आणि उपासनेने मन एकाग्र होऊन विक्षेप दोष दूर होतो.

६२. दोन्ही दोष सहजरीतीने कष्ट न करता नाहीसे होतात. त्याने चित्त शुद्ध होते आणि चित्ताची एकाग्रताही साधली जाते.

या रीतीने पतिव्रता सुखाच्या शिखरावर आरूढ होते. आणि तिला श्रेष्ठत्व लाभते.

**एक मात्र उरे ज्ञान । तें तो नोहे श्रवणादिविण ।**

**परी केवळ पातिव्रत्यें करून । ब्रह्मलोक फळ मिळे ॥६३॥**

**तेथ तियेतें मिळे पति । सेवा करी निष्काम रीती ।**

**म्हणोनि शेवटीं सत्त्व चित्तीं । वाढोनि ज्ञान अवश्य होय ॥६४॥**

६३. मग एक ज्ञान प्राप्त करण्याचे उरते. ते मात्र श्रवण-मनन निदिध्यासना शिवाय होऊ शकत नाही. आणि ज्ञानापर्यंत पोहचण्या आधी जर तिचा मृत्यू झाला तर ती पातिव्रत्याच्या बळाने ब्रह्मलोकाला जाते.

६४. तेथे तिला तिचा पती मिळतो. ती पतीची निष्काम होऊन सेवा करते. त्यामुळे तिच्या ठिकाणी सत्त्व वाढते आणि ज्ञान अवश्य होते.

**एवं येथ किंवा ब्रह्मलोकांत । ज्ञान पातिव्रत्यांकित ।**

**म्हणोनि पतिहूनि विख्यात । कीर्ति पतिव्रतेची ॥६५॥**

**आधीं उमा मग महेश्वर । आधीं लक्ष्मी मग नारायणोच्चार ।**

**आधीं सीता मग रामचंद्र । आधीं राधा मग कृष्ण ॥६६॥**

६५. याप्रमाणे इहलोकात असो की ब्रह्मलोकात असो ज्ञान पातिव्रत्याच्या स्वाधीन असते. म्हणून पतिव्रता ज्ञानसंपन्न होतच असते. अशी पातिव्रत्य धर्माची स्थिती असल्यामुळे पतिव्रतेची कीर्ति पतीपेक्षा अधिक विख्यात आहे.

६६. देवांची नांवे घेताना देखील, आधी उमेचे व नंतर महेश्वराचे, आधी लक्ष्मीचे व नंतर नारायणाचे, आधी सीतेचे मग रामाचे, पहिले राधेचे व नंतर कृष्णाचे; असा उच्चार केला जातो.

**अत्रिहूनि तत्त्वतां । अनसूया कीर्ति श्रुत बहुतां ।**

**लोकांमाजी मातापिता । ऐसेंचि म्हणती ॥६७॥**

**आधीं पुरुष मग उच्चारी प्रकृति । तरी तो होय मातृघाती ।**

**ऐसें निरूपण ब्रह्मवैवर्तीं । केलें आहे ॥६८॥**

६७. अत्रिऋषींपेक्षा त्यांची पत्नी अनसूया मातेची कीर्ति सर्व जगाला माहीत आहे. आणि लौकिक व्यवहारात देखील मातापिता असेच म्हटले जाते.

६८. आधी पुरुषाचा उच्चार करून नंतर प्रकृतीचा उच्चार केला तर त्याला मातृघाताचे महापाप लागते असे ब्रह्मवैवर्त पुराणात वर्णन केले आहे.

श्लोक :-

**आदौ पुरुषमुच्चार्य पश्चात्प्रकृतिमुच्चरेत् । स भवेन्मातृघाती च . . . ।**

श्लोकार्थ :- आधी पुरुषाचा उच्चार करून नंतर प्रकृतीचा उच्चार करतो तो मातेचा घात करणारा होतो.

**"विष्णुपत्निं नमस्तुभ्यं" इत्यादि वचन । समासान्तपद म्हणोन ।**

**अन्त्यशब्दा मुख्यपण । सहज आलें ॥६९॥**

**पुरुष यज्ञ करी जेव्हां । पशु-मांस घाली तेव्हां ।**

**आणि पतिसहगमन स्त्री करी जेव्हां । तेव्हां स्वदेह ही समर्पी ॥७०॥**

६९. विष्णुपत्निं नमस्तुभ्यं - यात महत्व पत्नीलाच आहे. पण यातील पत्नि हे पद समासाच्या शेवटी असल्याने. शेवटच्या शब्दाला आपोआप मुख्यत्व आले आहे. म्हणून वरील आक्षेप राहत नाही.

७०. पुरुष यज्ञ करतो तेव्हा तो पशूच्या मांसाची आहुती देतो. आणि पत्नि जेव्हा सहगमन करून सती जाते तेव्हा स्वतःच्या देहालाच अग्नीत समर्पण करते.





**एवं यज्ञकर्माहून । पतिव्रतेचें धैर्य गहन ।**

**येणें तपेंहि नारायण । तुष्टें सहज ॥७१॥**

**असो आतां नाना रीती । आशंका घेतली होती श्रोतीं ।**

**त्याचें उत्तर यथामति । दिधलें आहे ॥७२॥**

७१. याप्रमाणे यज्ञादि कर्माच्या कठीणतेपेक्षा पतिव्रतेचा धर्म अधिक कठीण आहे आणि गहनही आहे. पातिव्रत्य आचरण्याला अधिक धैर्य लागते. अशा या पातिव्रत्य धर्माच्या तपामुळे भगवान् नारायण सहजच संतुष्ट होतात.

७२. असो. या पातिव्रत्य धर्मासंबंधी श्रोतृवर्गाने नाना प्रकारच्या शंका घेतल्या होत्या त्यांची उत्तरे माझ्या बुद्धिनुसार मी दिली आहेत.

**एथ उणें पुरें कांही । तें योग्यसें करा चतुर सर्वही ।**

**मी तों स्वयें ज्ञानेश्वरपायीं । कविता अर्पोनि तटस्थ ॥७३॥**

**ज्ञानेश्वर माय माउली । तियेचीं वंदोनि पाउलीं ।**

**माये पतिव्रता यश खोली । उघडीं कृपें ॥७४॥**

**हरिः ॐ तत्सत् श्रीमत्सद्‌गुरु ज्ञानेश्वरकृपाप्रसादे ओवीछंदबद्धे**

**पतिव्रताचरितामृते अर्थवादरहितवस्तुतयैव**

**पातिव्रत्यस्य सम्यक् सामर्थ्यवर्णनं**

**नाम तृतीयोध्यायः ॥**

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

७३. आपण सारे चतुर आहात, सज्जन आहात. या ठिकाणी मी जे काही बोललो त्यातील काही कमीजास्ती असलेले चांगले करून घ्या ही आपणा श्रोत्यांना विनवणी करतो. आणि मी मात्र ही माझी कविता श्रीज्ञानेश्वरांचे पायी समर्पण करून कर्तृत्वाहंकाराहून वेगळा होतो.

७४. हे ज्ञानेश्वर मायमाउली तुझ्या चरणांना वंदन करतो. हे माते, ज्या पतिव्रताधर्माने स्त्रियांना जे अपार यश मिळते त्याची सखोलता आणि सूक्ष्मता यांची सर्व उकल करून दे.

हरिःॐतत्सत् श्रीज्ञानेश्वरांच्या कृपाप्रसादाने ओवीछंदात सांगितलेले पतिव्रताचरितामृतातील अर्थवादरहित वस्तुस्थितिदर्शक पतिव्रताधर्माच्या सम्यक् सामर्थ्याचे वर्णन असलेला तृतीयाध्याय समाप्त झाला. तो श्रीकृष्णार्पण असो.

०००

# अध्याय ४ था

**॥ श्रीमत्सद्‌गुरु ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥**

**जय जय हिरगिरीनंदिनीवरा । जय भक्तमानसचकोरचंद्रा ।**
**जय रतिकांततातहृदयविहारा । काशीविश्वेश्वरा विश्वपते ॥१॥**
**जय त्रिशूलकर त्रिपुरहरा । जय त्रिनेत्र त्रिपथगाधरा ।**
**जय त्रिमात्रत्रिलोकेश्वरा । कर्पूरगौरा त्रिगुणरहिता ॥२॥**

१. हे हिमालयकन्येचे पती असलेल्या शंकरा, तुम्ही भक्तांच्या मनरूपी चकोर पक्ष्याला अमृत पाजणारे चंद्र आहात, रतीचा कांत जो मदन त्याचा पिता भगवान् श्रीकृष्ण, अशा कृष्णाच्या हृदयात विहार करणाऱ्या हे काशीविश्वेश्वरा तुमचा जयजयकार असो.

२. हे त्रिशूलधारी, त्रिपुरासुराच्या तीनही नगरींचा नाश करणाऱ्या, त्रिनेत्रा, स्वर्ग पृथ्वी व पाताळ या तिन्ही लोकांना पावन करणाऱ्या गंगेला शिरावर धारण करणाऱ्या, ब्रह्मा-विष्णु–महेश या तिन्ही रूपांनी विलसणाऱ्या, तिन्ही लोकांच्या स्वामी असलेल्या, कर्पूरासारखा गौरवर्ण असणाऱ्या, सत्त्व-रज–तम या तिन्ही गुणांहून अलग असणाऱ्या शंकरा तुझा जयजयकार असो.

**जय चक्रचालका चक्रधरप्रिया । जय भवविलासहा, कैलासविलासिया ।**
**जय भक्त काम प्रपूरणोल्हासिया । कामनातीता कामदहना ॥३॥**
**जय जय निराकार लिंगात्मका । जय भक्तमनोहर सगुण शालिका ।**
**जय गणेशतात गौरिवामांका । फणिभृत ग्रैवेहका पशुपते ॥४॥**

३. हे, सृष्टीचे चक्र चालविणाऱ्या, ज्याच्या हातात सुदर्शन चक्र आहे अशा विष्णूला प्रिय असणाऱ्या, संसाराच्या मिथ्या विलासाला नष्ट करणाऱ्या कैलासात विलास करणाऱ्या, भक्तांच्या इच्छा पूर्ण करण्यात अतिशय उत्साही असणाऱ्या, सर्व कामनांच्या पलीकडे असणाऱ्या, कामरूप मदनाला जाळून टाकणाऱ्या, शंकरा तुझा जयजयकार असो.

४. निराकार हेच आत्मचिन्ह असणाऱ्या, भक्तांचे मन हरण करणाऱ्या, सगुण पिंडीच्या रूपाने असणाऱ्या, गणेशाचा पिता असणाऱ्या, गौरीला वामांकी धारण करणाऱ्या, गळ्यात नाग असणाऱ्या पशुपते, तुझा जयजयकार असो.



**जय विभूतिचर्चन विभूतिप्रिया । जय भवानीवरा भवाऽभया ।**
**जय भवभयहरा भव हृदयहृदया । कारणकार्यनियामका ॥५॥**
**जय पंचवक्त्रा द्विपंचकरा । जय द्विपंचशतवक्त्रभूषणधरा * ।**
**जय प्रपंचाश्रय प्रपंचहरा । पंचबाणदहना पंचम ब्रह्म ॥६॥**

५. भस्म लावलेल्या विभूती प्रिय असलेल्या, भवानीच्या पते, संसारी लोकांना अभय देणाऱ्या , संसारभयाचे निवारण करणाऱ्या, कारण व कार्य यांचे नियमन करणाऱ्या शंकरा तुझा जयजयकार असो.

६. पांच मुखे असलेल्या, दश हात असलेल्या, दहा हातामध्ये हजारो बाणांनी भूषित असलेल्या, प्रपंचाचा आधार असलेल्या आणि भक्तांच्या प्रपंचाचे हरण करणाऱ्या, पंचबाणधारी मदनाला भस्म करणाऱ्या, पंचम ब्रह्म असलेल्या शंकरा तुझा जयजयकार असो.*(*वक्त्र=बाणाची टोके. आपटे-शब्दकोश.)*

**जय जगद्‌गुरु करुणामूर्ते । जय निगमवर्णित अतर्क्यकीर्ते ।**
**जय गुणगणमंडित भवानीपते । पुढें ग्रंथातें चालविता तूं ॥७॥**
**मागील अध्यायीं निरूपण । पातिव्रत्य सामर्थ्य पूर्ण ।**
**आतां श्रोते सावधान । होऊनी अवधान असो द्या ॥८॥**

७. करुणेची साक्षात् मूर्ति असलेल्या जगद्‌गुरो, वेदांनी वर्णन केलेल्या, तर्काच्या अतीत कीर्ती असलेल्या, अनंतगुणांच्या समूहाने शोभायमान असणाऱ्या भवानीपते तुझा जयजयकार असो. या ग्रंथाची रचना करणारा तूंच आहेस.

८. मागील अध्यायात पतिव्रत्याचे पूर्ण सामर्थ्य वर्णन केले. श्रोत्यांनो आता सावध व्हा आणि लक्ष द्या.

**आज सकल तीर्थे आली घरा ।कीं उदय जाहला अमृतकरा ।**
**पतिव्रता चरितसुधा सुंदरा । सुजीवितवरा वरों आली ॥९॥**
**आजि मंगळा मंगळ भेटले । अजि सुखाचें पारणें फिटलें ।**
**आजि काळाचें संबंध तूटलें । अमृत प्रकटलें पतिव्रताचरित ॥१०॥**

९. या निरूपणाचे श्रवण करण्यास सर्व तीर्थे घरी आली आहेत की अमृताचा वर्षाव करणाऱ्या चंद्राचा उदय झाला आहे? अहो, जणु संजीवनी औषधींचा पती जो चंद्र त्याला पतिव्रताचरितसुधा वरण्यास आली.
(१ सु+जीवित=सं+जीवनी २ औषधींचा पती चंद्र)

१०. आज एका मंगलाला जणु दुसरे मंगल भेटले. अहो, माझ्या सुखाचे

पारणे फिटले म्हणजे सर्वोत्तम सुख मला मिळाले. काळाचे बंधन होते ते तुटले आणि पतिव्रताचारिताचे अमृत प्रगट झाले.

(संबंध=सम्यक् बंध)

**ज्या स्वयें पतिव्रता होती । त्या दुजिया तैसिया करिती ।**

**जेवीं ईश्वरावतार गुरु प्रकटती । मग ब्रह्म करिती मुमुक्षु जीवा ॥११॥**

**जीव अधिकारी साधनगुणें । प्रकटती तेवीं पतिव्रता व्हावया ही साधनें ।**

**श्रीनारदमुनीतें नारायणें । निरूपिलीं ॥१२॥**

११. ज्या स्वतः पतिव्रता असतात त्या दुसऱ्या स्त्रियांनाही संस्कार देऊन पतिव्रता करितात. ज्याप्रमाणे ईश्वरच प्रकट होऊन गुरूच्या रूपाने अवतार घेऊन इतर मुमुक्षूजनांना स्वतःसारखे ब्रह्मरूप करतो.

१२. जीवाचा अधिकार पाहून श्रीगुरु त्यांचेसाठी साधने प्रकट करतात. त्याप्रमाणे भगवान् नारायणाने स्त्रियांनी पतिव्रता व्हावे यासाठी नाना उपाय श्रीनारदमुनींना निरूपण केले.

संमति श्लोक :-

**क्षणो नास्तिरहोनास्ति नास्ति प्रार्थयिता जनः ॥**

**तेन नारद नारीणां पातिव्रत्यं हि जायते ॥९॥**

पतिसेवा करतानां क्षण आणि दिवस यांचा भेद मावळून जातो. प्रार्थना करणाऱ्या लोकांकडेही तिचे लक्ष नसते इतकी ती पतिसेवेत एकरूप होऊन जाते. हे नारदा, अशावेळी स्त्रीच्या ठिकाणी पतिव्रताधर्म उत्पन्न होतो. (य१५-१२८)

**पतिसह सर्वदा धर्माचरण । पत्यर्थास्तव गृहकार्यकरण ।**

**सासू श्वशुरादि वृद्धसेवन । ती जीवनसुखार्थ ॥१३॥**

**रजनीं पति सुखदानी शयनीं । जरी कामास्तव पति म्हणे स्वामिनी ।**

**तरी अहंकार वाढेल म्हणुनी । अनुत्सेकिनी स्वामिनित्वीं ॥१४॥**

१३. पतिव्रता ही धर्माचे आचरण करते ते पतिसह. पतीच्या सेवेसाठीच ती घरातील सर्व कामकाज करते. सासू सासरे वगैरे घरातील वडिल माणसांची सेवा करते. हे सारे पतीच्या जीवनात सुख नांदावे म्हणून.

१४. रात्री पतीला सुख देते. ते वेळी पतीने जरी कामपुरुषार्थासाठी म्हणून तिला स्वामिनी म्हटले तरी अहंकार वाढेल म्हणून स्वामिनी होण्याला ती





उत्सुक नसते.

**एवं पति सेवेवीण । न जाये सर्वथा क्षण ।**

**पतिचरणध्यानाविण । हृदयीं मन मोकळें नव्हे ॥१५॥**

**परम तप तो प्रियकांत । म्हणोनि पतिवीण त्यजिला एकांत ।**

**सासू श्वसुरसेवया लोकांत । उपेक्षिला ॥१६॥**

१५. याप्रमाणे पतीसेवेशिवाय एक क्षणही ती वाया जाऊ देत नाही. पतीच्या चरणांचे ध्यान अखंड असल्यामुळे हृदयाकाशात केल्या जाणाऱ्या ध्यानयोगात तिचे मन गुंतले असते. ते मोकळे कधीच नसते.

१६. स्त्रीला सर्वात मोठे तप म्हणजे तिचा प्रिय असलेला पतीच होय. म्हणून पतिशिवाय एकांत तिने सोडून दिलेला असतो. केवळ सासूसासरे यांच्या सेवेत स्वतःला गुंतवून इतर लोकांचा संबंधही ती सोडून देते.

**जें लोकजात अनंत कोटी । तें पतिवीर्य विरूढलें पोटी ।**

**म्हणूनि पुत्रशाला गोमटी । विश्व जाहलें ॥१७॥**

**येणें सकळावरी आज्ञा । सकळही म्हणती जननी प्राज्ञा ।**

**कवणाचीही करावया संज्ञा । प्रज्ञा न चले ॥१८॥**

१७. तिला बाहेर जे कोट्यावधि लोक दिसत असले. ते सर्व आपल्या पोटी आलेले पुत्रच होत अशी तिची दृढ भावना असते. याप्रमाणे सर्व सृष्टीच पुत्र समजल्यामुळे विश्व म्हणजे पुत्रशाळा आहे असाच तिचा अनुभव असतो.

१८. असे झाल्यामुळे सर्व सृष्टी तिची आज्ञा प्रेमाने पाळते. सकळ लोक अशा आत्मज्ञानसंपन्न झालेल्या पतिव्रतेला आई म्हणतात. ती परब्रह्मरूप झाल्यामुळे तिचे यथार्थ वर्णन करण्याला कोणाचीही बुद्धी सक्षम होत नाही.

**जगा रक्षी जेवीं जननी । या लागीं विनवणी न मानी ।**

**यास्तव नारदा निश्चयें करूनि । पतिव्रता कामिनी होताती ॥१९॥**

**ईश्वरापासूनि सकल वेद । सकळ विद्या ज्ञानभेद ।**

**शिवा पासूनि प्रसिद्ध । प्रगटले ॥२०॥**

१९. ती स्वतःहूनच सकळांचे रक्षण करणारी माता असल्यामुळे, ज्याप्रमाणे लहान बालकांना आईची विनवणी करावी लागत नाही त्याप्रमाणे 'जगाचे कल्याण कर' अशी विनवणी करण्याची गरज नसते. यास्तव हे नारदा, निश्चये

करून स्त्रिया पतिव्रता होतात.

२०. चारी वेद, सर्व विद्या, आणि सर्व प्रकारच्या ज्ञानाच्या शाखा ईश्वरापासून म्हणजे शिवापासून प्रकट झाल्या आहेत.

**तेवी पातिव्रत्य धर्म । सर्वही उमेपासूनि परम ।**

**हा महाभारतीं सप्रेम । प्रसंगू आहे ॥२१॥**

**स्वयं पतिव्रतामाजी वरिष्ठ । हिमकन्या परमश्रेष्ठ ।**

**तिचें चरित्र सुविस्पष्ट । सादर श्रोतीं परिसिजे ॥२२॥**

२१. त्याप्रमाणे पतिव्रताधर्म भगवती उमेपासून प्रकट झाला आहे. यासंबंधीचा एक प्रेमपूर्ण प्रसंग महाभारतात वर्णन केला आहे.

२२. सर्व पतिव्रतांमध्ये हिमालयाची कन्या सती ही परमोच्च स्थानी विराजमान आहे. तिचे पतिव्रताधर्म सांगणारे चरित्र आता श्रोत्यांनी आदरपूर्वक ऐकावे.

**ही ईश्वररूपा ईश्वरशक्ति । परी वाढवाया पातिव्रत्याप्रति ।**

**दक्ष गृहीं महासती । झाली अवतरती स्वेच्छावशें ॥२३॥**

**अहो धमाधर्म कांहीं । परमेश्वराचे ठायीं ।**

**निके कांही नाही । श्रुति म्हणे ॥२४॥**

२३. शक्ती जशी शक्तिमानाहून वेगळी नसते. त्याप्रमाणे उमा शिवस्वरूपच आहे. पण पतिव्रताधर्म वाढवण्यासाठी दक्ष गृहात आपल्या इच्छेने ती अवतार घेती झाली.

२४. वादी - अहो परमेश्वराचे ठिकाणी धर्म - अधर्म यांना काही स्थान नाही असे प्रत्यक्ष वेदांनी सांगितले आहे. मग तुम्ही पतिव्रताधर्मासंबंधी विनाकारण काय सांगता?

**परी बाळाचें मुखीं द्यावया ग्रास । बाप जेवूनि दावी सावकाश ।**

**तेवी धर्मी लोक लावावयास । ईश्वरास धर्म आचरणें ॥२५॥**

२५. सिद्धान्ती - लहान बाळकाला जेवण कसे करावे हे पिता जसे स्वतः घास जेवून दाखवितो त्याप्रमाणे लोकांना धर्ममार्गावर चालणे शिकविण्यासाठी ईश्वर धर्माचे आचरण स्वतः करून दाखवितो.



संमति श्लोक

**न मे पार्थाऽस्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किंचन ।**

**नानवाप्तमवाप्तव्यं वर्त एव च कर्मणि ॥ भ.गीता २२-३**

**यदि ह्यहं न वर्तेयं जातु कर्मण्यतन्द्रितः ।**

**मम वर्त्मानुवर्तन्ते मनुष्याः पार्थ सर्वशः ॥ भ.गीता २३-३**

हे अर्जुना, तिन्ही लोकात मी कोणते तरी कर्म केलेच पाहिजे असे मला मुळीच बंधन नाही. मला काही मिळवायचे आहे असेही नाही किंवा काही सोडावयाचेही नाही. तरी देखील मी कर्म करित असतो. २२-३

**भगवंत म्हणे मज । नाहीं कर्माऽकर्माचें काज ।**

**परी मीहि आपुलें सहज । कर्म न सांडी ॥२६॥**

भगवान् म्हणतात. मला कर्म किंवा अकर्म यांचे काही देणं घेणं नाही. पण मी आपले स्वाभाविक कर्म सोडित नाही.

**मी जरी सोडिला धर्म । तरी मजवरी लोकआचरण परम ।**

**यालागीं करितील अधर्म । अवघेचि लोक ॥२७॥**

**लोक न बुडावे ययास्थिती । महापुरुषही धर्म करिती ।**

**तेवीं उमा भगवती । पतिव्रतास्थिती वर्तत ॥२८॥**

२७. मी जर धर्म सोडला तर माझ्याकडे पाहून त्यानुसार वागणारे जे लोक आहेत ते सर्वच अधर्म करू लागतील.

२८. अशा स्थितीमध्ये लोक पापात बुडू नयेत यासाठी महापुरुषही शास्त्रोक्त धर्म पालन करीत असतात. त्याप्रमाणे भगवती उमादेवी पतिव्रताधर्माने वागून स्वतःचा आदर्श घालून देते.

**पुरुषाकार मूर्त्यवच्छिन्न चैतन्य शिव पिता ।**

**वनिताकार मूर्त्यवच्छिन्न चैतन्य उमा माता ।**

**'जो प्रियूचि प्राणेश्वरी' हे ताता । संमति आहे ॥२९॥**

**यालागीं उमाचि मदनदहन । कीं शंकरचि उमा आपण ।**

**जेथ जे पाहती भिन्न । ते पडती जन महानरकीं ॥३०॥**

२९. पुरुषाच्या आकाराने मर्यादित दिसणारे चिन्मय ब्रह्म म्हणजे पिता शंकर होत. आणि स्त्रीच्या आकाराने मर्यादित दिसणारे चैतन्य माता उमा

होय. याला श्री ज्ञानेश्वर माउलीची अमृतानुभवातील ओवी संमती देते. ''जो प्रियूची प्राणेश्वरी'' प्रिय हाच प्रेयसी होऊन राहिला आहे.

३०. म्हणून उमा हीच मदनाला जाळणारी शंकररूपाने आहे आणि शंकरच उमारूपाने विलसत आहेत. असे असूनही जे या उमामहेश्वरांना वेगवेगळे पाहतात ते महानरकात पडतात.

**जैसें शिवपुराणीं शिव ब्रह्म । कीं भागवतीं विष्णु ब्रह्म ।**

**तैसें देविभागवतीं ब्रह्म । उमाही आहे ॥३१॥**

**एकाचि नदींतूनि जैसी । अंजुळी घेती आर्ते ऐसी । तेवीं एकाच ईश्वराचि**

**आपैसी । जया जें आवडे तैसी उपास्ति करिती ॥३२॥**

३१. ज्याप्रमाणे शिवपुराणात शिवाचे आपि भागवतात विष्णूचे ब्रह्मरूपाने वर्णन आहे त्याप्रमाणे देवीभागवतात उमामाताही पूर्ण ब्रह्मरूपाने वर्णित आहे.

३२. आपल्या ताहानेप्रमाणे ओंजळभर पाणी आपण घेतो त्याप्रमाणे एकाच ईश्वराची उपासना ज्याच्या त्याच्या आवडीनुसार केली जाते.

**शिव विष्णू सूर्य गणेश उमा । हीं नांवें एकाचि ब्रह्मा ।**

**परी लोक तरावे म्हणोनि धर्मा । आचरोनि दावी माय ॥३३॥**

**तिचें चरित्र अति सुंदर । ऐकतांचि मनोहर ।**

**सावध होवोनि श्रोते चतुर । करुनी एकांतर ऐकावें ॥३४॥**

३३. शिव, विष्णु, सूर्य, गणेश आणि उमा ही एकाच ब्रह्माची नांवे आहेत. पण लोकांचा उद्धार व्हावा यासाठी पतिव्रताधर्माचे आचरण कसे करावे हे माता उमा सर्वांना दाखविते.

३४. तिचे चरित्र अतिशय उत्तम आहे, मनाला हरण करणारे आहे. चतुर श्रोत्यांनी सावध होऊन अन्तःकरण पूर्ण एकाग्र करून ते ऐकावे.

**कल्पाकल्पांची भिन्न रीती । भिन्न नांवे भिन्न जगतीं ।**

**सारिखी असतां प्रकृति- । विकृति भिन्न पावे ॥३५॥**

**दश इंद्रिय पांच भूत । सर्व कल्पीं समान दिसत ।**

**अकरावें बारावें इंद्रिय येथ । कवणे कल्पीं न सांपडे ॥३६॥**

३५. वेगवेगळ्या सृष्टिनिर्मितीच्या कल्पामध्ये वेगवेळ्या जगात वेगवेगळ्या नावांनी पदार्थ जाणले जातात. पण मूळ प्रकृति ही एकच असते आणि तिच्यापासून



होणारी कार्ये (विकृती) मात्र वेगवेगळी होताना दिसतात.

३६. सर्व वेगवेगळ्या कल्पात पंचमहाभूते आणि दहा इंद्रिये समानच असतात पण तेथे दहाऐवजी अकरावे-बारावे इंद्रिय मात्र नसते.

**परि मातीचें घट जैसे होती । तैसे ताम्राचें ही घट करिती ।**

**एवं भेद पावे शरीरादि विकृति । मायावशें ॥३७॥**

**एकादे कल्पीं शिव पहिले उत्पन्न । होवोनि निर्मी ब्रह्मा आणि नारायण ।**

**एखादे कल्पीं विष्णू प्रथम होवोन । विधि आणि उमारमण निर्मी ॥३८॥**

३७. पण जसे मातीची मडकी होतात तसे तांब्याचेही घट तयार होतात. त्याप्रमाणे मायेच्या गुणामुळे महाभूते व इंद्रिये सारखी असली तरी शरीरे मात्र भिन्न भिन्न आकारांचे दिसून येतात.

३८. एकाद्या सृष्टीत शिव प्रथम उत्पन्न होतात व ते ब्रह्मदेव आणि विष्णूला उत्पन्न करतात. तर दुसऱ्या एखाद्या कल्पात विष्णु प्रथम उत्पन्न होऊन ते शंकर आणि ब्रह्मदेवाला निर्माण करतात.

**एखादे कल्पीं प्रथम उपजे विधाता । मग तो निर्मी उमाकान्तरमाकान्ता ।**

**असो ही सृष्टिव्यवस्था । परी शिव विष्णु भक्तां समान उपास्य ॥३९॥**

**मनू-शतरूपेंपासून । सृष्टीचें जैसें आविष्करण ।**

**तैसें दक्षप्रजापतिपासून । सृष्टिआविष्करण जाहलें ॥४०॥**

३९. एकाद्या कल्पात प्रथम ब्रह्मदेव जन्मतात आणि ते शंकर आणि विष्णूंना उत्पन्न करतात. अशी ही सृष्टीची भिन्न भिन्न प्रकाराने उत्पन्न होणारी व्यवस्था आहे. पण या सर्व ठिकाणी भक्तांसाठी मात्र शिव आणि विष्णु सारखेच एकरूपाने उपास्य आहेत.

४०. जसे मनू अणि त्यांची पत्नी शतरूपा यांनी सर्व सृष्टी निर्माण केली, तशी कोठे दक्ष प्रजापतीपासून सर्व सृष्टीची उत्पत्ती झाली. **(य१५ पा१३०)**

**या दक्षप्रजापतीचे मंदिरीं । प्रसूता पतिव्रतेचे उदरीं ॥**

**जन्मली माता उमा सुंदरी । हृदयमंदिरीं ध्यात शिवा ॥४१॥**

**विषकंठ बैसे स्मशानीं । सर्प गळां त्रिशूलपाणी ।**

**ऐसे दोष मनीं नाणीं । शिव चरणीं मति वेधली ॥४२॥**

४१. अशा या दक्षप्रजापतीच्या मंदिरात पतिव्रता मातेच्या पोटी जगन्माता उमासुंदरीने जन्म घेतला. तेथे ती स्वतःच्या हृदयातील शिव-ध्यानात रत असे.

४२. विषाने निळा झालेला ज्याचा कंठ आहे तो स्मशानवासी आहे. त्याने गळ्यामध्ये सापाचा हार घातला आहे आणि हातामध्ये त्रिशूल आहे. या प्रकारचे भयावह रूप धारण केले असले तरी वरील दोष मनातही न आणतां सतीची मती शिवाचे चरणध्यानात एकाग्र होऊन गेली.

**शरीरजन्म मायबापाचा । परी मनोभाव शंकराचा ।**
**जन्मा पासूनि साचा । उमटला ॥४३॥**
**एक शिव वेगळा करून । इतर पुरुष पुत्रासमान ।**
**ऐसी पहिलेच पासोन । वेगसंपन्न वृत्ति झाली ॥४४॥**

४३. शरीर जरी मातापित्या कडून मिळाले तरी उमेचा मनोभाव मात्र जन्मापासूनच पूर्ण शिवरूप झालेला होता.

४४. केवळ भगवान् शिव सोडून इतर सर्व पुरुष पुत्ररूपाने आहेत अशी उमेच्या मनाची तीव्र वेगसंपन्न वृत्ती अगदी प्रथमपासून झाली होती.

**मी ब्रह्म सच्चिदानंदघन । हे न विसरतां आठवण । आधिकारिक दक्षाचे**
**उदरीं अवतरण । धर्मस्थापनाकारण जाहलें ॥४५॥**
**मायबाप आधिकारिक । कन्या तंव ब्रह्म सम्यक ।**
**शिव गुरु ब्रह्म ब्रह्मदर्शक । ऐसें चतुष्क अति योग्य ॥४६॥**

४५. मी पूर्ण सच्चिदानंदघन ब्रह्मरूप आहे, याची आठवण न विसरता, सृष्टीच्या प्रजापतीपदाचा अधिकार असलेल्या दक्षाचे पोटी, पतिव्रताधर्माची स्थापना करण्यासाठी उमेने अवतार घेतला.

४६. माता-पिता अधिकार संपन्न, कन्या पूर्णब्रह्मरूप, आणि शिव हे स्वतः ब्रह्मरूप असून शिष्याला ब्रह्माचा अनुभव आणून देणारे सद्‌गुरु; असे हे चतुष्टय उत्तम रीतीने साकार झाले होते.

**येथ आशंका करिती कोणी । जन्म न ये कर्मावांचूनि ।**
**कर्में पापपुण्याची खाणी । सुखदुःख शिराणी बोलिली ॥४७॥**
**पुण्याचें फल होय सुख । पापाचें फळ महादुःख ।**
**कर्मावांचोनि निष्टंक । शरीर सर्वथा मिळेना ॥४८॥**

४७. शंका :- येथे कोणाला शंका यईल की, पूर्व जन्माचे कर्म असल्याशिवाय जन्म कसा येणार? आणि कर्म म्हटले की पाप आणि पुण्य यांची खाणच.

28



त्यामुळे सुख आणि दुःखे ही पांचवीलाच पुजलेली.

४८. पुण्याचे फळ सुख होय आणि पापाचे फळ मोठमोठी दुःखे होत. आणि कर्म असल्यावांचून शरीर तर कधीच मिळत नसते.

**जन्म होय कर्मावीण । तरी मुक्ताही होईल बंधन ।**
**उमा स्वतः ब्रह्म असोन । कर्मावीण जन्मग्रहण कैसे ॥४९॥**
**तरी ये विषयीं समाधान । ऐकावें होवोनि सावधान ।**
**समुद्रीं तरंग उठतां आपण । पाणीपण न मोडे ॥५०॥**

४९. जर तुम्ही म्हणाल की कर्माशिवाय जन्म झाला तर मुक्त देखील पुनः बंधनात पडण्याची आपत्ती येईल.

असे असतानां उमा जर पूर्ण ब्रह्म आहे तर तिला, कर्माशिवाय, जन्माने प्राप्त होणारे शरीर कसे मिळाले?

५०. समाधान - या शंकेचे समाधान सांगतो ते सावध होऊन एकाग्र चित्ताने श्रवण करा.

समुद्रावर तरंग उठतो पण त्यामुळे समुद्राचे किंवा तरंगाचे पाणीपण मोडले जाते काय?

**तेवीं न विसरूनी आपुली स्थिती । जीवारोपित ईश्वरत्व संमती ।**
**अनध्यस्तविवर्त प्रतीती । झाली पार्वती जगन्माता ॥५१॥**
**मीठ समुद्रीं जातां । तरी मार्ग कांहींच नुरे तत्त्वतां ।**
**नदी समुद्रीं मिळोनि जातां । ओघ पाहतां मागे उरे ॥५२॥**

५१. त्याप्रमाणे आपली ब्रह्मानंद स्थिती उमा विसरली नाही. जीवाने स्वतःच्या अज्ञानामुळे ब्रह्मावर ईश्वरत्वाचा आरोप केला त्याला भगवती उमेने अनुमोदन दिले. आणि ती जगन्माता पार्वती अनध्यस्तविवर्तरूप असल्याची अनुभूतीच जणुं प्रकट झाली.

५२. मीठ जेव्हा समुद्रात मिसळले जाते तेव्हा ते कसे काय कोणत्या मार्गाने समुद्रात मिळाले वगैरे काहीच कळत नाही; पण नदी जेव्हा समुद्राला मिळते तेव्हा तिचा सतत वाहणारा ओघ मात्र कायमच असतो.

**तया ओघें सकळांची । तृषा हरण होय साची ।**
**तैसी मुक्त आणि अवतारांची । स्थिति सुखाची ओळखिजे ॥५३॥**
**विदेही मुक्त जे होती । तयांचें कांहींच नुरे निश्चितीं ।**
**अवतार ब्रह्मचि असती । परी शरीरें दिसती दीनोद्धारा ॥५४॥**

५३. नदीच्या त्या प्रवाहाने सर्वांची तहान भागते. त्याप्रमाणे मुक्त अवतारांची स्थिती अत्यंत सुखरूप असते, हे लक्ष्यात घ्या.

५४. जे देहापासून मुक्त होऊन ब्रह्मरूप होतात तेव्हा साधनामार्गादि पदचिन्हे काहीच उरत नाहीत. याउलट अवतार हे शुद्ध परब्रह्मरूपच असतात त्यांचे अवतारदेह मात्र दीन जनांचा उद्धार करावयास लोकांना दिसतात आणि उपासनेला आलंबन होतात. त्यांच्या साह्याने जीव उद्धरून जातात.

**''झालेंनि जगें मी झांके । तरी जगत्वें कोण फांके ॥**

**किळेवरी माणिके । लोपिजे काई'' (ज्ञा.अ.१४.ओ.१२४)**

माझ्यापासून निर्माण झालेल्या जगाने जर मी झांकला जात असेल तर जगरूपाने माझ्याशिवाय आणखी कोणी विस्तार पावले आहे काय? माणकाच्या सौंदर्याने माणिक झाकले जाते काय?

**एवं तात वचन प्रमाण । ब्रह्मवेगळें न होवोन ।**

**जगदुद्धारा कारण । उमा आपण अवतरली ॥५५॥**

**पहिलें अधर्मी असावें । आणि मग धर्मनिष्ठ होवावें ।**

**हें जीवकर्म स्वभावें । अवतार कृत्य नव्हे ॥५६॥**(य१५पा१३१)

५५. असे श्रीज्ञानेश्वरांचे आप्तवचन प्रमाण आहे. माता उमेने, ब्रह्माहून वेगळी न होता जगाच्या उद्धारासाठी, स्वतः अवतारदेह धारण केला.

५६. आपण स्वतः सुरवातीला अधार्मिक असावे आणि नंतर धर्मनिष्ठ व्हावे ही जीवाची रीत आहे. अवतार मात्र तसे नसतात.

**तैसी नोहे भगवती । आधींहूनि निष्ठा धर्मावरुती ।**

**अंतरीं आठवी पशुपति । विधि श्रीपती वंद्य जो ॥५७॥**

**कीं पाहतां कवणेहि वेळीं । मी नाहीं शिवाहुनि निराळी ।**

**या अभिप्रायें दक्षबाळी । चिंती चंद्रमौळी आदिहुनी ॥५८॥**

५७. असे जीवाप्रमाणे भगवती उमेचे नव्हते. आधीपासून तिची निष्ठा धर्मावर होती. ब्रह्मदेव व विष्णू यांना जो वंदनीय आहे त्या पशुपती शिवाला ती अन्तःकरणात अखंड स्मरत असे.

५८. मी केव्हाही कोणत्याही काळी शिवाहून वेगळी नाही एकरूपच आहे. या जाणीवेने ती दक्षकन्या मस्तकावर चंद्र असलेल्या शंकराचे पहिलेपासून चिंतन करीत असे.





**कीं ब्रह्मरूपें होती शिवी । ते तैसीच असूनि दहर दिवी ।**

**योगेऽपि वियोगोपलालना व्हावी । म्हणोनि देवी शिव चिंती ॥५९॥**

**कीं माधुर्यभक्तीचें शुद्धपण । स्थापाया अलंकारभजन * ।**

**करी संवेग वाढवून । कैलासरमण आठवितां ॥६०॥**

५९. ती उमा ब्रह्मरूप तर होतीच पण एकरूप असूनही, हृदयाकाशात संयोग असतांनाही, वियोगातील उत्कट प्रेम सतत कायम रहावे या उद्देशाने तिचे शिवचिंतन अखंड चालू असे.

६०. माधुर्यभक्तीची शुद्धता कायम ठेवून ती पुढेही प्रवाहित राहण्यासाठी, कैलासपतीचे स्मरण करता करतां, मनाचा मृदू संवेग वाढवून, मध्य व नंतर तीव्र संवेगापर्यंत नेण्यासाठी ती अलंकार भजन* करते.

---

***अलंकार भजन**

अहो कुमार वयापासुनी । कपाळी कुंकू लावी कामिनी ।
तैसे तत्पदवाच्यांश स्मरणी । अलंकार भजन ॥१०॥
आणि उपवर जै होय । तैं लग्ननाम निघे स्वयें ।
पतिनामग्रहण होय । तेच वेळी ॥११॥
त्या नामे करून । पतीसी ओळखी आपण ।
आता दार्ष्टान्ता निरूपण । ऐसेचि कीजे ॥१२॥
प्रेमळ पाहुनी सद्‌गुरुनाथ । द्वादशाक्षरी उपदेश करीत ।
तो जपतांचि अंतरस्थ । प्रकटे श्रीहरी ॥१३॥-(भक्तिपदतीर्थामृत - अ ४)
येथवरी (१) अलंकार भजन.......॥
पुढे — (२) स्वरूप भजन.........(३) ऐक्य भजन

---

**अथवा भावी आपुल्या मनीं । मी जन्में होईन शरीराभिमानी ।**

**यालागीं ब्रह्म न विसरावें म्हणोनी । शूलपाणि आठवित ॥६१॥**

**धर्में अथवा ज्ञानें पाहतां । जीवा मार्ग दाखवितां ।**

**आवडीनें पिनाकहस्ता । श्री अनंता आठवी ॥६२॥**

६१. किंवा आपल्या मनात ती कल्पना करते की मी पार्वती म्हणून जन्मली असल्यामुळे कदाचित माझे ठिकाणी 'शरीर म्हणजेच मी आहे' असा खोटा अभिमान उत्पन्न होईल तर तसे विस्मरण होऊ नये म्हणून त्रिशूलधारी शंकरा उमामाता सतत स्मरण करीत असे.

६२. याप्रमाणे पतिव्रता धर्माचे आणि ज्ञानमार्गाचे जीवांना मार्गदर्शन करतांनाही ती शिव आणि विष्णु या दोघांचेही सारखेच स्मरण करते.

**ना तरी स्त्री शूद्र समान । श्रुति पुरुषासचि सांगे ज्ञान ।**
**यास्तव स्त्रियांवरी कृपानिष्ठ होवोन । भुजगभूषणा आठवित ॥६३॥**
**अथवा नको इया कल्पना । वृत्ति आपणचि आपणा ।**
**ब्रह्म असोनी ब्रह्मपणा । नंदीवाहना मिळों जाती ॥६४॥**

६३ दुसरे असे की वेद पुरुषालाच ज्ञान सांगतात. स्त्री आणि शूद्र समान असल्यामुळे त्यांचेसाठी वेद नाहीत. म्हणून त्यांचेसाठी, सर्पभूषण अशा शिवाचे सतत स्मरत करीत करीत उमा कृपामय झाली.

६४ असो. या वेगवेगळ्या कल्पना कशाला करावयाच्या? हा सर्व वृत्तींचा लीलाविलास आहे. उमामाता हीही स्वतः एक वृत्तीच आहे. एकूण काय तर सर्वच वृत्ती स्वतः ब्रह्मरूप असून त्या नंदिवाहन शिवरूपी ब्रह्मात मिळत राहतात. **(य१५-१३२)**

॥ अपूर्ण ॥



**श्रीगुलाबरावमहाराजांच्या**

**सूक्तिरत्नावलि-यष्टीनुसार**

## विक्री साहित्य

**(यष्टि १) रु ४०**

(१) भक्तिपदतीर्थामृत
(२) निगमान्तपथसंदीपक
(३) चौसष्टी (अमृ.अ.१चे निरूपण)
(४) योगसाधनेची ११ पत्र (योग)
(५) भगवद्गीतासंगति
(६) निदिध्यासनप्रकाश (योग)
(७) कान्तकान्तावाक्यपुष्पम् (संस्कृत)
(८) सूचनाप्रकरणम् -१
(९) गायत्री-अन्वयार्थ (नवोपलब्धि)

**(यष्टी २ - पूर्वार्ध) रु.४०**

(१०) कृष्णपंचपदी
(११) सद्वैजयंती
(१२) बाराखडी
(१३) चित्तोपदेश
(१४) त्रिकांडसार
(१५) तुंबडी
(१६) चिरंजीवपदाभ्यास
(१७) शांतिसुधाकर
(१८) सोपानसिद्धि (योग)
(१९) नित्यतीर्थ
(२०) मणिमंजुषा
(२१) प्रियपाहुणेर
(२२) अलौकिक प्रवास
(२३) अमोघनिरूपण (ॐकारसाधना)
(२४) स्त्रीगीत
(२५) श्रीज्ञानेश्वरक्षमापनस्तोत्र

**(यष्टी २) उत्तरार्ध रु.५०**

(२६) गुरुपंचपदी
(२७) २० पत्रे
(२८) ध्यानयोगदिवाकर (योग)
(२९) भगवद्भक्तिसौरभ (रुक्मि.पत्रिका)
(३०) प्रीतिनर्तन
(३१) गोविन्दानंदसुधा
(३२) मातृपितृभावनाष्टक
(३३) सूचनाप्रकरण - २

**(यष्टी ३) रु.१००**

प्रियलीलामहोत्सव भाग-१
(३४) आमंत्रणविलास
(३५) सूचनाप्रकरण - ३
(०) ~~आममनविलास - (यष्टी१४)~~

**(यष्टी ४) रु.३०**

(३६) स्त्रीगीतसंग्रह २ भाग

**(यष्टी ५) रु.३०**

(३७) अलौकिक व्याख्यानमाला
*(मानसशास्त्रीय विवेचन)*

**(यष्टी ६) रु.१०**

(३८) स्वमंतव्यांशसिद्धान्ततुषार (हिंदी)

**(यष्टी ७) रु. ३०**

(३९) एकूण ३८पत्रे
योग, बुवाबाजी, धर्मसुधारक, धर्म, तत्त्वज्ञान समीक्षा, भौतिक विज्ञान, स्वजाति बांधवांना विनंती. ~~(५६पत्रे ?)~~

**(यष्टी ८) रु.५०**

(४०) साधुबोध- ९३८ प्रश्नोत्तरे

**(यष्टी ९ पूर्वार्ध) रु.१००**

**अभंगांची गाथा**

(४१) एकूण अभंग- २१५७.
(४२) मानसपूजा
(४३) शुक-परिक्षित संवाद
(४४) ज्ञानपाठ १६ अभंग
(४५) ज्ञानेश्वरमहिमा पंचक
(४६) गीतासार (९८४)
(४७) गोपी गीत (१४३३-५०)
(४८) रामचरित (१४८४-९५)
(४९) योगसाधना (१४९६-१५११)
(५०) गंगापंचपदी (१६१७-२१)
(५१) गंगापंचरत्न (२०६९-७४)
(५२) आत्मचरित्र (२०३९)
(५३) सोपानदेव (२०४६-४९)

**१९ आख्याने**

(५४) १. पूतनामोक्ष
(५५) २. कृष्णतुला
(५६) ३. पुण्यधाम
(५७) * गंगापंचपदी
(५८) ४. चिंधीची कथा
(५९) ५. भिल्लिणी पार्थ
(६०) ६. मृत्तिका भक्षण
(६१) ७. गोपींचा नौकाविहार
(६२) ८. निळ्या नारी
(६३) ९. बिल्वमंगल
(६४) १०. सुरथ सुधन्वा
(६५) ११. कर्माबाई
(६६) १२. अजापाल
(६७) १३. शुकगणिका

(६८) १४. रंतिदेव
(६९) १५. कुशिष्याचे आख्यान
(७०) १६.उपमन्यू-संभूति कथा
(७१) १७. नारायणदास
(७२) १८. विमलासुशिला
(७३) १९. पार्थ गर्वहरण
(७४) १८. विमलासुशिला
(७५) १९. पार्थ गर्वहरण

**(यष्टी ९ उत्तरार्ध) रु.१००**

**पदांची गाथा**

(७६) वृत्तबंधनाचे टिप्पण-१२२ वृत्ते
(७७) पदांची गाथा एकूण पदे- २२४४
(७८) हिंदी पदसंग्रह (३०४)
(७९) संस्कृत पदे (४०)
(८०) लोकगीते : तुंबडी प्रकरण
(८१) अक्कलकोटस्वामी (३५-४५)
(८२) ज्ञानेश्वर मंत्राक्षरी (९४)
(८३) ॐनमोभगवतेवासुदेवाय
(८४) कात्यायनीपूजन (१०६)
(८५) नमःशिवाय-मंत्राक्षरी (१२९)
(८६) पत्नीस बोध (१६३-१७२)
(८७) लोकगीते
(८८) करुणाकलरव स्तोत्र
(८९) पार्थकृष्णसंवाद (३८१-४३२)
(९०) राम-वसिष्ठ संवाद
(९१) गुरुशिष्य संवाद
(९२) मनीषापंचक (५३१- )
(९३) व्यंकटशास्त्रींशी प्रश्नोत्तरे
(९४) मुरलीगीत (७१५-१७)
(९५) द्रौपदीचा धावा
(९६) बुढी-कृष्ण संवाद (७६६-६८)
(९७) रुक्मिणीचे पत्र (७६९-७६)
(९८) रुक्मिणीपत्रिका
(९९) बालरक्षा
(१००) उद्धव-गोपी संवाद
(१०१) रासक्रीडा
(१०२) भागवत-दशमसार
(१०३) रुक्मिणीस्वयंवर
(१०४) रामचरित्
(१०५) श्रीवाल्मिकीय सारोद्धार
(१०६) श्रावण कथा
(१०७) शिव-करुणाकलरव

**आख्याने ७**

(१०८) १ जंबूफल आख्यान ३६४
(१०९) २ चिंधीचें आख्यान ३७८
(११०) ३ सखु आख्यान ३९०
(१११) ४ राधाविलास आख्यान ४१०
(११२) ५ उलूग्वलबंधन आख्यान (यमलार्जुनोद्धारवर्णनम्) ४१८
(११३) ६ यज्ञपत्न्याख्यान ... ... .४२५
(११४) ७ हरिहराख्यान ४३५
(११४) तुंबडी प्रकरण ४८२
(११५) स्त्रीगीत प्रकरण ३८६
(११६) सयनाजी
(११७) आरतीसंग्रह ४९४

**(यष्टी १०) रु.१००**

(११८) प्रेमनिकुंज

**(यष्टी ११) रु.१६०**

(११९) संप्रदायसुरतरू भाग १-२

**(यष्टी १२) रु.३०**

(१२०) पत्रे ४७

संस्कृत-काव्य-गद्य (६२पत्रे?)

**(यष्टी १३) रु.२०**

(१२१) सुखवरसुधा.
(१२२) वेदान्तपदार्थोद्देशदीपिका

**(यष्टी १४)**

(१२३) नारदीयभक्तिसूत्रभाष्य (मराठी)
(१२४) सांख्यसुरेन्द्र
(१२५) प्रियलीलामहोत्सव भा.२
~~आममनविलास (य३)~~

**(यष्टी १५)**

(१२६) ईशावास्योपनिषद्
(१२७) ज्ञानेश्वरी निरूपण
(१२८) निगमान्तसुभा
(१२९) ऐश्वर्यार्थदीपिका
(१३०) ब्रह्मसूत्रव्याख्या
(१३१) छंदप्रदीप
(१३२) प्रमाद-कल्लोळ
(१३३) योगप्रभाव-ओवी (योग)
(१३४) हिरण्ययोग- स्वप्नयोग
(१३५) पतिव्रता चरितामृत
(१३६) षट्पदध्वनि
(१३७) गोपिकापादपीयूषलहरी
(१३८) वेदान्त निरूपण
(१३९) गान सोपान
(१४०) योगांग-यम-लक्षण
(१४१) दुर्मत हृदयभंजन
(१४२) सिद्धिसार
(१४३) ईशावास्योपनिषद्
(१४४) वेदान्तप्रक्रियासमुच्चय
(१४५) वृत्तिक्षीरसागर
(१४६) सुखपर्व
(१४७) सांख्य सूत्रावर विचार
(१४८) एक निबंध (सांख्य)
(१४९) बौद्ध निबंध
(१५०) आत्मचरित्र
(१५१) नवीन भाषा - नावंग
(१५२) प्रश्नोत्तरे
(१५३) श्री खापरेंना पत्र....
(१५४) मानसायुर्वेद २ लेख

**(यष्टी १६) संस्कृत**

**संस्कृतरचना** भा.१ **रु.२०**

<u>सूत्रग्रंथा</u>

(१५५) अन्तर्विज्ञानसंहिता
(१५६) ईश्वरदर्शनम्
(१५७) समसूत्री
(१५८) दुर्गात्त्वम्
(१५९) काव्यसूत्रसंहिता
(१६०) शिशुबोधव्याकरणम्
(१६१) न्यायसूत्राणि
(१६२) एकादशीनिर्णयः
(१६३) पुराणमीमांसा
(१६४) आगमदीपिका
(१६५) शास्त्रसमन्वयः
(१६६) युक्तितत्त्वानुशासनम्
(१६७) षड्दर्शनलेशसंग्रहः
(१६८) तत्त्वबोधः

**(यष्टी १६) संस्कृत**
**संस्कृतरचना भा.२ रु.५०**

(१६९) स्वमतनिर्णयः
(१७०) संप्रदाय-कुसुम-मधु
(१७१) ऋग्वेदटिप्पणी
(१७२) सच्चिन्निर्णयः
(१७३) गंगामृतपानम्
(१७४) भिषगींन्द्रशचीप्रभा
(१७५) कान्तकान्ता-वाक्यपुष्पम्
(१७६) उच्छिष्टपुष्टिलेशः
(१७७) श्रीधरोच्छिष्टपुष्टिः
(१७८) संस्कृतपदानि
(१७९) नारदीयभक्तिसूत्रभाष्य
(१८०) भक्त्यधिकरणन्यायमाला
(१८१) बालवासिष्ठ
(१८२) गंगास्थितिनिर्णय
(१८३) भक्तिभाष्य
(१८४) मानसायुर्वेद.
(+) ११पत्रे (यष्टी.७:<u>९</u>+ यष्टी.१२=<u>२</u>)

**(यष्टी १७) रु.१००**

**समयोपदेश** (सुबोध हिंदुधर्म)

(१८५) गीता निरूपणे
(१८६) योगवासिष्ठ निरूपणे
(१८७) ब्रह्मसूत्र निरूपणे
(१८८) बोधवाक्ये
(१८९) सुवर्णकण
(१९०) पंचदशीनिरूपणे
(१९१) गुरुचरणकौमुदी
(१९२) बालबुद्धिविवर्धिनी

**(यष्टी १८) रु.२०**

(१९३) भिषगीन्द्रशचीप्रभा
(१९४) वैद्यवृन्दावन
(१९५) वैद्यनन्दिनी
(१९६) भिषग्पाटवोपपत्तिः
(१९७) नावंग लिपी (सांकेतिक)
(१९८) हरिपाठ-अर्थक्रम
(१९९) हरिपाठ-प्रतिज्ञा
(२००) मोक्षपट
(२०१) स्वसमाज-नियम
(२०२) मायर्सची समीक्षा
(२०३) मननार्थ गीता-प्रश्न
(२०४) शिक्षण रत्नाकर

**(यष्टी १९) रु.१०**

(२०५) मनोहरिणी गीता (हिंदी)

**(यष्टी २०) रु.१२०**

(२०६) योगप्रभाव (मराठी गद्य)
श्री पतंजलींच्या ४० सूत्रांवर निरूपण

---

## श्री बाबाजीमहाराज पंडित

### लिखित व अनुवादित ग्रंथ

१. हरिपाठ रहस्य (रु.६०)
२. अमृतानुभव कौमुदी. (रु.१००)
३. ज्ञानेश्वरी गूढार्थदीपिका (रु.३००)
(") गीताप्रेस-प्रत (रु.१२५)
४. अभंगगाथा (रु.५०)
५. आर्यधर्मोपपत्ति
६. विविध लेखसंग्रह
७. संतकथा (रु.६)
८. वेदस्तुतिदीपिका
९. पंचदशीप्रवचने

१०. भागवतप्रवचने

**अनुवादित ग्रंथ**

११. भगवद्भक्तिसौरभ-रुक्मिणीपत्रिका
१२. प्रीतिनर्तन
१३. स्वमतनिर्णयः (रु.५)
१४. भक्तिपदतीर्थामृत (रु.८)
१५. निगमान्तपथसंदीपक (रु.५०)
१६. चित्तोपदेश (रु.५)
१७. हरिपाठ (रु.५)
१८. गीता

---

* कै. द. ग. खापरे रचित

**माधुर्यमधुकोष** पृ.७०० (रु.३००)
कोणता विषय कोठे आहे याचा संदर्भग्रंथ

* कै त्रिपुरवारलिखित

**श्रीगुलाबरावमहाराजांचे चरित्र**
अधिकृत मूळप्रत पृ.४३२ (रु.९०)

---

## श्रीगुलाबरावमहाराजांच्या ग्रंथांतील निवडक प्रकाशने

भगवद्भक्तिसौरभ (रुक्मिणीपत्रिका)
* योगरहस्य- १०ग्रंथ (रु.३०)
* योगसाधना - ११ पत्रे (रु.१०)
* आख्यानसंग्रह (रु.२०)
* मोक्षपट - सापशिडी (रु.२०)
* बुवाबाजी (रु.२०)
* मणिमंजुषा (रु.६)
* मौलिकविचार (रु२०)
* गीतगुलाब (निवडक पदे)(रु.२०)
* लोकगीते-लावणी संग्रह (रु.३०)
* आख्यानसंग्रह (रु.३०)
* ज्ञानपाठ (रु.२)
* हरिपाठ-सार्थ / अर्थक्रम (रु.३)
* रुक्मिणीस्वयंवर (रु.३)
* नित्यपाठ (रु.३०)
* मौलिक विचार (रु.२०)
* आंधळी गौळण कॅसेट (रु.५०)
शोभा जोशी,अजित कडकडे,यशवंत देव
* आळंदीवल्लभा कॅसेट (रु.५०)
शोभा जोशी- यशवंत देव
पदांच्या २ कॅसेट (रु.५०+५०)
डॉ. माधवराव खापरे





**डॉ. वा. ना. पंडित कृत ग्रंथ**

१. शांकरतत्त्वज्ञानात भक्तीचे स्थान
२. चिद्विलास
३. अद्वैतभक्ती
५. माधुर्यकल्लोळ
६. भक्तितत्त्वविवेक
७. श्रीगुलाबरावमहाराज – विभूति आणि तत्त्वज्ञान (रु.७०)

**डॉ. राम पंडित कृत**

*श्रीबाबाजीमहाराज पंडितांचे चरित्र
ह्रीं नारायणाय नमः ह्रीं (रु.३०)

**डॉ. कृष्ण माधव घटाटे कृत**

१. श्रीगुलाबरावमहाराजांची विचारसंपदा. पीएच.डी.प्रबंध (रु.७५)
२. १३० ग्रंथांचा सारांश मराठी / हिंदी (रु.२०)
३. श्रीमहाराजका दर्शनिकयोगदान- (हिंदी) (रु.२२५)
४.(,,) लहान चरित्र(म/हिं) (रु.६)
५. सर्वधर्मसमन्वय(म/हिं/इं)(रु.१०)
६. भक्तिशास्त्र (म/हिं) (रु.२०)
७. Perfect Harmony (Rs.10)
८. विश्वव्यापिनी हिंदुसंस्कृति (मराठी / हिंदी) (रु.१५)
९.Universl Hindu Culture (R.20)
श्री. दादासाहेब पोफळीकृत
Blind Leads Unblind (Rs.60)

**भारतभारती प्रकाशन**

**प्रा. डॉ. लीना रस्तोगीकृत**
१.श्रीगुलाबरावमहाराज-हिंदी (रु.६)
**डॉ. सुनीती आफळेकृत**
२. श्रीगुलाबरावमहाराज मराठी (रु.६)
**डॉ. म. रा. जोशीकृत**
वाङ्.परंपरा आणिज्ञानेश्वरकन्या (३०)
प्रा.डॉ.रूपा कुलकर्णीकृत
* गानसोपान-समीक्षा (रु.५०)
**प्रा.डॉ.सौ.अलका इंदापवारकृत**
नामामृत गोडी (पीएच.डी.प्रबंध)
**प्रा.डॉ.सौ.अंजली खरेकृत**
श्रीबाबाजीमहाराज पंडितांची विचारसंपदा (पीएच.डी प्रबंध)

---

*ग्रंथांचे मूल्य + पार्सल खर्चाचा ड्राफ्ट पाठवावा.*
*''श्रीज्ञानेश्वर मधुराद्वैत सांप्रदायिकमंडळ''*
*दहिसाथ, अमरावती.*



# सुसंस्कारांचे दान म्हणजे शिक्षण

## धर्मान्तर

**प्रश्न : सर्वधर्म समान आहेत तर आपल्या धर्मात कां राहवे?**

**उत्तर : सर्व धर्म समान आहेत तर आपल्याच धर्माला कां सोडावे?**

## जीवन भूमिका

**''आर्यांचे म्हणणे बरोबर आहे हे सिव्द्ध करण्याशिवाय मला व आपणप्रभृति माझ्या हितचिंतकांना दुसरे कोणतेही काम नाही''.**

** श्रीगुलाबरावमहाराज **

॥ श्री ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

मधुराद्वैताचार्य श्रीगुलाबरावमहाराज विरचित

# पतिव्रता चरितामृत

## अध्याय १ ला

उपक्रम

ॐ नमः श्री आचार्या । सच्चिदानंदा गुरुवर्या ।
अतीत्य वर्तसी कारणकार्या । अनुग्रहचर्या आर्तबंधो ॥१॥
तूं सकलांचें जीवन । तूं पुण्यवंतांचें पुण्य पूर्ण ।
तूं ब्रह्मयाचा ब्रह्मा आपण । विष्णूचा विष्णु शिवाचा शिव ॥२॥
तूं नयनाचा नयन । तूं श्रवणाचा श्रवण ।
तूं रसनेचें रसन । घ्राणाचे घ्राण मायबापा ॥३॥
तूं मनाचें मन । तूं बुद्धीचें बोधन ।
तूं चित्ताचें चेतवण । जीवाचें जीवपण तुजमाजी ॥४॥
तूं धर्मिष्ठांचा धर्म । कर्मनिष्ठां तूं कर्म ।
भक्ती तूं भक्तां प्रेम । ज्ञानियांचें ब्रह्म तूंचि की ॥५॥
तूं अनाथाची माउली । तूं भवताप पोळलियां साउली ।
हृदयीं धरितां तुझी पाउली । बहुत निमालीं समुदायें ॥६॥
तूं सकल दोषांसी खंडण । तूं षडरीदुर्जनां दंडण ।
तूं मुक्तिसुखाचें मंडण । प्रीतिस्पंदन भक्तांचें ॥७॥
देहाचें मातापिता । एकाचि जन्मीं पोषिती तत्वतां ।
अनंत जन्मींचा माता पिता । सद्‌गुरु दाता ब्रह्मसुख ॥८॥
सद्‌गुरुचेनि कृपाबळें । बह्मरूपें ब्रह्माण्ड उजळे ।
तान्हिया बाळाचें पाळी लळे । कृपाळे ज्ञानेश्वर जननी ॥९॥
जगदुत्पत्तीचें ज्ञान । जेव्हां तूं देसी करून ।



तेव्हां दृष्टिसृष्टिवादें जाण । विधातापण तुज कडे ॥१०॥
(य१५.११६)
शिष्याचें विघ्न करूनि दुरी । तूं पाळण करिसी कृपाभरी ।
तेव्हां कमलावर पूतनारी । श्रीगुरू निर्धारी तूंचि तूं ॥११॥
तूं माथां ठेविसी कृपाकर । तेव्हां जगदधिष्ठानज्ञानें साचार ।
मिथ्या जगाचा उपसंहार । करिसी तैं पार्वतीवरही तूं ॥१२॥
जो जैसें भजन करीत । देव तैसेंचि तया भजत ।
सद्‌गुरु भजन न करितां पावत । अहेतुक दयालु म्हणोनियां ॥१३॥
ईश्वराची वाणी वेद । जरी सद्‌गुरु कृपा नाहीं शुद्ध ।
तरी वेदांतही दिसे भेद । कदापि गोविंद कृपा न करी ॥१४॥
गुरु आणि देव । दोही ठायीं समान भाव ।
म्हणती ते मूढमती सावेव । देवाहूनि गुरुराव वरिष्ठ कीं ॥१५॥
देव अज्ञानाचा पुतळा । गुरु अज्ञान जाळीं ज्ञानज्वाळा ।
देवाचिये ठायीं भेदकळा । गुरु अभेद डोळा दाखवी ॥१६॥
देवाचें करिता स्मरण । तरी भेदबुद्धि न जाये मनांतून ।
सद्‌गुरु भेटतां कृपानिधान । जन विजन देवरूप ॥१७॥
देवाचें करावया भजन । घ्यावे लागती काष्ठपाषाण ।
सद्‌गुरूचें करितां स्मरण । प्रत्यक्ष येऊन भेटतसे ॥१८॥
देवाचें भजनीं कर्मगोवा । सद्‌गुरु भजनीं नैष्कर्म्यठेवा ।
मरण न चुके भजतां देवा । गुरुभजनें अमृतसेवा सांपडत ॥१९॥
देवाचें करितां भजन । देव दाखवी सद्‌गुरुचरण ।
एवं हरि भजनाचें फळ जाण । श्रीगुरुचरण कळलें कीं ॥२०॥
परब्रह्म चापपाणी । तो वसिष्टपायीं घाली लोळणी ।
जगन्माता दाक्षायणी । शूलपाणीस शरण गेली ॥२१॥
नारद हरिभक्त करुणाकर । त्यांचेही ध्येय सनत्कुमार ।

छांदोग्य श्रुति साचार । साक्षी ये विषयीं ॥२२॥
सोळा सहस्त्र भोगूनि नारी । जो अखंड ब्रह्मचारी ।
तोही सांदीपनचरणावरी । लोटांगण घाली प्रेमवशें ॥२३॥
देवाचें कृपें मुक्ती । आम्हां न लगे सद्‌गुरुयुक्ती ।
ऐसें म्हणे तो मूढमती । नर्क त्याप्रति चुकेना ॥२४॥
आपुलें पापपुण्यकरण । भोगणें लागे आपणाकारण ।
एकवेळ पाहता श्रीगुरुचरण । तरी पापपुण्यनिवारण सहजची ॥२५॥
पुण्यकर्मे स्वर्गप्राप्ति । पापकर्मे अधोगति ।
पापपुण्या वेगळी स्थिति । गुरुकृपा निश्चिती या नांव ॥२६॥(य१५.पा.११७)
ब्रह्मानंद जें निर्गुण । तें जयाचे कृपें होय सगुण ।
तो सगुण निर्गुणातीत प्रेमसंपन्न । श्रीगुरु आपण कृपाळू ॥२७॥
पुत्रासी गुरु मातापिता । पतीस गुरु मानी पतिव्रता ।
सच्छिष्यासी जो कर ठेवी माथां । तो सद्‌गुरुदाता कृपाळू ॥२८॥
अलकावतिपति परमदयाळा । वारूनियां मम भवभयाला ।
देवोनि अक्षय अभयाला । रहस्य बोला प्रेमळ ॥२९॥
तूं गणेश विघ्नहर्ता । तूं बुद्धिदा सरस्वती माता ।
तूं सद्‌गुरु कृपावंता । विभूतिमंता संत मूर्ते ॥३०॥
जय इंद्राणीतीरनिवासा । जयभक्तमानसराजहंसा ।
जय गीता तत्त्वार्थाऽवभासा । चिद्विलासाऽलंदीपते ॥३१॥
जय उमामहेश्वर आदिनाथा । जय करुणामय मत्स्येंद्रनाथा ।
जयाऽर्तबंधो गोरक्षनाथा । गहिनीनाथा कृपार्णवा ॥३२॥
जय जय नाथ निवृत्ति । जय जय ज्ञानेश्वर चिद्‌वृत्ति ।
जय जय सोपानदेव कृपास्फूर्ति । जय मोक्ष पद्धति मुक्ताजननी ॥३३॥
इतुकेहि मिळूनि देव । एक माझा ज्ञानदेव ।
चित्तीं धरूनि सद्भाव । दंडवत स्वयमेवो चरणीं असो ॥३४॥



पतिव्रता चरित्रें नाना । जे ऐकतांच क्षणीं मना ।
इंद्रियें पावूनि दमना । पापें शमना पावती ॥३५॥
संतांचीं चरित्रें अति गोड । पतिव्रता चरित्रें तैसींच रूढ ।
पतिव्रताचरित्रें गातां उघड । ब्रह्मगूढ प्रकाशे ॥३६॥
उतरावया पृथ्वीचा भार । समर्थ महीं इंद्र चंद्र ।
जैं पतिव्रतेचा होय अवतार । तैं भगवदवतार प्रगट होय ॥३७॥
दुष्ट दानव दैत्य तत्त्वतां । ते नाटोपती विष्णु उमाकांता ।
घरींचिया स्त्रिया पतिव्रता । होत्या म्हणूनि ॥३८॥
पतिव्रतेचें तपबळें । ब्रह्मा विष्णु शिव जाहलीं बाळें ।
तिन्हीं लोक धाक प्रबळें । पतिव्रता बळें वश होत ॥३९॥
पतिव्रतेच्या शापासाटीं । जळाल्या ब्रह्मांडाच्या कोटी ।
वर देतां पतिव्रता गोमटी । तरी कल्पकोटी चिरजीवी ॥४०॥
अनसूया अरुंधती । कौसल्या सीता सती ।
लीला चुडाला कृष्णा यशुमती । देवकी सती समर्था ॥४१॥
आणिकही पतिव्रता । नाना असती तत्त्वतां ।
जितुकी स्फूर्ति येईल चित्ता । तितुकियांच्या चरितामृता सेविजे ॥४२॥
पीतां पतिव्रताचरितामृत । त्या पुढें तुच्छ वाटे अमृत । यास्तव सावध श्रोते संत । बोबडावचनार्थ परिसावा ॥४३॥ (य१५.११८)
मी नेणें काव्य व्युत्पत्ति । मज न कळे शास्त्रयुक्ति ।
ज्ञानेश्वरकृपा अघटित स्फूर्ति । हृदयीं गुरुमूर्ति स्मरुनि वदे ॥४४॥
आतां सकलही करुनी कृपा । मज मार्ग दाखवावा सोपा ।
जेणें सहज मायबापा । पतिव्रता प्रतापा वर्णूं शके ॥४५॥
श्रीज्ञानेश्वर माय माउली । तियेची वंदूनि पाउली ।
ही ओवीकुसुममाळ अर्पिली । चरणीं प्रेमें ॥४६॥
॥ श्री ज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

हरिः ॐ तत्सदिति श्रीज्ञानेश्वरकृपाप्रसादे ओवीछंदबद्धे सद्‌गुरु-गणेश-
सरस्वती-संतस्तवनपूर्वक पतिव्रताचरितोपक्रमवर्णन्नाम प्रथमोध्यायः॥
॥ श्री ज्ञानेश्वर महाराजार्पणमस्तु ॥

०००

॥ श्रीमत्सद्‌गुरु ज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

# अध्याय २ रा

*॥ विपरीत स्त्रीस्वातंत्र्यवाद खंडणपूर्वक गृहस्थाश्रमव्यवस्था निरूपण ॥*

* * *

**ॐ नमो जय श्रीगुरो । प्रणतकाम कल्पतरो ।
तूझिया स्मरणें भव हरो । सकलासहित आमुचा ॥१॥
भागीरथी आणि इंद्राणी । ह्या दोन्ही तुमचे चरणीं ।
विष्णुरूपा गंगा चरणीं । इंद्राणी चरणीं गुरुरूपी ॥२॥
म्हणोनि गंगेन्द्राणी संगम । तोची सद्‌गुरु प्रेमोद्‌गम ।
ज्ञान गंगा आणि भक्ति इंद्राणी परम । सुसंगम जाहला ॥३॥
आतां तिया सुसंगमीं । जे सुस्नात जाहले त्यागूनि उर्मी ।
ते मिळाले पुरुषोत्तमीं । परब्रह्मीं अविनाशी ॥४॥
पूर्वाध्यायीं निरूपण । केलें चरित्रोपक्रमण ।
आतां पतिव्रतेची कीर्ति पतिहून । विशेष कैसी ॥५॥
स्त्रियेच्या भजनें पुरुष बुडती । परी पतीच्या भजनें स्त्रिया तरती ।
म्हणोनि पतीहूनि श्रेष्ठ कीर्ति । पतिव्रताख्याति मज वाटे ॥६॥
एथ प्रसंगें वाद आला । तोही पाहिजे समीक्षिला ।
जे बोलताती बोला । स्त्रीस्वातंत्र्य द्यावे म्हणुनि ॥७॥
पुरुषासी स्वातंत्र्य पूर्ण । स्त्रियासी स्वातंत्र्य तैसेचि जाण** (य१५.११९)
**परी हें मिथ्याचि बोलण । जे स्त्रियां परतंत्रपण उपेगा नये ॥८॥
यासी वादी बोलती नाना युक्ती । परी येणें नष्ट होवो पाहे भक्ती ।**



**आणि व्यवहारसिद्धीसाठीं जी प्रीति । तीही राहूं न शके ॥९॥
स्त्रियेतें स्वातंत्र्य देता । तरी लज्जा नष्ट होय तत्वतां ।
मग अष्टगुणी कामवृद्धिता । सहज पावे ॥१०॥
या लागीं स्वतंत्र युवती । कल्पांती होवो न शकती ।
असो या खंडणमंडणयुक्ती । परी यथार्थ स्थिति ऐकावी ॥११॥
धर्म अर्थ काम मोक्ष । हे चार पुरुषार्थ साक्ष ।
त्यामाजी आप आपणा मोक्ष । दुसरिया नाहीं ॥१२॥
धर्म अर्थ आणि काम । येथ धर्मपत्नीसह संभ्रम ।
स्वातंत्र्यपारतंत्र्यसंगम । सांगू येथें ॥१३॥
श्रुतिः- "धर्मेच अर्थ च कामे च नातिचरामि" इतिवरः ॥
धर्म-अर्थ-कामाच्या ठायीं । त्वां न सोडावी स्त्री सर्वदाही ।
ऐसिया वचनीं लवलाहीं । वरोत्तर विवाहांत ॥१४॥
धर्म अर्थ आणि कामीं । कदापि हीस न त्यागीं मी ।
एवं वरही वचनानुगामी । सहज होय ॥१५॥
एवं निश्चिती असे श्रुति । आतां ऐकाव्या स्मृति ।
"न स्त्री स्वातंत्र्यमर्हति" । ऐसी उक्ति मनूची ॥१६॥
स्मृतिः- "नार्यस्तु यत्र पूज्यन्ते, रमन्ते तत्र देवताः"(मनु, अ. ७-४२)
जेथ पूजिल्या जाती युवती । तेथ वास कीजे दैवती ।
एवं दोन्हीही स्मृति । विरोधि भासती परस्पर ॥१७॥
पहिली स्मृति स्त्रीस्वातंत्र्य निषेधित । दुसरी स्मृति विधी सांगत ।
धर्माचे ठिकाणी दासी म्हणोनि विरोध भासत । स्मृतींचा जरी ॥१८॥
तथापि धर्माच्या ठायी । स्त्री सर्वदा परतंत्र पाहीं ।
दासी होऊनिया राही । तरीच धर्मफळ मिळे ॥१९॥
जो जो धर्म करी पुरुष । स्त्रियेनें अनकूल असावें तयास ।
जैसी दासी निज स्वामीस । अनुकूल राहे ॥२०॥**

धर्माच्या ठायीं दासी भार्या । जैसी अत्रीतें अनसूया ।
कीं सत्यवाहना तया । सावित्री जेवीं ॥२१॥
एवं धर्माच्या ठायीं दासी कामिनी । अर्थाचे ठायीं ती मैत्रिणी ।
जैसे पांडव निघतां वनीं । याज्ञसेनी अनुकूल ॥२२॥

अर्थाचे ठायी समान

अर्थपुरुषार्थ साधिता । समान साधावा तत्वतां ।
धर्म पुरषार्थ साधितां । बहु पुरुषार्थ पुरुषाकडें ॥२३॥
धर्मपुरुषार्थाचा अधिकार । पुरुषाकडे येतो साचार ।(य१५पा१२०)
स्त्रियेने दास्यत्व करूनि निर्धार । मिळवावें पुण्य ॥२४॥
आणि अर्थपुरुषार्थाच्या ठायीं । स्त्रीपुरुष अधिकार समान पाहीं ।
मित्रांसरिखे दोघांही । वागावें सुखें ॥२५॥
एकाचें इष्ट एकीं करावें । तेथें हें तें मग न गणावें ।
एवं अर्थ पुरुषार्थ साधावें । दोघीं समान राहोनी ॥२६॥

कामाचे ठायी वरिष्ठ

आणि काम पुरुषार्थाच्या ठायीं । स्त्रियेतें अधिकार वरिष्ठ पाहीं ।
दास्यत्व ये लवलाहीं । पुरुषाकडें ॥२७॥
जैसे द्रौपदीचें पाय धर्म चुरीत । कीं राधेचें पाय हरी वंदित ।
तें काम-पुरुषार्थस्थित । यथापरिस्थित ऐकावी ॥२८॥
कामपुरुषार्थे करून । स्त्रियेचाचि करावा मान ।
ये विषयीं जयदेव वचन । प्रमाण आहे ॥२९॥

प्रतीक

स्मरगरलखण्डणं मम शिरसि मण्डनं देहि पदपल्लवमुदारम्

(श्री गीतगोविन्दम् दशम सर्गः श्लोक ७.)

भावार्थ -

"प्रिये मन्मथ विष अति दुस्तर । तेणें शरीरीं उठे विकार ।
ते तूं कृपा करूनि निर्धार । नष्ट करीं ॥३०॥
तुझी पाउलें अति सुंदर । मी धरूनि शिरावर ।





जे मज रोगिया होती उदार । वैद्या सारिखे ॥३१॥
एवं जयदेवाचें वचन । काम पुरुषार्थीं स्त्रियेतें मान ।
आणिकही एक कवी प्रमाण । बोलिला ऐसा ॥३२॥

प्रतीक

राधे त्वमधिकधन्या हरिरपि दुस्तरभवाब्धितारोऽपि ।
मग्ना सुरतसमुद्रे तव कुचकुंभावलम्बनं कुरुते ॥१॥

श्लोकार्थ

भावार्थ :-

श्रीकृष्णाहूनि मान्य । राधे तूंचि परम धन्य ।
कारण सुरतसमुद्री असतां मग्न । तोही तव कुचकुंभाश्रयीं ॥३३॥
काम समयीं रघुपति । सीतेस मान देत नाना रीती ।
आणि पुरूरवा नृपति । मान दे उर्वशीप्रती तैसा ॥३४॥
शंतनु मान गंगेप्रती । देतां होय तैसेच रीति ।
चुडाला राणीचे वचनाप्रति । शिखिध्वज नृपति मान देता ॥३५॥
(य :१५ पा.१२१) असो बहुत दृष्टांत । हाच अनुभव यथार्थ ।
साधितां धर्मपुरुषार्थ । दासी होआवें स्त्रियेनें ॥३६॥
अर्थपुरुषार्थी मैत्रिणी । कामपुरुषार्थीं स्वामीनीं ।
एवं ऐसिया स्मृति दोन्ही । बोलताती ॥३७॥
प्रथम स्मृतीचा अर्थ । जाणावा धर्म पुरुषार्थ ।
आणि दुसरिया स्मृतीचा अर्थ । काम पुरुषार्थ जाणावा ॥३८॥
तिसरीही एक स्मृति । आहे निकी ऐसिया रीति ।
भोज्येषु माता शयनेषु भार्या इत्यादि स्थिति । बोलली आहे ॥३९॥
भोजनाचे समयीं जननी । शयनाचे समयीं कामिनी ।
कार्याचे ठायीं मैत्रिणी । आज्ञा प्रमाणीं दासीसम ॥४०॥
धर्मानुकूल परममती । ऐशा सद्गुणी जेथ युवती ।
निक्या पूजिलिया जाती । कुल उद्धार स्थिती त्या ठाया ॥४१॥

एवं धर्मपुरुषार्थी स्त्री परतंत्र । आणि काम पुरुषार्थी स्त्री स्वतंत्र ।
आणि पतिसेवा पवित्र । धर्म स्त्रियेचा ॥४२॥
एवं पुरुष पुरुषार्थ आचरितां । हे झाली स्त्रियेची व्यवस्था ।
परी स्त्रीचा पुरुषार्थ तत्त्वता । एक पतिव्रताधर्म ॥४३॥ म्हणोनि पुरुष
धर्मानुकूल आहे । आणि आपुला पतिव्रताधर्मही आचरत राहे । ती स्त्री
कुलस्त्रियांहूनि धन्य पाहे । निकी लवलाहें निरूपिली ॥४४॥
इये अध्यायीं निरूपण । विपरीत स्त्रीस्वातंत्रवाद खण्डण ।
स्मृतिविरोध परिहरोन । गार्हस्थ्य व्यवस्था स्थापिली ॥४५॥
स्त्रीपुरुषांचें कर्तव्यकर्म । संक्षेपें निरूपिलें परम ।
पुढील पतिव्रताचरितोपक्रम । येणेंही साधे ॥४६॥
झालिया शंका समाधान । पुढें चरित्रें करावींत श्रवण ।
ज्या ज्या पतिव्रता पुरातन । आणि नवीन जाहलिया ॥४७॥
त्या सकळांचा चरित्र समुदाय । येथ निरूपणीं योजिला होय ।
प्रथम सुखबोधा रचिला उपाय । कुलस्त्रियांच्या ॥४८॥
पुरुषही वाचोन । एकपत्नीव्रत आचरतील पूर्ण ।
ऐसी आशा करोन । आरंभिला ग्रंथ ॥४९॥
पुढें उत्तम उमाचरित । जे सकल जगन्माता शोभत ।
तें मातृचरित्र ऐकूनि यथार्थ । पुनीत होवोत सुजन श्रोतें ॥५०॥
श्रीज्ञानेश्वर चरण । दृढभावें हृदयीं धरून ।
अध्याय केला समर्पण । मालिका रूपें ॥५१॥
हरिः ॐ तत्सदिति श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वरकृपाप्रसादे, ओवी छंदबद्धे,
पतिव्रताचरितामृते, विपरीतस्त्रीस्वातंत्र्यवाद खंडणपूर्वक-गृहस्थाश्रमव्यवस्था-
वर्णनन्नाम द्वितीयोध्यायः॥ श्रीज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥
॥श्रीज्ञानेश्वर महाराजपर्णमस्तु॥



# अध्याय ३ रा

॥ श्रीज्ञानेश्वर माउलीसमर्थ ॥
: पतिव्रताधर्माचे सामर्थ्य

नमो माझिया कुळदेवता । भक्तवत्सला उमाकांता ।
श्रीज्ञानेश्वररूपें भगवंता । कृपा केली मजवरी ॥१॥
तरी आतां तेचि रूप । हृदयीं राहो हा संकल्प ।
सिद्धि न्यावया मायबाप । समर्थ तुम्ही ॥२॥
म्हणोनि हैमवती सहित । वंदिलें करावया स्वहित ।
योगी जाणती जे गुणरहित । ते गुणसहित भक्तवशें ॥३॥
तें उमाचरित सुंदर । पुढें वदवावें सविस्तर ।
जय जय उमा पिनाकधर । करुणानिधे ॥४॥
जय त्रिनयन शशिशेखरा । जयशिव मुकुंदप्रिय शंकरा ।
जय निज मंगलकरा । गंगाधरा विश्वपते ॥५॥
ऐसी करितांचि स्तुति । हृदयीं प्रगटली शंभुमूर्ति ।
सह ज्ञानेश्वरैक्य स्थिती । पावोनिया ॥६॥
तें सुंदरपण डोळां पाहतां । बोलावया उमाचरिता ।
स्फूर्तिप्रवाहें तत्त्वतां । हृदयाब्धीं भरें ॥७॥
तंव श्रोते करिती प्रश्न । उमाचरित्र आम्ही करूं श्रवण ।
परी आशंकित जाहलें मन । पुसणें आहे कांही एक ॥८॥
तेथ वक्त्याचें अनुमोदन । पाहोनि श्रोते वदती आपण ॥
पातिव्रत्यीं सामर्थ्य गहन । काय म्हणोन सांगावें ॥९॥
आणि पातिव्रत्याचें फळ । तेहि सांगावें सकळ ।
पुरुषतपाहूनिही केवळ । श्रेष्ठ असे, काय म्हणोनी ॥१०॥
कौषिक* ब्राह्मणाच्या तपाहून । पातिव्रत्याचें श्रेष्ठपण ।
हें वनपर्वी निरूपण । ऐकिलें आम्हीं ॥११॥

पाठभेद – हें ऐकिले निरुपण । महाभारतारण्यपर्वी ॥११॥

तरी ही आशंका फेडावी । ऐसी उक्ति ऐकूनि बरवी ।
वक्त्यातें ज्ञानरवी । उजळला वाटे ॥१२॥
म्हणे तुम्ही धन्य सज्जन । तुमचेनि वक्त्या वक्तेपण ।
तुम्हां ऐसे जोडलिया निधान । तरी मग न्यून काय असे ॥१३॥
तुम्ही विवेकसागर । तुम्ही चातुर्य वैरागर ।
वैराग्याचें आगर । थोर तुम्ही ॥१४॥

ज्ञानेश्वरीतील संमति-ओवी.

अहो चंद्रकांत द्रवतां कीरु होये । परीतें हातवटी चंद्रींचि आहे ।
तैसा वक्तां तो वक्ता नोहे । श्रोतेनि वीण ॥ ज्ञाने.९-२९
(य :१५ पा.१२३)

म्हणोनि तुमची बुद्धि । प्रशंसिता विचारनिधि ।
तरी प्रशंसनयोगी । समाधि लागो पाहे ॥१५॥
असो स्मरोनि अलंदिपति ।उत्तर विवेकें यथामति ।
काढोनि घ्यावे निश्चिती । आपलें आपण ॥१६॥
पुरुष तप करी जेव्हां । कांहीं संकल्प असे तेव्हां ।
''ममात्मनः फलप्राप्त्यर्थ'' म्हणोनि भावा । करणें पडे ॥१७॥
''स्वर्गकामो यजेदिति । ऐसी ही आड ये श्रुति ।
एवढा दुर्यत्न स्त्रियां प्रति । न घडे कदा ॥१८॥
स्त्रियांचा पातिव्रत्यीं श्रम । तो त्यांना वाटे आपुला धर्म ।
म्हणोनि तयांचें तें कर्म । सहज होय ॥१९॥
मायबापगृहाहोनी । शिक्षणाच्या योगें करोनी ।
स्त्रियांच्या येत आंगवळणी । पातिव्रत्य तें ॥२०॥
अंगवळणीं पडतां धर्म । तरी तो सहज हों लागे निष्काम ।
जेथ सायासाचें कर्म । तेंचि सकाम होवों लागे ॥२१॥
जैसे प्रातःकाळीं उठावें । हें बहु लोकांसी कळें स्वभावें ।





परी तत्फलाकडे धांवे । न घेती कोणी ॥२२॥
कीं जयाचा गोड बोलणें स्वभाव । तो तत्फल न इच्छी सावेव ।
कीं नदीचा प्रवाह । परी फल कांहीं नेणे ते ॥२३॥
की वृक्ष करी परोपकार । परी फळ किडाळ नेणे समग्र ।
कीं जग निवविती जलधर । फळावीण ॥२४॥
तैसें जें कर्म पडे अंगवळणीं । त्याचें फळ नेच्छी कोणी ।
ते सहजचि काय मनी वाणी । घडोनि येत ॥२५॥
सायास जेथ कांही । तेथ मी कर्ता ही बुद्धि पाहीं ।
वारंवार ये लवलाहीं । प्रत्ययासी ॥२६॥
आणि सहज कर्म जें होत । ते ंझालें तैसें कोणीकडे जात ।
त्याची आठवणही राहात । नाहीं केव्हां ॥२७॥
जैसे मार्गी चालतां । चहूंकडे पाहती तत्त्वतां ।
परी जे सुंदर वाटे सर्वथा । त्याचीच आठवण ये ॥२८॥
एरव्ही पाहणें तें सहज । तेवीं या कर्मा माजी गुज ।
जें अंगवळणीं पडे सहज । कर्म तें बा ॥२९॥
म्यां आज इतुकें कर्म केलें । हें नाठवें कांहीं केलें ।
आणि जें कर्म संकल्पें आरंभिलें । त्याची स्मृति ये वेळोवेळीं ॥२३०॥
वेळोवेळीं आठवण । कीं मीं हें कर्म करीं आपण ।
म्हणवोनि कर्तृबुद्धि दारुण । दृढ होय ॥३१॥
तपादिकांसि पाहतां । आरंभ असे तत्वतां ।
तेथ संकल्प येत असे माथां । कर्तृबुद्धि ॥३२॥
तप करूनि सोडणें कर्तृत्वमती ।
यास नित्यकर्माहूनि शतगुण सायास लागती ।
नित्य कर्म सहज रीति । निष्काम होय ॥३३॥
तें स्त्रियांच्या ठायीं । पातिव्रत्य सहज पाहीं ।

आणि पतिचि लवलाहीं । ईश्वर मानिती ॥३४॥
ईश्वरहोय जगत्कर्ता । पति उदरीं गर्भदाता ।
या अनुभवें तत्वतां । पतिवरि ईश्वरता द्दढ होय ॥३५॥
जन्मदाता माता पिता । तेही उपयोगी न पडे सर्वथा ।
परावा असोनि पति उपयोगिता । येणें ईश्वरता द्दढ होय ॥३६॥
प्रत्यक्ष जो उत्पन्न कर्ता । त्या पितया वरि न चले सत्ता ।
रुसवा पतीवरी सर्वथा । येणें ईश्वरता दृढ होय ॥३७॥
सात पाऊलें चालतां । पतिसख्य कळे तत्वता ।
पाणिग्रहणें पति सांभाळिता । येणें ईश्वरता द्दढ होय ॥३८॥
सावित्री रमा हिमाद्रिसुता । अरुंधति अनसूया माता ।
यांचे इतिहास भावें ऐकितां । पतिवरी ईश्वरता द्दढ होय ॥३९॥
की त्यागितां पतीतें सहज । जारपणें वाढेल रज ।
या पापाच्या भयें सहज । द्दढ होय ईश्वरता ॥४०॥
पतिव्रतेनें पतिसेवा केली । तें कामना धरोनि केली ।
ऐसी ग्वाही नाहीं देखिली । पुराणीं कोठें ॥४१॥
पुत्रकामना धरून । पतिसेवा केली याचें उदाहरण ।
ऋषिपत्न्यांविषयीं जाण । आहे जरी ॥४२॥
तरि पुत्र जो होत । तो पतिसह आपल्या उपयोगी पडत ।
केवळ आपुलिया भोगासाठीं निश्चित । कामना नसे पतिव्रतांची ॥४३॥
किंचित् कामना जरी । त्यांतहि पतीचें हित तरी ।
केवळ पतिव्रता ती निर्विकारी । निष्काम सेवा करी सहज ॥४४॥
तपादिकांच्या ठायीं । निष्कामता सायासें येई ।
आणि पातिव्रत्याच्या ठायीं । निष्कामता सहज असे ॥४५॥
सकाम तपाचीं उदाहरणें । बहुत देती निगम पुराणें ।
सकाम पातिव्रत्याचीं उदाहरणें । क्वचित् सांपडती ॥४६॥ (य१५पा१२५)





जो जों करी कामपूर्ती । तेथ जीवाची सहज प्रीति ।
पतीनें स्त्रियांची काम पूर्ति । म्हणूनहि प्रीति सहज होय ॥४७॥
याचियाकारणें करून । पतिव्रतांचे शुद्ध मन ।
शीघ्र होय न करितां साधन । वेदोक्तही ॥४८॥
याचि अभिप्रायें करूनि । वराहमिहिरांनीं स्तविल्या कामिनी ।
नाहीं स्तविल्या जारिणी । कुटिलमति ॥४९॥
तो बृहत्संहितेंत अध्यावो । इच्छा तरी वाचोनि पाहावो ।
तात्पर्य पतिव्रता स्वयमेवो । स्वधर्मनिष्ठ निष्काम ॥५०॥
येथें शंका येईल कोणा । कीं पती तो मनुष्य जाणा ।
मग पतिव्रतेस जीवोपासना । घडेल सहज ॥५१॥
जीवोपासना तंव कहीं । श्रुतींत बोलिली नाही ।
ईश्वरोपासना लवलाहीं । बोलिली सकळ ॥५२॥
"सर्वत्र प्रसिद्धोपदेशादिति" । "विवक्षित गुणोपपत्तेश्च" निश्चिती ।
"अनुपपत्तेस्तु न शारीरः" इति । ईशाप्रति उपास्यता ॥५३॥
एवं ब्रह्मसूत्राभिप्रावो । तरी तो पतिव्रतेसि केविं फळ भावो ।
कारण पति स्वयें जीवो । आहे म्हणूनि ॥५४॥
तरी याचें उत्तर । जैसे शालिग्रामावर ।
विष्णुबुद्धि करिती विप्र । पूजिती भावें ॥५५॥
तें विष्णु म्हणूनि पूजिता । शिलादिकधर्म न येती चित्ता ।
तैसी पतिगुणदोष पतिव्रता । सर्वथा न पाहे ॥५६॥
मूर्त्यादि शिलाभिशुद्धि । तेथ जरी होय भगवद्बुद्धि ।
पतीतें त्याहूनि चेतनसिद्धी । तेथ ब्रह्मबुद्धि कां न होय ॥५७॥
गुरूपासनेकरोन । शिष्यातें जैसा ईश्वर प्रसन्न ।
पत्युपासनेकरोन । स्त्रियातें तैसा ॥५८॥
आणि सहज निष्काम उपासना । म्हणोनि शीघ्र हरीतें करुणा ।

येवोनि पतिव्रता मना । शुद्ध करी तो ॥५९॥
कर्म उपासना भिन्न । हे पुरुषातें करणें पडे गहन ।
आणि पातिव्रत्यचि कर्म पूर्ण । पातिव्रत्य उपासना स्त्रियां ॥६०॥
एवं कर्म उपासना । दोही ठायीं अद्वैत वासना ।
होय म्हणोनि सहज मना । मलविक्षेप सोडिती ॥६१॥
दोन्ही दोष सहज जाती । तेणें शुद्धता आणि एकाग्रता चित्तीं ।
येवोनि सुखाच्या शिरा वरुती । श्रेष्ठ ती होय ॥६२॥
(य१५पा१२६)
एक मात्र उरे ज्ञान । तें तो नोहे श्रवणादिविण ।
परी केवळ पातिव्रत्यें करून । ब्रह्मलोक फळ मिळे ॥६३॥
तेथ तियेतें मिळे पति । सेवा करी निष्काम रीती ।
म्हणोनि शेवटीं सत्त्व चित्तीं । वाढोनि ज्ञान अवश्य होय ॥६४॥
एवं येथ किंवा ब्रह्मलोकांत । ज्ञान पातिव्रत्यांकित ।
म्हणोनि पतिहूनि विख्यात । कीर्ति पतिव्रतेची ॥६५॥
आधीं उमा मग महेश्वर । आधीं लक्ष्मी मग नारायणोच्चार ।
आधीं सीता मग रामचंद्र । आधीं राधा मग कृष्ण ॥६६॥
अत्रिहूनि तत्त्वतां । अनसूया कीर्ति श्रुत बहुतां ।
लोकांमाजी मातापिता । ऐसेंचि म्हणती ॥६७॥
आधीं पुरुष मग उच्चारी प्रकृति । तरी तो होय मातृघाती ।
ऐसें निरूपण ब्रह्मवैवर्ती । केलें आहे ॥६८॥.

श्लोक :-
आदौ पुरुषमुच्चार्य पश्चात्प्रकृतिमुच्चरेत् ।
स भवेन्मातृघाती च . . . . ।

''विष्णुपत्निं नमस्तुभ्यं'' इत्यादि वचन । समासान्तपद म्हणोन ।
अन्त्यशब्दा मुख्यपण । सहज आलें ॥६९॥



पुरुष यज्ञ करी जेव्हां । पशु-मांस घाली तेव्हां ।
आणि पतिसहगमन स्त्री करी जेव्हां । तेव्हां स्वदेह ही समर्पी ॥७०॥
एवं यज्ञकर्माहून । पतिव्रतेचें धैर्य गहन ।
येणें तपेंहि नारायण । तुष्टें सहज ॥७१॥
असो आतां नाना रीती । आशंका घेतली होती श्रोतीं ।
त्याचें उत्तर यथामति । दिधलें आहे ॥७२॥
एथ उणें पुरें कांही । तें योग्यसें करा चतुर सर्वही ।
मी तों स्वयें ज्ञानेश्वरपायीं । कविता अर्पोनि तटस्थ ॥७३॥
ज्ञानेश्वर माय माउली । तियेचीं वंदोनि पाउलीं ।
माये पतिव्रतायशखोली । उघडीं कृपें ॥७४॥

हरिः ॐ तत्सत् श्रीमत्सद्‌गुरु ज्ञानेश्वरकृपाप्रसादे ओवीछंदबद्धे
पतिव्रताचरितामृते अर्थवादरहितवस्तुतयैव
पातिव्रत्यस्य सम्यक् सामर्थ्यवर्णनं
नाम तृतीयोध्यायः ॥
॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

ooo

॥ श्रीमत्सद्‌गुरु ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

# अध्याय ४ था

जय जय हिरगिरीनंदिनीवरा । जय भक्तमानसचकोरचंद्रा ।
जय रतिकांततातहृदयविहारा । काशीविश्वेश्वरा विश्वपते ॥१॥
जय त्रिशूलकर त्रिपुरहरा । जय त्रिनेत्र त्रिपथगाधरा ।
जय त्रिमात्रत्रिलोकेश्वरा । कर्पूरगौरा त्रिगुणरहिता ॥२॥
जय चक्रचालका चक्रधरप्रिया । जय भवविलासहा, कैलासविलासिया ।
जय भक्त काम प्रपूरणोल्हासिया । कामनातीता कामदहना ॥३॥

जय जय निराकार लिंगात्मका । जय भक्तमनोहर सगुण शालिंका ।
जय गणेशतात गौरिवामांका । फणिभ्राडर ग्रैवेहका पशुपते ॥४॥
जय विभूतिचर्चन विभूतिप्रिया । जय भवानीवरा भवाऽभया ।
जय भवभयहरा भव हृदयहृदया । कारणकार्यनियामका ॥५॥
जय पंचवक्त्रा द्विपंचकरा । जय द्विपंचशतवक्त्रभूषणधरा ।
जय प्रपंचाश्रय प्रपंचहरा । पंचबाणदहना पंचम ब्रह्म ॥६॥
जय जगद्‌गुरु करुणामूर्ते । जय निगमवर्णित अतर्क्यकीर्ते ।
जय गुणगणमंडित भवानीपते । पुढें ग्रंथातें चालविता तूं ॥७॥
मागील अध्यायीं निरूपण । पातिव्रत्य सामर्थ्य पूर्ण ।
आतां श्रोते सावधान । होऊनी अवधान असो द्या ॥८॥
आज सकल तीर्थे आली घरा ।कीं उदय जाहला अमृतकरा ।
पतिव्रता चरितसुधा सुंदरा । सुजीवितवरा वरों आली ॥९॥
आजि मंगळा मंगळ भेटले । अजि सुखाचें पारणें फिटलें ।
आजि काळाचें संबंध तूटलें । अमृत प्रकटलें पतिव्रताचरित ॥१०॥
(संबंध=सम्यक् बंध)
ज्या स्वयें पतिव्रता होती । त्या दुजिया तैसिया करिती ।
जेवीं ईश्वरावतार गुरु प्रकटती । मग ब्रह्म करिती मुमुक्ष जीवा ॥११॥
जीव अधिकारी साधनगुणें । प्रकटती तेवीं पतिव्रता व्हावया ही साधनें ।
श्रीनारदमुनीतें नारायणें । निरूपिलीं ॥१२॥
संमति श्लोक :-
क्षणो नास्तिरहोनास्ति नास्ति प्रार्थयिता जनः ॥
तेन नारद नारीणां पातिव्रत्यं हि जायते ॥९॥ (य१५-१२८)
पतिसह सर्वदा धर्माचरण । पत्यर्थास्तव गृहकार्यकरण ।
सासू श्वशुरादि वृद्धसेवन । ती जीवनसुखार्थ ॥१३॥
रजनीं पति सुखदानी शयनीं । जरी कामास्तव पति म्हणे स्वामिनी ।
तरी अहंकार वाढेल म्हणुनी । अनुत्सेकिनी स्वामिनित्वीं ॥१४॥



एवं पति सेवेवीण । न जाये सर्वथा क्षण ।
पतिचरणध्यानाविण । हृदयीं मन मोकळें नव्हे ॥१५॥
परम तप तो प्रियकांत । म्हणोनि पतिवीण त्यजिला एकांत ।
सासू श्वसुरसेवया लोकांत । उपेक्षिला ॥१६॥
जें लोकजात अनंत कोटी । तें पतिवीर्य विरूढलें पोटी ।
म्हणूनि पुत्रशाला गोमटी । विश्व जाहलें ॥१७॥
येणें सकळावरी आज्ञा । सकळही म्हणती जननी प्राज्ञा ।
कवणाचीही करावया संज्ञा । प्रज्ञा न चले ॥१८॥
जगा रक्षी जेवीं जननी । या लागीं विनवणी न मानी ।
यास्तव नारदा निश्चयें करूनि । पतिव्रता कामिनी होताती ॥१९॥
ईश्वरापासूनि सकल वेद । सकळ विद्या ज्ञानभेद ।
शिवा पासूनि प्रसिद्ध । प्रगटले ॥२०॥
तेवी पातिव्रत्य धर्म । सर्वही उमेपासूनि परम ।
हा महाभारतीं सप्रेम । प्रसंगू आहे ॥२१॥
स्वयं पतिव्रतामाजी वरिष्ठ । हिमकन्या परमश्रेष्ठ ।
तिचें चरित्र सुविस्पष्ट । सादर श्रोतीं परिसिजे ॥२२॥
ही ईश्वररूपा ईश्वरशक्ति । परी वाढवाया पातिव्रत्याप्रति ।
दक्ष गृहीं महासती । झाली अवतरती स्वेच्छावशें ॥२३॥
अहो धमाधर्म कांहीं । परमेश्वराचे ठायीं ।
निके कांही नाही । श्रुति म्हणे ॥२४॥
परी बाळाचें मुखीं द्यावया ग्रास । बाप जेवूनि दावी सावकाश ।
तेवी धर्मी लोक लावावयास । ईश्वरास धर्म आचरणें ॥२५॥
संमति श्लोक
न मे पार्थाऽस्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किंचन ।
नानवाप्तमवाप्तव्यं वर्त एव च कर्मणि ॥ भ.गीता २२-३

यदि ह्यहं न वर्तेयं जातु कर्मण्यतन्द्रितः ।
मम वर्त्मानुवर्तन्ते मनुष्याः पार्थ सर्वशः ॥ भ.गीता २३-३
भगवंत म्हणे मज । नाहीं कर्माऽकर्माचें काज ।
परी मीहि आपुलें सहज । कर्म न सांडी ॥२६॥
(य :१५ पा.१२९)
मी जरी सोडिला धर्म । तरी मजवरी लोकआचरण परम ।
यालागीं करितील अधर्म । अवघेचि लोक ॥२७॥
लोक न बुडावे ययास्थिती । महापुरुषही धर्म करिती ।
तेवीं उमा भगवती । पतिव्रतास्थिती वर्तत ॥२८॥
पुरुषाकार मूर्त्यवच्छिन्न चैतन्य शिव पिता ।
वनिताकार मूर्त्यवच्छिन्न चैतन्य उमा माता ।
'जो प्रियूचि प्राणेश्वरी' हे ताता । संमति आहे ॥२९॥
यालागीं उमाचि मदनदहन । कीं शंकरचि उमा आपण ।
जेथ जे पाहती भिन्न । ते पडती जन महानरकीं ॥३०॥
जैसें शिवपुराणीं शिव ब्रह्म । कीं भागवतीं विष्णु ब्रह्म ।
तैसें देविभागवतीं ब्रह्म । उमाही आहे ॥३१॥
एकाचि नदींतूनि जैसी । अंजुळी घेती आर्ते ऐसी । तेवीं एकाच ईश्वराचि
आपैसी । जया जें आवडे तैसी उपास्ति करिती ॥३२॥
शिव विष्णू सूर्य गणेश उमा । हीं नांवें एकाचि ब्रह्मा ।
परी लोक तरावे म्हणोनि धर्मा । आचरोनि दावी माय ॥३३॥
तिचें चरित्र अति सुंदर । ऐकतांचि मनोहर ।
सावध होवोनि श्रोते चतुर । करुनी एकांतर ऐकावें ॥३४॥
कल्पाकल्पांची भिन्न रीती । भिन्न नांवें भिन्न जगतीं ।
सारिखी असतां प्रकृति- । विकृति भिन्न पावे ॥३५॥
दश इंद्रिय पांच भूत । सर्व कल्पीं समान दिसत ।



अकरावें बारावें इंद्रिय येथ । कवणे कल्पीं न सांपडे ॥३६॥
परि मातीचें घट जैसे होती । तैसे ताम्राचें ही घट करिती ।
एवं भेद पावे शरीरादि विकृति । मायावशें ॥३७॥
एकादे कल्पीं शिव पहिले उत्पन्न । होवोनि निर्मी ब्रह्मा आणि नारायण ।
एखादे कल्पीं विष्णू प्रथम होवोन । विधि आणि उमारमण निर्मी ॥३८॥
असो ही सृष्टिव्यवस्था । परी शिव विष्णु भक्तां समान उपास्य ॥३९॥
मनू-शतरूपेंपासून । सृष्टीचें जैसें आविष्करण ।
तैसें दक्षप्रजापतिपासून । सृष्टिआविष्करण जाहलें ॥४०॥(य१५पा१३०)
या दक्षप्रजापतीचे मंदिरीं । प्रसूता पतिव्रतेचे उदरीं ॥
जन्मली माता उमा सुंदरी । हृदयमंदिरीं ध्यात शिवा ॥४१॥
विषकंठ बैसे स्मशानीं । सर्प गळां त्रिशूलपाणी ।
ऐसे दोष मनीं नाणीं । शिव चरणीं मति वेधली ॥४२॥
शरीरजन्म मायबापाचा । परी मनोभाव शंकराचा ।
जन्मा पासूनि साचा । उमटला ॥४३॥
एक शिव वेगळा करून । इतर पुरुष पुत्रासमान ।
ऐसी पहिलेच पासोन । वेगसंपन्न वृत्ति झाली ॥४४॥
उदरीं अवतरण । धर्मस्थापनाकारण जाहलें ॥४५॥
मायबाप आधिकारिक । कन्या तंव ब्रह्म सम्यक ।
शिव गुरु ब्रह्म ब्रह्मदर्शक । ऐसें चतुष्क अति योग्य ॥४६॥
येथ आशंका करिती कोणी । जन्म न ये कर्मावांचूनि ।
कर्में पापपुण्याची खाणी । सुखदुःख शिराणी बोलिली ॥४७॥
पुण्याचें फल होय सुख । पापाचें फळ महादुःख ।
कर्मावांचोनि निष्टंक । शरीर सर्वथा मिळेना ॥४८॥
जन्म होय कर्मावीण । तरी मुक्ताही होईल बंधन ।
उमा स्वतः ब्रह्म असोन । कर्मावीण जन्मग्रहण कैसे ॥४९॥

तरी ये विषयीं समाधान । ऐकावें होवोनि सावधान ।
समुद्रीं तरंग उठतां आपण । पाणीपण न मोडे ॥५०॥
तेवीं न विसरूनी आपुली स्थिती । जीवारोपित ईश्वरत्व संमती ।
अनध्यस्तविवर्त प्रतीती । झाली पार्वती जगन्माता ॥५१॥
मीठ समुद्रीं जातां । तरी मार्ग कांहींच नुरे तत्त्वतां ।
नदी समुद्रीं मिळोनि जातां । ओघ पाहतां मागे उरे ॥५२॥
तया ओघें सकळांची । तृषा हरण होय साची ।
तैसी मुक्त आणि अवतारांची । स्थिति सुखाची ओळखिजे ॥५३॥
विदेही मुक्त जे होती । तयांचें कांहींच नुरे निश्चितीं ।
अवतार ब्रह्मचि असती । परी शरीरें दिसती दीनोद्धारा ॥५४॥
"झालेंनि जगें मी झांके । तरी जगत्वें कोण फांके ॥
किळेवरी माणिके । लोपिजे काई" (ज्ञा.अ.१४.ओ.१२४)
एवं तात वचन प्रमाण । ब्रह्मवेगळें न होवोन ।
जगदुद्धारा कारण । उमा आपण अवतरली ॥५५॥
पहिलें अधर्मी असावें । आणि मग धर्मनिष्ठ होवावें ।
हें जीवकर्म स्वभावें । अवतार कृत्य नव्हे ॥५६॥(य१५पा१३१)
तैसी नोहे भगवती । आधींहूनि निष्ठा धर्मावरुती ।
अंतरीं आठवी पशुपति । विधि श्रीपती वंद्य जो ॥५७॥
कीं पाहतां कवणेहि वेळीं । मी नाहीं शिवाहुनि निराळी ।
या अभिप्रायें दक्षबाळी । चिंती चंद्रमौळी आदिहुनी ॥५८॥
कीं ब्रह्मरूपें होती शिवी । ते तैसीच असूनि दहरदिवी ।
योगेऽपि वियोगोपलालना व्हावी । म्हणोनि देवी शिव चिंती ॥५९॥
कीं माधुर्यभक्तीचें शुद्धपण । स्थापाया अलंकारभजन ।
करी संवेग वाढवून । कैलासरमण आठवितां ॥६०॥

---

अलंकार भजन - (भक्तिपदतीर्थामृत - अ ४ ओवी १०-१४)



अहो कुमार वयापासुनी । कपाळी कुंकू लावी कामिनी ।
तैसे तत्पदवाच्यांश स्मरणी । अलंकार भजन ॥१०॥
आणि उपवर जै होय । तैं लग्ननाम निघे स्वयें ।
पतिनामग्रहण होय । तेच वेळी ॥११॥
त्या नामे करून । पतीसी ओळखी आपण ।
आता दार्ष्टान्ता निरूपण । ऐसेचि कीजे ॥१२॥
प्रेमळ पाहुनी सद्गुरुनाथ । द्वादशाक्षरी उपदेश करीत ।
तो जपतांचि अंतरस्थ । प्रकटे श्रीहरी ॥१३॥
येथवरी (१) अलंकार भजन.......
पुढे – (२) स्वरूप भजन.........(३) ऐक्य भजन

---

अथवा भावी आपुल्या मनीं । मी जन्में होईन शरीराभिमानी ।
यालागीं ब्रह्म न विसरावें म्हणोनी । शूलपाणि आठवित ॥६१॥
धर्मे अथवा ज्ञानें पाहतां । जीवा मार्ग दाखवितां ।
आवडीनें पिनाकहस्ता । श्री अनंता आठवी ॥६२॥
ना तरी स्त्री शूद्र समान । श्रुति पुरुषासचि सांगे ज्ञान ।
यास्तव स्त्रियांवरी कृपानिष्ठ होवोन । भुजगभूषणा आठवित ॥६३॥
अथवा नको इया कल्पना । वृत्ति आपणचि आपणा ।
ब्रह्म असोनी ब्रह्मपणा । नंदीवाहना मिळों जाती ॥६४॥
॥ अपूर्ण ॥